अकोला । सोमवार
दि. १९ मे २०२५
वर्ष : १९ अंक : ७८
पाने : ८ + ४

दैनिक **अजिंक्य भारत** बातम्यांचा गतिमान पाठलाग

www.ajinkyabharat.com स्वागत मूल्य ३ रुपये

# हैदराबादमधील चारमिनारजवळ भीषण आग!

## ८ मुलांसह १७ जणांचा होरपळून मृत्यू

हैदराबाद, दि. १७ वृत्तसंस्था

**हैदराबादमधील ऐतिहासिक चारमिनारजवळील गुलजार हाऊस इमारतीत दागिन्यांच्या दुकानाला रविवार १८ मे रोजी पहाटे साडेपाच वाजता आग लागली. ही आग झपाट्याने पसरली. गुलजार हाऊसमध्ये फायर एक्झिट नसल्यामुळे इमारतीत असलेले अडचणीत सापडले. सकाळी भीषण आग लागली. निवासी आणि व्यावसायिक वापराच्या इमारतीला लागलेल्या आगीत किमान १७ जणांचा मृत्यू झाल्याचे एनडीटीव्हीने त्यांच्या वृत्तात म्हटले आहे. दुर्घटनेत अनेकजण जखमी झाले असून, त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.**







आग सकाळी सुमारे साडेपाच वाजण्याच्या सुमारास लागली, ज्याचे संभाव्य कारण शॉर्ट सर्किट असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. गुलजार हौज परिसरातील ही इमारत निवासी आणि व्यावसायिक दोन्ही प्रकारची होती. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या ११ गाड्या घटनास्थळी रवाना करण्यात आल्या. घटनास्थळी १० रुग्णवाहिकाही उपस्थित होत्या. त्यामुळे जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. अग्निशमन दलाच्या जवानांनी अनेक तासांच्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणली. या दरम्यान, अनेकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले, तर काही जण बेशुद्ध अवस्थेत आढळले. जखमींना डीआरडीओ रुग्णालय, उस्मानिया जनरल रुग्णालय आणि एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनीही या घटनेवर दुःख व्यक्त करत प्रशासनाला तातडीने मदतकार्य आणि जखमींना सर्वोत्तम वैद्यकीय सुविधा पुरवण्याचे निर्देश दिले आहेत. या दुर्घटनेमुळे हैदराबादमधील जुन्या शहर परिसरातील इमारतींच्या सुरक्षिततेबाबत **(पान २ वर)**

## सोलापुरातील टॉवेल कारखान्यात अग्नीतांडव, आठ जण दगावले!

**सोलापूर** : सोलापूर-अक्कलकोट महामार्गावर असलेल्या एमआयडीसीत पहाटे एका टॉवेल कारखान्यात लागलेल्या आगीवर तब्बल पंधरा तासानंतर नियंत्रण मिळवण्यात यश आले आहे. आगीत एकूण आठ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. माजी नगरसेवक बाबा मिस्त्री यांनी माहिती दिली की, सकाळपासून आम्ही आटोकाट प्रयत्न केले. मात्र आगीने भयंकर असे रौद्ररूप धारण केले होते. जवळपास एक हजार सेल्सिअस तापमान झाले होते. अशा स्थितीत सगळेच प्रयत्न निष्फळ झाले. सेंट्रल हॅण्डलूम टॉवेल कारखान्यात संपूर्ण कुटुंब आगीत भस्म झाले आहे. सोलापूरच्या इतिहासात आजपर्यंतची सर्वात भयावह घटना असल्याची माहिती नागरिकांनी दिली. बाबा मिस्त्री पुढे म्हणाले, कारखाना मालक हाजी उस्मान मंसुरी हे आपल्या कुटुंबाला वाचवण्यासाठी मास्टर बेडरूम मधील बाथरूममध्ये जाऊन लपले होते. दीड वर्षाचा नातू युसुफ याला काही होऊ नये, यासाठी त्यांनी मिठीत कवटाळून घेतले होते. मात्र भीषण आगीत उस्मान आहे त्या स्थितीत होरपळून मृत पावले. अनस मंसुरी आणि शिफा मंसुरी यांचा देखील होरपळून मृत्यू झाला आहे.

## रशियाचे २७८ ड्रोन युक्रेनमध्ये घुसले!

### आत्तापर्यंतचा सर्वात मोठा हल्ला



मॉस्को, दि. १७ वृत्तसंस्था

रशिया-युक्रेन युद्ध २०२२ पासून सुरू आहे. तेव्हापासून आत्तापर्यंत रशियाने युक्रेनवर सर्वात मोठा हल्ला चढवला आहे. रविवारी सकाळी हा हल्ला रशियाने ड्रोन्सच्या सहाय्याने केला. हा आत्तापर्यंतचा सर्वात तीव्र हल्ला आहे. यात सुमारे २७३ रशियन ड्रोन्स युक्रेनमध्ये घुसले.

दरम्यान, इस्तंबूलमध्ये झालेल्या रशिया-युक्रेन थेट चर्चे च्या अपयशानंतर रशियाकडून हा हल्ला करण्यात आला. या चर्चे त दोन्ही देशांमध्ये युद्धविराम घडवून आणण्यात अपयश आले. युक्रेनच्या हवाई दलानुसार, रशियाने एकूण २७३ स्फोटक ड्रोन आणि डमी ड्रोन प्रक्षेपित केले. यातील ८८ ड्रोन पाडण्यात युक्रेनला यश आले, तर १२८ ड्रोन इलेक्ट्रॉनिक जॅमिंगमुळे निष्क्रिय झाले, अशी माहिती देण्यात आली. हे हल्ले विशेषतः कीव्ह, द्निप्रोपेत्रोव्हस्क आणि दोनेत्स्क प्रदेशांवर झाले. युक्रेनच्या हवाई दलाच्या कम्युनिकेशन विभागाचे प्रमुख युरी इह्नाट यांनी सांगितले की, हा हल्ला पूर्णपणे युद्ध सुरू झाल्यापासूनचा सर्वात मोठा ड्रोन हल्ला आहे. रशियाचा याआधीचा सर्वात मोठा ड्रोन हल्ला युद्धाच्या तिसऱ्या वर्धापन दिनाच्या पूर्वसंध्येला झाला होता, तेव्हा २६७ ड्रोन युक्रेनवर डागण्यात आले होते. कीव्ह प्रांताचे राज्यपाल मायकोला कालाश्निक यांनी सांगितले की, ड्रोन हल्ल्यात २८ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला, तर ४ वर्षीय मुलासह तीन जण जखमी झाले. रशियन अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी युक्रेनचे अध्यक्ष वोलोडिमीर **(पान २ वर)**

## थोडक्यात

### ज्योती मल्होत्रासह ६ जणांना पोलीस कोठडी



**नवी दिल्ली :** हरियाणाची युट्यूबर ज्योती मल्होत्रासह ६ जणांना पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. पाकिस्तान उच्चायुक्तालयातील एका कर्मचाऱ्याशी झालेल्या भेटीप्रकरणी ज्योती मल्होत्राला आज, शनिवारी न्यायालयात हजर करण्यात आले होते. कोर्टाने ज्योतीला ५ दिवसांची पोलीस कोठडी ठोठावण्यात आली. यासंदर्भातील माहितीनुसार, पाकिस्तान उच्चायुक्तालयात तैनात असलेला पाकिस्तानी कर्मचारी एहसान उर रहीम उर्फ दानिश याने ज्योती मल्होत्राला जेवणासाठी आमंत्रित केले होते. यावेळी, दोघांमध्ये संभाषण झाले आणि युट्यूबरने त्याच्यासोबत एक व्हिडिओ देखील रेकॉर्ड केला. नंतर, दानिश आणि त्याचा मित्र अली एहसान यांनी ज्योतीची ओळख पाकिस्तानी गुप्तचर अधिकाऱ्यांशी (पीआयओ) करून दिली. ज्योतीने व्हॉट्सअॅप, टेलिग्राम आणि स्नॅपचॅट सारख्या एन्क्रिप्टेड ॲप्सवर जट्ट रंधावा नावाने सेव्ह केलेल्या नंबरवर शाकीर उर्फ राणा शाहबाजशी संवाद साधला.

### आकाश आनंद बसपाचे मुख्य राष्ट्रीय समन्वयक

**नवी दिल्ली :** बहुजन समाज पक्षाने (बसपा) पुन्हा एकदा आकाश आनंद यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवली आहे. आज झालेल्या बैठकीत बसपने आकाश आनंद यांना मुख्य राष्ट्रीय समन्वयक बनवण्याची घोषणा केली आहे. हे पद मिळाल्यानंतर आकाश आनंद आता पक्षाच्या निवडणूक प्रचाराची जबाबदारी घेतील. या बैठकीला बसपा प्रमुख मायावती देखील उपस्थित होत्या. गेल्या महिन्यातच उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री आणि बसपा प्रमुख मायावती यांनी पुन्हा एकदा त्यांचा पुतण्या आकाश आनंदला आपला उत्तराधिकारी म्हणून घोषित केले होते. त्या काळात मायावती यांनी पक्षातील चुका करणाऱ्यांना काढून टाकण्याच्या आणि दुरुस्तीनंतर त्यांना परत घेण्याच्या परंपरेबद्दल बोलताना पक्ष कार्यकर्त्यांना सांगितले होते की, आता त्यांनी आकाश आनंदला प्रोत्साहन दिले पाहिजे. वादांमुळे मायावतींनी यापूर्वी आनंद यांना पक्षातून काढून टाकले होते, परंतु माफी मागितल्यानंतर त्यांना पुन्हा बसपामध्ये समाविष्ट करण्यात आले.

## लष्कर-ए-तैयबाचा कुख्यात दहशतवादी सैफुल्ला खालिद ठार

नवी दिल्ली, दि. १७ वृत्तसंस्था

भारतात अनेक हाय-प्रोफाइल दहशतवादी हल्ल्यांचा कट रचल्याचा आरोप असलेला लष्कर-ए-तैयबाचा कुख्यात दहशतवादी सैफुल्ला खालिद पाकिस्तानच्या सिंध प्रांतात मारला गेला आहे. रविवारी सूत्रांनी ही माहिती दिली. त्याच्यावर काही अज्ञात हल्लेखोरांनी हल्ला केला. २००१ मध्ये रामपूर येथील सीआरपीएफ कॅम्पवर हल्ला, २००५ मध्ये बंगळुरूमधील इंडियन सायन्स काँग्रेस वर हल्ला आणि २००६ मध्ये नागपूरमधील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मुख्यालयावर हल्ला या तीन मोठ्या हल्ल्यांमध्ये खालिद प्रमुख सूत्रधार होता.



सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी पाकिस्तानच्या सिंध प्रांतातील बदिन जिल्ह्यातील माटली तालुक्यात त्याला ठार करण्यात आले. हा दहशतवाद्यांचा नेता लष्करच्या दहशतवाद्यांना नेपाळमार्गे भारतात घुसखोरी करण्यास मदत करत असे. त्यामुळे भारतीय भूमीवर लष्कर-ए-तैयबाच्या कारवायांमध्ये मोठी वाढ झाली होती. सैफुल्लाह भारताविरुद्ध अनेक दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी होता. सैफुल्ला उर्फ विनोद कुमार उर्फ मोहम्मद सलीम उर्फ खालिद उर्फ वनियाल उर्फ वाजिद उर्फ सलीम भाई अशी त्याची अनेक नावं आहेत. सैफुल्ला नेपाळमध्ये लष्कर-ए-तैयबाच्या संपूर्ण दहशतवादी मॉड्यूलचे व्यवस्थापन करत असे. सैफुल्लाहचे मुख्य काम लष्कराच्या दहशतवादी कारवायांसाठी कॅडर आणि आर्थिक मदत पुरवणे होते. सैफुल्लाने एका नेपाळी नागरिक महिलेशी लग्न देखील केले होते. तो लष्कर आणि जमात उद दावासाठी **(पान २ वर)**

## प्रशिक्षण जहाज ब्रुकलिन ब्रिजवर आदळले!



**न्यूयॉर्कमध्ये प्रवेश करत असताना मेक्सिकन नौदलाचे एक प्रशिक्षण जहाज ब्रुकलिन ब्रिजवर आदळले. या अपघातात जहाजाचा उंच भाग पुलाला धडकून डेकवर कोसळला. यात जहाजावरील दोन नौसैनिकांचा मृत्यू झाला आहे. तर १९ जण जखमी झाले आहेत.**

## पोप लिओ यांनी हाती घेतली 'कॅथोलिक चर्च'च्या पदाची सूत्रे

**सेंट पीटर्स स्वेअर :** पोप लिओ १४ वे यांनी आज कॅथोलिक चर्चचे नवीन पोप पदाची सूत्रे हाती घेतली. जगभरात शांतता प्रस्थापित करण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे पोप लिओ यांनी म्हटले आहे. सेंट पीटर्स स्वेअर येथे हजारो अनुयायांच्या उपस्थितीत झालेल्या समारंभामध्ये त्यांनी सर्वांना संवादाचा संदेश दिला. पोप लिओ यांनी पोप पदाचा आपला पहिला अधिकृत दौरा पियाझ्झामधून सुरू केला. पोप यांचा जागतिक समुदायाशी संपर्क आणि मध्यस्थी करणारा हा एक धार्मिक विधी समजला जातो. ट्रकच्या मागील भागात उभे राहून पोप लिओ यांनी समुदायाला अभिवादन केले. शपथविधीच्यावेळी पोप यांच्या खांद्यावर लोकरी शाल आणि बोटात मच्छिमारांची अंगठी घालण्यात आली. जगभरातील १.४ अब्ज चर्चची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आल्याचे हे निदर्शक प्रतिक आहे.

## आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या पाकिस्तानसाठी ११ नवीन अटी

इस्लामाबाद, दि. १७ वृत्तसंस्था

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकिस्तानच्या आर्थिक मदत योजनेच्या पुढील हप्त्यासाठी ११ नवीन अटी लावल्या असून भारताशी वाढलेल्या तणावामुळे या कार्यक्रमाच्या आर्थिक, बाह्य व सुधारणा उद्दिष्टांवर परिणाम होऊ शकतो, असा इशारा दिला आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या स्टाफ लेव्हल रिपोर्टमध्ये म्हटले आहे की, भारत-पाकिस्तान दरम्यान वाढलेला तणाव जर कायम राहिला किंवा




अधिक वाढला, तर पाकिस्तानच्या आर्थिक सुधारणांच्या कार्यक्रमावर गंभीर परिणाम होऊ शकतो.

नव्या ११ अटी : १७.६ ट्रिलियनचा नवीन बजेट संसदेमधून मंजूर करणे. **(पान २ वर)**

## अधिकाऱ्यांनी प्रोटोकॉल न पाळल्याने सरन्यायाधीश नाराज!

मुंबई, दि. १७ वृत्तसंस्था

भारताचे सरन्यायाधीश भूषण तथा बी. आर. गवई हे रविवारी मुंबईत आले. सरन्यायाधीश झाल्यानंतर ते प्रथमच मुंबईत आले. तथापि, या दौऱ्यात त्यांनी अधिकाऱ्यांच्या वर्तनावरून नाराजी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्रातील वरिष्ठ अधिकारी प्रोटोकॉलचे पालन करत नाहीत, याबद्दल मी निराश झालो आहे. जर भारताचा सरन्यायाधीश प्रथमच महाराष्ट्रात येत असेल, तर राज्याचे मुख्य सचिव, पोलिस महासंचालक आणि मुंबईचे पोलिस आयुक्त हे उपस्थित असणे अपेक्षित आहे.



त्यांची अनुपस्थिती विचार करायला लावते, अशा शब्दांत त्यांनी नाराजी व्यक्त केली. सरन्यायाधीश गवई रविवारी मुंबईत आले होते. महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिलने त्यांच्या सन्मानार्थ कार्यक्रमाचे आयोजन केले होते. मात्र त्यांना स्वागत करण्यासाठी राज्याचे मुख्य सचिव, पोलिस महासंचालक किंवा मुंबईचे पोलीस आयुक्त हजर नव्हते. या प्रोटोकॉलचा भंग झाल्याने सरन्यायाधीश गवई यांनी आपल्या भाषणात नाराजी व्यक्त केली. सरन्यायाधीश गवई यांनी पुढे म्हटले आहे की, न्यायपालिका, विधिमंडळ आणि कार्यपालिका हे लोकशाहीचे तीन प्रमुख स्तंभ आहेत. या सर्वांनी एकमेकांचा सन्मान करणे आवश्यक आहे. सभेला मराठीत संबोधित करताना सरन्यायाधीश गवई यांनी त्यांना मिळालेल्या प्रेम आणि स्नेहाबद्दल मनापासून आभार व्यक्त केले. याआधी त्यांनी चैत्यभूमीवर जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाला भेट दिली. भाषणाच्या दरम्यान सरन्यायाधीश गवई उपस्थित जनसमुदायाकडून मिळालेल्या प्रेमामुळे भावनाविवश झाले. त्यांनी म्हटले, मी सर्वांचा खूप आभारी आहे. मला जो प्रेम आणि सन्मान मिळाला आहे, त्याने मी भारावून गेलो आहे. गेले ४० वर्षे मला हा स्नेह मिळत आहे. आजचा कार्यक्रम माझ्यासाठी अविस्मरणीय आहे. माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी शब्द अपुरे पडत आहेत. १४ मे रोजी मी भारताच्या सरन्यायाधीशपदाची शपथ घेतली, तेव्हा महाराष्ट्राने माझ्यावर अपार प्रेम केलं. संपूर्ण राज्यातून लोकांनी तो सोहळा पाहण्याची इच्छा व्यक्त केली होती, **(पान २ वर)**

## भारताच्या चिकन्स नेकजवळ चीनचा शिरकाव!

### बांगलादेशातील जुना हवाई तळ पुन्हा केला सक्रीय

नवी दिल्ली, दि. १८ वृत्तसंस्था

**चीन बांगलादेशातील लालमोनिरहाट येथील दुसऱ्या महायुद्धात वापरल्या गेलेल्या जुन्या हवाई तळाचे पुनरुज्जीवन करण्यास मदत करत असल्याची माहिती आहे. हा हवाई तळ भारताच्या सीमेपासून केवळ १२-१५ किलोमीटर अंतरावर असून, सध्या बांगलादेश हवाई दलाच्या नियंत्रणाखाली आहे, परंतु गेल्या अनेक दशकांपासून निष्क्रिय आहे.**

हे ठिकाण भारताच्या सिलीगुडी कॉरिडॉरपासून केवळ १३५ किलोमीटर अंतरावर आहे ज्याला भारताचा 'चिकन'स्नेक' म्हटले जाते जो ईशान्य भारताचा मुख्य भूमीशी संपर्क राखणारा एक अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. अलीकडेच काही चिनी अधिकारी या ठिकाणी गेले होते, ज्यामुळे या ठिकाणामध्ये बीजिंगचा वाढता रस दिसून येतो. हवाईतळाचा नेमका उद्देश नागरी आहे की लष्करी, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही; पण या इतक्या जवळ चिनी उपस्थितीमुळे भारताच्या सामरिक असुरक्षिततेत वाढ होऊ शकते. हा हवाईतळ मूळतः १९३१ साली ब्रिटिशांनी बांधला होता आणि दुसऱ्या महायुद्धाच्या काळात दक्षिण-आशियातील मित्र राष्ट्रांच्या फॉरवर्ड बेस म्हणून वापरला जात होता अशी माहिती आहे. फाळणीनंतर पाकिस्तानने १९५८ मध्ये थोड्यावेळासाठी नागरी वापरासाठी तो पुन्हा सुरु केला. ११६६ एकरावर पसरलेल्या या विस्तीर्ण तळावर, चार किलोमीटरची धावपट्टी आणि मोठे टारमॅक असूनही, हा तळ उपेक्षितच राहिला आहे. २०१९ मध्ये, बांगलादेशच्या शेख हसीना सरकारने या ठिकाणी एक एव्हिएशन व एअरोस्पेस विद्यापीठ उभारण्याची घोषणा केली, जे आता बांगलादेश हवाई दलाच्या अंतर्गत कार्यरत आहे. अलीकडेच, मोहम्मद युनूस यांच्या आंतरिम प्रशासनाने लालमोनिरहाट आणि इतर पाच ब्रिटिशकालीन हवाईतळांचे पुनरुज्जीवन करण्याची योजना मांडली आहे आर्थिक प्रगतीस चालना देण्याच्या उद्देशाने. उर्वरित हवाईतळांमध्ये **(पान २ वर)**




### भारतासाठी धोकादायक

बांगलादेशाची चीन आणि पाकिस्तानची गट्टी भारतासाठी धोकादायक आहे. चिनी अधिकाऱ्यांच्या लालमोनिरहाट भेटीपूर्वी, एक पाकिस्तानी लष्करी-गुप्तचर प्रतिनिधी मंडळाने बांगलादेशातील काही सीमावर्ती भागांची पाहणी केली होती, इतिहासात, पाकिस्तानच्या गुप्तचर संस्थेचे भारतातील ईशान्य भागातील सशस्त्र फुटीरतावादी गटांशी संबंध होते. जे २००९ मध्ये अवामी लीग सरकारने कारवाई करत निष्क्रिय केले. लालमोनिरहाट येथील हवाई तळाचे पुनरुज्जीवन हे भारताच्या अत्यंत संवेदनशील सिलीगुडी कॉरिडॉरजवळ घडत आहे, आणि त्यामुळे भारताला सामरिक व राजकीय दोन्ही प्रकारची आव्हाने भेडसावू शकतात. चीनचा वाढता हस्तक्षेप आणि बांगलादेशातील बदलती राजकीय समीकरणे ही भारतासाठी सावधानतेचा इशारा ठरू शकते.

## १७ खासदारांना संसदरत्न पुरस्कार!

### सुप्रिया सुळेंसह सात खासदारांचाही होणार सन्मान



नवी दिल्ली, दि. १८ वृत्तसंस्था

संसदेत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या १७ खासदार आणि २ संसदीय स्थायी समित्यांची संसदरत्न पुरस्कार २०२५ साठी निवड करण्यात आली आहे. १७ खासदारांना संसदरत्न पुरस्कार देण्यात आला असून त्यामध्ये ७ महाराष्ट्रातील खासदारांचा समावेश आहे. हे पुरस्कार संसदेत सक्रिय सहभाग, वादविवादात सहभाग, प्रश्न विचारणे आणि कायदेविषयक कामात योगदान या आधारावर दिले जातात.

हा पुरस्कार प्राइम पॉइंट फाउंडेशनने सुरू केला आहे. या वर्षीच्या विजेत्यांची निवड हंसराज अहिर (अध्यक्ष, राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केली. ते म्हणाले की, लोकशाही बळकट करण्यासाठी संसदेत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या खासदारांना हे पुरस्कार दिले जातात. संसदीय लोकशाहीमध्ये त्यांच्या उत्कृष्ट आणि शाश्वत योगदानाबद्दल चार खासदारांना विशेष सन्मानित केले गेले. प्राइम पॉइंट फाउंडेशनच्या मते, हे चार खासदार १६ व्या आणि १७ व्या लोकसभेत संसदेत सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्यांपैकी एक आहेत आणि त्यांच्या सध्याच्या कार्यकाळातही ते सतत सक्रिय आहेत. १७ खासदारांची त्यांच्या उत्कृष्ट संसदीय कार्यासाठी निवड करण्यात आली आहे. यामध्ये अनेक राजकीय पक्षांचे प्रतिनिधी समाविष्ट आहेत. या खासदारांनी संसदेत प्रश्न विचारून, चर्चेत भाग घेऊन आणि विधेयकांवर सूचना देऊन महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

### या खासदारांना संसदरत्न पुरस्कार

भर्तृहरी महताब (भाजप), सुप्रिया सुळे (राष्ट्रवादी-सपा), एन. ऑफ. प्रेमचंद्रन (आरएसपी), श्रीरंग आप्पा बारणे (शिवसेना) स्मिता वाघ (भाजप), अरविंद सावंत (शिवसेना उद्धव ठाकरे गट), नरेश गणपत म्हस्के (शिवसेना), वर्षा गायकवाड (काँग्रेस), मेधा कुलकर्णी (भाजप), प्रवीण पटेल (भाजप), रवी किशन (भाजप), निशिकांत दुबे (भाजप), विद्युत बरन महतो (भाजप), पी. पी. चौधरी (भाजप), मदन राठोड (भाजप), सी.एन. अन्नादुराई (द्रमुक), दिलीप सैकिया (भाजप)

## पान 1 वरून...

### हैदराबादमधील चारमिनारजवळ ...

प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अशा प्रकारच्या दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने कठोर उपाययोजना करण्याची गरज आहे, अशी मागणी होत आहे. केंद्रीय मंत्री आणि राज्य भाजप अध्यक्ष जी. किशन रेड्डी यांनी घटनास्थळी भेट दिली आणि सांगितले की आग एका ज्वेलरी दुकानातून लागली. या दुकानाच्या वरच्या मजल्यावर दुकानाचे मालक त्यांच्या कुटुंबियांस राहत होते. ते म्हणाले, ही एक मोठी दुर्घटना आहे ज्यामध्ये अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत आणि काही जण जखमी झाले आहेत. मी कोणालाही दोष देत नाही, परंतु हैदराबाद ज्या पद्धतीने वेगाने विकसित होत आहे, त्यामुळे पोलिस, नगरपालिका, अग्निशमन आणि वीज विभागांना आणखी बळकटी देण्याची गरज आहे. पोलिस आणि अग्निशमन विभागाच्या प्राथमिक तपासानुसार, एसीमधील शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा संशय आहे. मात्र, चौकशी पूर्ण झाल्यानंतरच आग नेमकी कशामुळे लागली हे कळेल.

घटना खूप दुःखद- रेड्डी

केंद्रीय मंत्री जी किशन रेड्डी यांनी या घटनेवर दुःख व्यक्त केले आहे. ते म्हणाले की, अशा घटना खूप दुःखद आहेत. मी केंद्र सरकार आणि पंतप्रधान मोदींशी बोलेन आणि या घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेन. त्याचवेळी, मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी या घटनेवर दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी अधिकाऱ्यांना मदतकार्याला गती देण्यास आणि जखमींना सर्वोत्तम उपचार मिळावेत याची खात्री करण्यास सांगितले आहे.

मृतांच्या कुटुंबीयांना २ लाख रुपये

अग्निशमन विभागाचे म्हणणे आहे की आगीचे मुख्य कारण शॉर्ट सर्किट आहे, ज्याची सविस्तर चौकशी सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेवर शोक व्यक्त करत मृतांच्या कुटुंबीयांना पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येकी २ लाख रुपये आणि जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

### रशियाचे २७८ ड्रोन युक्रेनमध्ये घुसले!

झेलेन्स्की यांच्यासोबत तुर्कस्तानमध्ये थेट भेट घेण्याचा प्रस्ताव फ ेटाळला. युक्रेन आणि अमेरिका यांच्यासह इतर पाश्चिमात्य देशांनी ३० दिवसांच्या युद्धविरामाची मागणी केली होती. पुतिन यांनी अध्यक्ष पातळीवरील नव्हे, तर इतर थेट चर्चा करण्याची तयारी दर्शवली होती. शुक्रवारी इस्तंबूलमध्ये झालेली ही चर्चा दोन तासांपेक्षाही कमी वेळात संपली. युद्धविरामावर कोणतीही ठोस सहमती झाली नाही, मात्र दोन्ही देशांनी प्रत्येकी १००० युद्धकैद्यांची देवाणघेवाण करण्यावर सहमती दर्शवली. युक्रेनचे गुप्तचर प्रमुख क्यरिलो बुडानोव्ह यांनी शनिवारी युक्रेनच्या दूरदर्शनवर सांगितले की, ही देवाणघेवाण पुढील आठवड्यात होऊ शकते. दरम्यान, रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने सांगितले की, त्याच्या हवाई संरक्षण यंत्रणांनी शनिवारी रात्री युक्रेनचे ७ ड्रोन पाडले, आणि रविवारी सकाळी आणखी १८ ड्रोन निष्क्रिय केले.

### लष्कर-ए-तैयबाचा कुख्यात दहशतवादी सैफुल्ला खालिद ठार

भरती आणि निधी संकलनाचे काम करायचा. अलिकडेच त्याने पाकिस्तानच्या सिंध प्रांतातील बदिन जिल्ह्यातील माटली येथे आपले लपण्याचे ठिकाण बनवले होते. तिथून, तो लष्कर-ए-तैयबा, संयुक्त राष्ट्रांनी बंदी घातलेला पाकिस्तानी दहशतवादी गट आणि त्याची आघाडीची संघटना जमात-उद-दावासाठी काम करत होता. या संघटनांचा उद्देश दहशतवादी कारवायांसाठी भरती करणे आणि निधी उभारणे हा आहे.

### अधिकाऱ्यांनी प्रोटोकॉल न पाळल्याने सरन्यायाधीश ...

पण काही मर्यादांमुळे सर्वांना सहभागी करता आलं नाही. शनिवारी बार कौन्सिल ऑफ इंडिया च्या सन्मान सोहळ्यात बोलताना सरन्यायाधीश गवई म्हणाले की, न्यायाधीश जमीनीवरील वास्तवाकडे दुर्लक्ष करू शकत नाहीत. आजची न्यायपालिका मानवी अनुभवांची गुंतागुंत लक्षात न घेता केवळ कायद्याच्या काळ्या-पांढऱ्या चौकटीत प्रकरणे पाहण्याचा धोका पत्करू शकत नाही, असेही ते म्हणाले.

### आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या पाकिस्तानसाठी ११ नवीन ...

वीज बिलांवरील कर्जफेड अधिभार वाढवणे. ३ वर्षांहून जुनी वापरलेली गाड्या आयात करण्यावरची बंदी हटवणे. राज्यांकडून (प्रांतिक सरकार) कृषी उत्पन्न कराची अंमलबजावणी करदात्यांची नोंदणी, रिटर्न प्रक्रिया, जनजागृती मोहीम, अनुपालन सुधार योजना तयार करणे. मुदत जून २०२५. ‘‘ ‘‘ वर आधारित एक कारवाई योजना जाहीर करणे. २०२७ नंतरच्या कालावधीसाठी आर्थिक धोरणांची रूपरेषा तयार करणे व प्रकाशित करणे. वार्षिक वीज दर पुनर्निधारण जाहीर करणे मुदत १ जुलै २०२५. गॅस दरातील अर्धवार्षिक समायोजन जाहीर करणे मुदत १५ फेब्रुवारी २०२६. कायदा कायमस्वरूपी बनवणारा कायदा संसदेमधून मंजूर करणे मुदत मे २०२५ अखेर. ३.२१ प्रति युनिटची वीज अधिभार मर्यादा काढून टाकणारा कायदा संसदेमधून मंजूर करणे मुदत जून २०२५. व औद्योगिक पार्कसाठी दिल्या जाणाऱ्या सर्व प्रोत्साहन योजना २०३५ पर्यंत टप्प्याटप्प्याने पूर्णपणे बंद करण्याची योजना तयार करणे मुदत डिसेंबर २०२५. याशिवाय, ग्राहकांसाठी अनुकूल असलेल्या एका अटीत सांगितले आहे की, पाच वर्षांखालील वापरलेल्या गाड्यांच्या व्यावसायिक आयातीवरील सर्व प्रमाणात्मक निर्बंध हटवण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कायदेशीर प्रस्तावना जुलैअखेर संसदेत मांडावी. सध्या फक्त तीन वर्षांपर्यंतच्या वापरलेल्या कारच आयात करता येतात.

### भारताच्या चिकन्स नेकजवळ चीनचा शिरकाव...

इश्वर्दी, ठाकुरगाव, शमशेरनगर, कोमिल्ला आणि बोग्रा यांचा समावेश आहे. सिलीगुडी कॉरिडॉर, ज्याला ‘चिकन्स नेक’ म्हणतात, हा केवळ २२ किलोमीटर रुंद आहे आणि तो भारताच्या ईशान्येकडील आठ राज्यांना मुख्य भूमीशी जोडतो. या मार्गाचे संरक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. या मार्गावरील कोणतीही अडचण भारताच्या प्रादेशिक अखंडतेला धोका ठरू शकते. भारत-भूतान-चीन त्रिसंधी परिसरात चीनच्या वाढत्या लष्करी उपस्थितीमुळे आधीच तणाव निर्माण झाला आहे. २०१७ मधील डोकलाम संघर्षाने या मार्गाच्या असुरक्षिततेचे वास्तव दाखवून दिले आणि भारताला त्याचे संरक्षण अधिक बळकट करण्यास प्रवृत्त केले. बांगलादेशातील चीनचे वाढते अस्तित्व केवळ लष्करीच नाही, तर आर्थिकदृष्ट्याही स्पष्ट आहे. चीनच्या कंपन्या रंगपूरजवळ कारखाने व सौरऊर्जा प्रकल्प उभारत आहेत. एका ढाकास्थित पत्रकारानुसार, हे कारखाने जवळजवळ पूर्णपणे चिनी कर्मचाऱ्यांद्वारे चालवले जातात; स्थानिक मजुरांचा सहभाग फारच कमी आहे. चीन बांगलादेशात सीमावर्ती भागांत पायाभूत सुविधा आणि संपर्क प्रकल्पांमध्येही सक्रिय आहे.

# पीएमएलए कायदा ही यूपीएची चूक, कठोर तरतुदी रद्द करणे आवश्यक-शरद पवार

**मुंबई, दि. १८ वृत्तसंस्था**

संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या मंत्रिमंडळात मनी लॉडरिंग प्रतिबंधक (पीएमएलए) कायद्याला तीव्र विरोध केला होता. हा कायदा अत्यंत घातक आहे, राज्य बदलले की या कायद्याचा परिणाम आपल्यालाही भोगावा लागेल असे मी त्या वेळी निदर्शनास आणून दिले होते. पण माझे ऐकले गेले नाही. सत्ताबदल झाल्यावर त्याचा पहिला फटका माजी केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदम्बरम यांना बसला. विरोधकांना उद्ध्वस्त करणाऱ्या कायद्यातील कठोर तरतूद रद्द केली पाहिजे, असे स्पष्ट मत राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केले.

शिवसेना ठाकरे पक्षाचे नेते संजय राऊत यांना सक्तवसुली अंमलबजावणी संचालनालयाने अटक केल्यानंतर तुरुंगातील दिवसांच्या अनुभवावर ‘नरकातील स्वर्ग’



या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, ज्येष्ठ लेखक जावेद अख्तर, तृणमूल काँग्रेसचे खासदार साकेत गोखले यांच्या उपस्थितीत पार पडला.

केंद्रीय तपास यंत्रणांचा राजकीय हेतूने वापर करण्यात येत असल्याचा आरोप पवार यांनी केला. अंमलबजावणी संचालनालयाने केलेल्या तपासात संजय राऊत यांचा संबंध नसताना त्यांना गुंतवले गेले. सत्तेचा गैरवापर केला जात आहे. एका बांधकाम व्यावसायिकाला देण्यात आलेले ५८ कोटी रुपये प्रकरणांची माहिती राऊत यांनी केंद्रातील वरिष्ठ नेत्यांना दिली. त्यानंतर राऊत यांना अटक करण्यात आली. महाराष्ट्रात काही लोक चुकीचे काम करत होते, हे माहीत असताना त्यांच्यासंबंधी कारवाई होत नव्हती. राऊत यांनी लिहिलेल्या पुस्तकामुळे आम्हाला स्थिती कळली. ती स्थिती दुरुस्त करण्याचा विचार आज ना उद्या करावा लागेल. एकनाथ ख़डसे यांच्या जावयालाही अशाच प्रकारे अटक करण्यात आली होती, असेही पवार यांनी सांगितले.

विरोधकांना तुरुंगात टाकून सरकार चूक करीत आहे. तुरुंगात गेल्यानंतर विरोधक विचार करतात आणि ते सरकारला त्रासदायक ठरते. तुरुंगात आतापर्यंत महान साहित्य निर्माण झाले आहे. राऊत यांनी तुरुंगाबाहेरही लिहीत राहावे असे मत जावेद अख्तर यांनी व्यक्त केले. मला नेहमीच दोन्ही बाजूंकडून दोष दिला जातो.

## हिंगोलीच्या सेनगाव तालुक्यात मुसळधार पावसाचा फटका

### वीज पडून एका महिलेसह तीन प्राण्यांचा मृत्यू

**सेनगाव, दि. १८ वृत्तसंस्था**

सेनगाव तालुक्यात शनिवारी अवकाळी पावसासह विजेच्या कडकडाटाने तालुक्यातील एक महिलेचा मृत्यू झाला. तर चार जण गंभीररित्या जखमी झाले आहेत. यातच तीन पाळीव प्राण्यांचा मृत्यू झाल्याची घटना सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास घडली आहे. मुक्ताबाई रामगिरी गिरी असे मृतक महिलेचे नाव आहे.

सेनगाव तालुक्यात अवकाळी पावसासह विजेच्या कडकडाटाने थैमान घातले असून, या अवकाळी संकटाने अनेकांचे जीव जात आहेत. पाळीव प्राण्याचे मृत्यू होण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहे. तर शेतकऱ्याच्या पिकांचे नुकसानासह सर्वसामान्य नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. शनिवारी सायंकाळी साडेचार वाजण्याच्या



सुमारास सेनगाव तालुक्यात प्रचंड वाऱ्यासह अवकाळी मुसळधार पाऊस झाला. या पावसाने सुरुवात होताच विजेच्या कडकडाटाने शेतात काम करणाऱ्या महिलेचा अंगावर वीज पडून जागीच मृत्यू झाला.

दरम्यान, जाम शेत शिवारात रुक्मिणी मनोहर बंदुके या विजेच्या धक्क्याने गंभीर भाजून जखमी झाल्या असल्याने त्यांना उपचार कमी हिंगोली येथील जिल्हा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तर गर्भवती महिला अंकिता संतोष बोडखे यांना विजेची आस लागल्याने त्या चक्कर येऊन पडून जखमी झाल्या.

## राज्यातील लाडक्या बहिणींना २१०० रूपये लवकरच मिळणार- नीलम गोऱ्हे

**परभणी, दि. १८ वृत्तसंस्था**



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही महिलांच्या चांगलीच पसंतीस उतरली आहे. या योजनेतून महिलांना सध्या दरमहा १५०० रुपये दिले जात आहेत. त्यामुळे गरजू महिलांना मोठा दिलासा मिळाला आहे. ही रक्कम २१०० रुपयांपर्यंत वाढवण्याचा निर्णय महायुती सरकार योग्य वेळी घेईल. मात्र, विरोधक याबाबत जाणीवपूर्वक दिशाभूल करत असल्याचे विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी सांगितले.

उपसभापती नीलम गोऱ्हे या दोन दिवसांच्या परभणी दौऱ्यावर आल्या होत्या. शनिवारी त्यांनी परभणी येथे व्यंकटेश मंगल कार्यालयात आयोजित मेळाव्यात शिवसेना महिला आघाडी पदाधिकारी, लाडक्या बहिणींशी त्यांनी संवाद साधला. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी वार्तालाप केला. याप्रसंगी परभणी लोकसभा प्रमुख राजू कापसे, माजी खासदार सुरेश जाधव, जिल्हाप्रमुख आनंद भरोसे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

डॉ. गोऱ्हे यांनी सरकारी पैशांचा दुरुपयोग होऊ नये म्हणून लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांची पडताळणी सुरू आहे. प्रामाणिक लोकांनी यामुळे घाबरून जाण्याचे काहीच कारण नाही, असे स्पष्ट केले. महिलांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी सक्षम बनविणे आवश्यक आहे. महिलांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला असून, शिवसेना महिला आघाडीच्या वतीने विविध शिबिरे घेत आरोग्य सुविधा दिल्या जाणार आहेत.

पक्षातील पदाधिकाऱ्यांना सभासद नोंदणी मोहीम राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## मुंबई विमानतळावरून दोन दहशतवाद्यांना अटक

### एनआयएची मोठी कारवाई

**मुंबई, दि. १८ वृत्तसंस्था**

राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) मुंबई विमानतळावर दोन फरार इसिस स्लीपर सेल सदस्यांना अटक केली आहे. २०२३ मध्ये पुणे येथे आयईडी बनवण्याच्या आणि चाचणी करण्याच्या प्रकरणात हे दोघेही वाँटेड होते. अब्दुल्ला फयाज शेख आणि तल्हा खान अशी अटकेतील दहशतवाद्यांची नावे आहेत.

अब्दुल्ला फयाज शेख याला डायपरवाला म्हणूनही ओळखले जाते. तल्हा खानला इंडोनेशियातील जकार्ता येथील त्याच्या लपण्याच्या ठिकाणावरून परत येत असताना मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल २ वर इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी पकडले. यानंतर एनआयएने त्याला ताब्यात घेतले. हे दोन्ही आरोपी दोन वर्षांहून अधिक काळापासून फरार होते. मुंबईतील एनआयए विशेष न्यायालयाने त्याच्याविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट जारी केले होते. प्रत्येक आरोपीला अटक करण्यासाठी एजन्सीने ३ लाख रुपयांचे बक्षीसही जाहीर केले होते. दरम्यान, इसिसच्या पुणे स्लीपर सेलमधील या दोघांसह इतर आठ सदस्यांनी भारतात हिंसाचार पसरवून शांतता भंग करण्याचा आणि इस्लामिक राजवट स्थापन करण्याचा कट रचल्याचे तपासात उघड झाले.

### ताज हॉटेलला बॉम्बची धमकी

मुंबई विमानतळ आणि ताज हॉटेलला बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाली आहे. मुंबई एअरपोर्ट पोलिसांना हा धमकीचा ई-मेल आला. दहशतवादी अफजल गुरू आणि सैवक्कू शंकर याच्या फाशीचा बदला घेणारच असे या ईमेलमध्ये म्हटले आहे. या ई-मेलची मुंबईत पोलिसांनी तात्काळ दखल घेत तपासाला सुरुवात केली. या दोन्ही ठिकाणी सुरक्षा व्यवस्था वाढवली असून, अद्याप काही संशयास्पद सापडले नाही.

## राज्यात महिला आरक्षण शरद पवार यांच्यामुळेच-अजित पवार



**पुणे, दि. १८ वृत्तसंस्था**

महाराष्ट्रात महिला आरक्षणाची सुरुवात ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यामुळेच झाली. त्यांनी महिलांना सुरुवातीला ३३ टक्के आरक्षण दिले. महिला आरक्षणाचे विधेयक मान्य होणार नाही, तोपर्यंत सभागृहाचे कामकाज थांबणार नाही, अशी भूमिका मुख्यमंत्री असताना शरद पवार यांनी घेतली आणि हे विधेयक मान्य झाले, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी स्पष्ट केले.

जागतिक मातृदिनानिमित्त राष्ट्रशक्ती प्रतिष्ठान आणि यशवंत क्लासेसच्या वतीने ‘मातृनाम प्रथम’ या कार्यक्रमात पवार बोलत होते. आमदार भीमराव तापकीर, माजी महापौर दत्ता धनकवडे, माजी नगरसेवक प्रकाश कदम, युवराज बेलदरे, वर्षा तापकीर, राणी भोसले, अश्विनी भागवत, हर्षवर्धन पाटील, अभिनेता संकर्षण कऱ्हाडे या वेळी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, ‘ज्येष्ठ नेते शरद पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्या वेळी त्यांनी महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचे विधेयक आणले. महिला जर चूल आणि मूल आणि घर सांभाळू शकते, तर ती गाव, नगर परिषद, महापालिकादेखील सांभाळू शकते, असा विश्वास आम्हाला होता.

## साताऱ्यामध्ये वळवाची जोरदार हजेरी

**सातारा, दि. १८ वृत्तसंस्था**

सातारा शहर व परिसरात वळीव पावसाने दमदार हजेरी लावली. या पावसामुळे सातारा शहराला जोडणाऱ्या पुणे-बंगळुरू महामार्गावरील विसावा नाका चौकाला अक्षरशः तळ्याचे स्वरूप आले. या पाण्यात वाट काढताना दुचाकीस्वारांना अक्षरशः कसरत करावी लागली.चौकातील रस्त्याचा समतोल बिघडला आहे. शिवाय येथील गटारांची अद्याप स्वच्छता करण्यात आलेली नाही. त्यामुळे एखादा पाऊस झाला, तरी या चौकात पाण्याचे तळे साचते. दुपारी झालेल्या पावसानंतर अशीच परिस्थिती निर्माण झाली. पाण्याचा निचरा करणारी व्यवस्था कुचकामी ठरल्याने मुख्य चौकाला तळ्याचे स्वरूप आले.

## ठाकरेंचे निम्मे नगरसेवक शिंदे गटात; महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अस्वस्थता वाढली

**मुंबई, दि. १८ वृत्तसंस्था**

शिवसेना पक्षाची दोन शकले झाल्यापासून एकेक करीत सुमारे पन्नास टक्के माजी नगरसेवकांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षात प्रवेश केला आहे. महापालिकेची निवडणूक लवकरच होण्याची शक्यता असल्यामुळे माजी नगरसेवकांमध्ये अस्वस्थता वाढत चालली आहे. दुसरीकडे ठाकरेंनी उरलेल्या माजी नगरसेवकांची एकही बैठक गेल्या वर्षभरात बोलवली



नसल्यामुळे ते देखील नाराज आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका चार महिन्यांत पूर्ण करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यामुळे मुंबई महापालिकेच्या निवडणुकांची तयारीही प्रशासकीय पातळीवर सुरू झाली आहे. त्यामुळे या निवडणुकीला उभे राहण्यास इच्छुक असलेल्या माजी नगरसेवकांमध्ये अस्वस्थता वाढू लागली आहे. त्यातही गेली पंचवीस-तीस वर्षे मुंबई महापालिकेवर सत्ता गाजवलेल्या शिवसेनेत आता दोन गट पडल्यामुळे ही निवडणूक शिवसेनेच्या दोन्ही गटांसाठी महत्त्वाची आहे. शिवसेना (ठाकरे) पक्षातून गेल्या दोन अडीच वर्षात सातत्याने नगरसेवक बाहेर पडत असून त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षात प्रवेश केला आहे.

## सोलापूर एमआयडीसीतील कारखान्याला आग, ३ जणांचा मृत्यू

**सोलापूर, दि. १८ वृत्तसंस्था**

सोलापूरमधील अक्कलकोट एमआयडीसी परिसरातील एका कारखान्याला आग लागल्याची घटना घडली आहे. शनिवारी मध्यरात्री तीनच्या सुमारास लागलेल्या यात आगीत तिघे जण गंभीररित्या जखमी झाले होते. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. तर काही जण या आगीत अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे.


एमआयडीसीतील सेंट्रल टेक्सटाइल मिल या कारखान्यात टॉवेल तयार करण्याचे काम केले जायचे. टॉवेल तयार करण्याचे साहित्य कारखान्यात असल्याने आग वेगाने पसरत गेली. मध्यरात्री लागलेल्या आगीनंतर टॉवेल कारखान्यातून धुराचे लोट बाहेर पडू लागल्यानंतर एमआयडीसी परिसरात मोठा गोंधळ उडाला.या टेक्स्टाईल मिलचे मालक स्मानभाई मन्सूरी (वय ७८) आपल्या कुटुंबीयांसह कारखान्याच्या परिसरातच वास्तव्याल होते.

## बदलत्या हवामानामुळे आजार वाढले

**पंढरपूर, दि. १८ वृत्तसंस्था**

अलीकडील बदलत्या हवामानामुळे शहरातील शासकीय व खासगी रुग्णालयांत रुग्णांची संख्या लक्षणीय वाढली आहे. दिवसा प्रचंड उष्णता आणि रात्री गारवा यामुळे सर्दी, ताप, खोकला व अतिसार यासारख्या संसर्गजन्य आजारांनी नागरिक त्रस्त आहेत. गेल्या दोन दिवसांत अवकाळी पाऊस आणि ढगाळ हवामानानंतर तापमानात मोठ्या प्रमाणात चढ-उतार झाले. परिणामी, उपजिल्हा रुग्णालयात दररोज तपासणीसाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या १०० वरून १५० पर्यंत पोहोचली आहे.

सध्याच्या हवामानात विषाणूजन्य आजार झपाट्याने पसरतात. हे आजार श्वसनसंस्थेवर व पचनसंस्थेवर परिणाम करतात. वाढत्या उष्णतेने उष्माघाताची शक्यता असून मळमळ, उलटी, डोकेदुखी, त्वचा गरम होणे,



थकवा, चक्कर आणि डिहायड्रेशन ही लक्षणे असल्यास तातडीने वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.उन्हाची तीव्रता वाढत आहे. वाढत्या उन्हामुळे उष्माघाताचा धोका आहे. अशा परिस्थितीत उष्माघात होण्याची शक्यता असल्याने उष्माघातासारख्या परिस्थितीतून वाचण्यासाठी दक्षता घ्यावी, असे आवाहन आरोग्य तज्ज्ञांनी केले आहे.मळमळ, उलटी, थकवा येणे, त्वचा गरम होणे व कोरडी पडणे, क्वचित लाल होणे, डिहायड्रेशन, चक्कर येणे, डोके दुखणे, छातीत धडधड होणे, रक्तदाब वाढणे ही उष्माघाताची लक्षणे आहेत.

## उद्धव ठाकरे-राज ठाकरे युती होणार!

### आदित्य ठाकरेंचे सूचक संकेत

**मुंबई, दि. १८ वृत्तसंस्था**

गेल्या महिन्यात माजी मुख्यमंत्री आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्यातील संभाव्य युतीबाबत चर्चा तीव्र झाल्या. दोन्ही नेत्यांनी सूचक विधाने करून संभाव्य राजकीय समीकरणांकडे लक्ष वेधले होते. यानंतर, दोन्ही नेते परदेश दौऱ्यावर गेले, ज्यामुळे ही चर्चा थोडी मंदावली.

आता पुन्हा एकदा राज आणि उद्धव ठाकरे यांच्यातील संभाव्य युतीची चर्चा जोर धरत आहे. शिवसेना (ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी या संदर्भात आम्ही सकारात्मक असल्याचे म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्राच्या हितासाठी जो कोणी स्वच्छ मनाने सामील होऊ इच्छित



असेल, त्याला आम्ही सोबत घेऊ. अशी प्रतिक्रीया ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनीही राज ठाकरेंसोबतच्या संभाव्य युतीसंदर्भात दिली आहे.

आम्ही स्वच्छ हेतूने पुढे जात आहोत आणि कोणतेही सेटिंग राजकारण करणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. राजकारणात उत्तरे, टाळ्या, हे सगळं घडतच राहते, पण आपण महाराष्ट्राच्या भविष्याबद्दल बोलत आहोत. ज्यांना सोबत यायचे आहे, आम्ही त्यांना सोबत घेऊन जाऊ. आदित्य ठाकरे यांनी असेही म्हटले की, मी कोणत्याही एका पक्षाबद्दल बोलत नाहीये. त्यांच्या विधानावरून असे दिसून येते की ते त्यांचे काका राज ठाकरे यांच्यासोबतच्या युतीमध्ये सकारात्मक भूमिका बजावत आहेत.यापूर्वी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही संभाव्य नागरी निवडणुकांबाबत आपल्या कार्यकर्त्यांना महत्त्वाचे आदेश दिले होते. राज यांनी कार्यकर्त्यांना स्पष्टपणे सांगितले होते की त्यांनी कोणाशीही युती किंवा युती होण्याची वाट पाहू नये आणि निवडणुकीची तयारी सुरू करावी. यामुळे राज यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. राजकीय पक्षांचे नेते अडचणीत सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये नागरी निवडणुका घेण्याच्या चर्चे दरम्यान, राज ठाकरे यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांना युती किंवा युतीची वाट पाहू नका असे सांगितले आहे. मी बघतो काय करायचं ते, तुम्ही निवडणुकीची तयारी सुरू करा.

## थोडक्यात

### फर्टिलिटी क्लिनिकबाहेर भीषण बॉम्बस्फोट; १ ठार, ४ जखमी




**कॅलिफोर्निया :** कॅलिफोर्नियातील पाम स्प्रिंग्ज शहरात शनिवारी सकाळी एका फर्टिलिटी क्लिनिकच्या बाहेर बॉम्बस्फोट झाला. या स्फोटात एकाचा मृत्यू झाला, तर चार जण जखमी झाले. या घटनेला एफबीआयने अधिकृतपणे दहशतवादी कृत्य घोषित केले आहे. पाम स्प्रिंग्ज शहराच्या मध्यभागी सकाळी ११ वाजता (स्थानिक वेळेनुसार) स्फोट झाला, ज्यामुळे अनेक इमारतींच्या खिडक्या फुटल्या, अमेरिकन रिप्रोडक्टिव्ह सेंटर्सच्या इमारतीचा काही भाग कोसळला. हा स्फोट क्लिनिकच्या पार्किंग जवळ असलेल्या एका वाहनातून झाला. घटनास्थळी फक्त जळालेल्या कारचा ॲक्सल शिल्लक होता. मृत व्यक्ती कारजवळ होती, त्याची ओळख जाहीर केलेली नाही. () च्या च्या वृत्तानुसार, मृत व्यक्तीच स्फोट घडवणारा हल्लेखोर असावा, असा प्राथमिक संशय आहे. घटनास्थळावरून एके-४७ रायफल देखील जप्त करण्यात आली आहे.

एफबीआयच्या लॉस एंजेलिस कार्यालयाचे प्रमुख अकील डेव्हिस यांनी घटनास्थळी माध्यमांशी बोलताना, "ही घटना दहशतवादी कृत्य आहे. दक्षिण कॅलिफोर्नियामधील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या बॉम्बस्फोट प्रकरणांपैकी ही एक आहे." असे सांगितले. या हल्ल्याचा उद्देश अद्याप स्पष्ट झालेला नाही, मात्र क्लिनिक लक्ष्य करूनच हा स्फोट करण्यात आला, असेही डेव्हिस यांनी स्पष्ट केले. हल्ला देशांतर्गत होता की आंतरराष्ट्रीय, यावर एफबीआयनं अद्याप कोणतीही माहिती दिलेली नाही.

### एक देश, एक निवडणुकीमुळे खर्चात बचत; संसदीय समितीच्या अध्यक्षांचा दावा

**मुंबई :** विधानसभा आणि लोकसभा निवडणुका वेगवेगळ्या होतात, या निवडणुकांमध्ये आर्थिक व्यवहार ठप्प होतात आणि देशाच्या १.६ टक्के 'सकल राष्ट्रीय उत्पादना'स (जीडीपी ) त्याचा फटका बसतो. देशातील सर्व निवडणुका एकाच वेळी झाल्या तर सकल राष्ट्रीय उत्पादन साडेचार लाख कोटी रुपयांनी वाढेल, असा दावा 'एक देश एक निवडणूक'संदर्भात नेमलेल्या संसदेच्या संयुक्त समितीच्या अध्यक्षांनी शनिवारी केला.समितीने आपल्या मुंबई दौऱ्यात महाराष्ट्र शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह विविध राष्ट्रीय व प्रादेशिक राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, रिझर्व बँक ऑफ इंडियासह विविध बँका व विमा कंपन्यांशी विस्तृत सल्लामसलत केली. या चर्चेनंतर एक देश एक निवडणुक (समांतर) संदर्भात समिती अध्यक्ष खासदार पी. पी.चौधरी, खासदार धर्मेंद्र यादव व घनश्याम तिवारी यांनी माध्यमांशी संवाद साधला. स्वातंत्र्यानंतर १९५२, १९५७, १९६२ आणि १९६७ मध्ये लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी झाल्या होत्या. परंतु १९६८ आणि १९६९ मध्ये अनेक विधानसभा मुदतीपूर्वी विसर्जित झाल्या. त्यानंतर डिसेंबर १९७० मध्ये लोकसभाही विसर्जित करण्यात आली. त्यामुळे एक देश, एक निवडणुकीची परंपरा खंडित झाली. आज आम्ही एक देश एक निवडणुकीसंदर्भात आर्थिक संस्थांशी चर्चा केली.

### उपराज्यपालांचा सैनिकांशी संवाद

**कुपवाडा :** जम्मू-काश्मीरचे उपराज्यपाल मनोज



सिन्हा यांनी कुपवाडा येथे जाऊन तेथील सैनिकांची भेट घेतली आहे. त्यांनी कुपवाडा जिल्ह्याच्या तंगधर क्षेत्राचा दौरा शनिवारी केला. भारताच्या सिंदूर अभियानात पाकिस्तानने केलेल्या सततच्या गोळीबारामुळे या भागावर परिणाम झाला होता. येथील अनेक घरांची या गोळीबारात हानी झाली होती. मनोज सिन्हा यांनी या भागातील स्थानिक नागरीकांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. हानी किती प्रमाणात झाली आहे, याचा आढावा त्यांनी घेतला. या भागात घरांची हानी मोठ्या प्रमाणात झाल्याचे त्यांनी नंतर पत्रकारांशी संवाद साधताना स्पष्ट केले. आपल्या आढाव्याचा अहवाल ते केंद्र सरकार आणि केंद्रशासित प्रदेशाच्या सरकारला सादर करणार आहेत. सिन्हा यांनी कुपवाडा विभागातील सैनिक तळावर जाऊन तेथील सैनिकांचीही विचारपूस केली. पाकिस्तानच्या सातत्यपूर्ण हल्ल्यानंतरची या भागातील सेनातळाची कोणतीही हानी झालेली नाही. तथापि, ड्रोन्सचे भाग आणि हवेतच उडालेल्या क्षेपणास्त्रांचे भाग घरांवर पडून घरांची हानी झाली आहे. पाकिस्तानच्या गोळीबारात का भागातील काही नागरीकांना प्राण गमवावे लागले आहेत. उपराज्यपालांनी सर्व पिडितांची विचारपूस करुन त्यांना आणि कुटुंबियांना दिलासा दिला आहे.

# युद्धविराम अनिश्चित काळासाठी सुरूच राहणार

## अफवांकडे लक्ष देऊ नका; भारतीय लष्कराचे आवाहन

नवी दिल्ली, दि.१८ वृत्तसंस्था

भारत आणि पाकिस्तानमधील युद्धबंदी संपणार असल्याच्या बातम्या काही समाज माध्यांतून समोर येत आहे. याबाबत स्वत: भारतीय लष्कराने स्पष्टीकरण दिले आहे. भारत-पाकिस्तानमध्ये झालेल्या शस्त्रसंधीच्या उल्लंघन न करण्याच्या निर्णयानंतर आज हा युद्धविराम संपणार असून पुन्हा दोन्ही देशांत युद्धजन्य परिस्थिती निर्माण होईल, अशा प्रकारच्या चर्चा काही दिवसांपासून सुरू होत्या.

याबाबत भारतीय लष्कराकडून सांगण्यात आले की, "दोन्ही देशांच्या डिजीएमओंची कोणतीही नियोजित चर्चा आज होणार नाही. १२ मे रोजी झालेल्या शेवटच्या चर्चेत युद्धबंदीचा नियम आणि त्याबद्दलच्या अटी शर्थी या ठरवण्यात आलेल्या होत्या. तीच भारत-पाकिस्तानच्या डिजीएमओंची शेवटची चर्चा




होती. त्यावेळी युद्धविरामाला कोणतीही मुदत ठरवण्यात आलेली नव्हती. युद्धविराम अनिश्चित काळासाठी सुरूच आहे. त्यामुळे आज युद्धविराम संपणार या बातम्या पूर्णपणे चुकीच्या आहेत, अफवांकडे लक्ष देऊ नका," असे आवाहनही भारतीय लष्कराकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, ऑपरेशन सिंदूरनंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. पाकिस्तान सातत्याने भारतीय शहरांवर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी हल्ले करत होता, ज्याला भारतीय सैन्यही चोख प्रत्युत्तर देत होते. १० मे रोजी संध्याकाळी भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धबंदी करारावर स्वाक्षरी झाली.

त्यानंतर १२ मे रोजी दोन्ही देशांच्या डीजीएमओंमध्ये बैठक झाली, ज्यामध्ये युद्धबंदीबाबत अनेक मोठे निर्णय घेण्यात आले. तर भारत सरकारने दहशतवादाविरुद्ध सुरू असलेल्या लढाईबाबत भविष्यात कोणतीही दहशतवादी घटना झाल्यास भारताविरुद्ध युद्धाची कृती मानली जाईल, असा कडक संदेश दिला.

## जगासमोर पोलखोल टाळण्यासाठी पाकिस्तानही पाठविणार शांततेचे ढोंगी शिष्टमंडळ

### भारताच्या आंतरराष्ट्रीय मोहिमेची धास्ती!

इस्लामाबाद , दि.१८ वृत्तसंस्था

दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानची जगासमोर पोलखोल करण्यासाठी भारताची सर्वपक्षीय शिष्टमंडळे विविध देशांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. भारताच्या प्रत्येक राजनैतिक पावलांची नक्कल पाकिस्तान करत आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर जगभरात झालेल्या बदनामीनंतर पाकिस्तानने आता आपली प्रतिमेला वाचवण्यासाठी आंतरराष्ट्रीय मंचावर शांततेचा संदेश देण्याचा केविलवाणा प्रयत्न सुरू केला आहे.

पाकिस्तान पीपल्स पार्टी (पीपीपी) चे अध्यक्ष बिलावल भुट्टो झरदारी यांनी शनिवारी सांगितले की पाकिस्तानचे पंतप्रधान शेहबाज शरीफ यांनी भारत-पाकमधील तणावाच्या वाढत्या प्रकरणावर पाकिस्तानची बाजू मांडण्यासाठी शिष्टमंडळाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी त्यांना सोपवली आहे. पंतप्रधान शरीफ यांनी आज माझ्याशी संपर्क साधला, त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर शांततेसाठी पाकिस्तानची बाजू मांडण्यासाठी शिष्टमंडळाचे नेतृत्व करण्याची विनंती केली. ही जबाबदारी स्वीकारण्याचा आणि या आव्हानात्मक काळात पाकिस्तानची सेवा करण्यास वचनबद्ध राहण्याचा मला सन्मान वाटतो, असे झरदारी यांनी फेसबुकवरील पोस्टमध्ये म्हटले आहे.



भुट्टो झरदारी यांच्या शिष्टमंडळाला कठीण संघर्षाला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. कारण, दहशतवादाला आळा घालण्यात पाकिस्तानला अपयश आले आहे. ऑपरेशन सिंदूरला प्रत्युत्तर म्हणून भारतीय नागरिकांना लक्ष्य करून केलेल्या प्रत्युत्तरात्मक कृतींमुळे पाकिस्तानची विश्वासार्हता कमी झाली आहे.

#### पाकिस्तानने केली नक्कल?

ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानचा दहशतवादाशी असलेला संबंध जगासमोर उघड झाला. भारत सरकारने सर्व पक्षीय खासदारांची शिष्टमंडळे तयार करून जगभरातील प्रमुख देशांना भारताचा दहशतवादविरोधी संदेश पोहोचवण्याची घोषणा केली. यानंतर पाकिस्ताननेही घाईघाईने शांततेचा प्रचार करण्यासाठी शिष्टमंडळ पाठवण्याचा निर्णय घेतला आहे.

भारताच्या कारवाईमुळे पाकिस्तान दहशतवादाला दीर्घकाळापासून पाठिंबा देत असल्याची प्रतिमा अधिक स्पष्ट झाली आहे. कलंकित झालेली प्रतिष्ठा दुरुस्त करण्यासाठी पाक धडपडत आहे.

## 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये, किती विमाने गमावली- राहुल गांधी

नवी दिल्ली, दि.१८ वृत्तसंस्था

भारताने 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान किती लढाऊ विमाने गमावली, असा सवाल लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारला केला आहे. तसेच परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्या कथित वक्तव्याचा हवाला देत पाकिस्तानला हल्ल्यापूर्वी सरकारने माहिती का दिली, अशी विचारणाही त्यांच्याकडून करण्यात आली.

राहुल यांनी 'एक्स'वर परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांची चित्रफीत जोडलेल्या पोस्टद्वारे केंद्र सरकारवर प्रश्नांची फैर झाडली. 'ऑपरेशन सिंदूर'च्या सुरुवातीला पाकिस्तानला संदेश देण्यात



आला होता की दहशतवादी तळांवर हल्ला करण्यात येत आहे. हा हल्ला सैन्यावर नसल्याने यात हस्तक्षेप न करता तटस्थ राहण्याचा पर्याय पाकिस्तानी लष्कराकडे आहे. मात्र त्यांनी हा सल्ला न ऐकण्याचा पर्याय निवडला, असे परराष्ट्रमंत्री जयशंकर या चित्रफितीत बोलताना दिसतात. त्याआधारे राहुल गांधींनी म्हटले आहे की हल्ल्याच्या सुरुवातीस पाकिस्तानला माहिती देणे हा एक गुन्हाच होता.

## पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली हरियाणात तिसरी अटक

नवी दिल्ली, दि.१८ वृत्तसंस्था

हरियाणामधील यूट्यूबर ज्योती मल्होत्रा ऊर्फ ज्योती रानीला हेरगिरीच्या आरोपाखाली अटक झाल्यानंतर आता हरियाणामधून आणखी एका तरूणाला हेरगिरी केल्याबद्दल अटक करण्यात आली आहे. या आठवड्यातली ही तिसरी अटक आहे. राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित कारवाई हाती घेतल्यानंतर शनिवारी २६ वर्षीय तरूण अरमानला नूह पोलिसांनी अटक केली.

अरमानला नूह जिल्ह्यातील नगीना पोलीस ठाण्यात अटक झाली आहे. अरमान भारतीय सैन्य आणि इतर लष्करी कारवायांशी संबंधित संवेदनशील माहिती नवी दिल्लीतील पाकिस्तान उच्चायुक्तालयातील एका कर्मचाऱ्याला व्हॉट्सॲप आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून देत होता, असा आरोप पोलिसांनी केला आहे.

नूह पोलिसांच्या प्रवक्त्यांनी सांगितले की, अरमान मुळचा राजका गावातील रहिवासी आहे. हा विषय राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित असल्यामुळे आताच याबाबत अधिकची माहिती उघड करता येणार नाही. तसेच अरमानचा मोबाइल आणि इतर उपकरणांचे विश्लेषण करून माहिती गोळा केली जात आहे, असे पोलीस अधिकाऱ्याने द इंडियन एक्सप्रेसशी बोलताना सांगितले.

## नरक आणि पाकिस्तान असे दोनच पर्याय असतील तर मी नरक स्वीकारेन

### जावेद अख्तर यांचा घणाघात


मुंबई , दि.१८ वृत्तसंस्था

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते संजय राऊत यांच्या "नरकातला स्वर्ग" या पुस्तकाचे प्रकाशन शनिवारी मुंबईत झाले. या कार्यक्रमात बॉलिवूडमधील ज्येष्ठ गीतकार, कवी, पटकथाकार, संवेदनशील लेखक जावेद अख्तर देखील उपस्थित होते. यावेळी बोलताना जावेद अख्तर यांनी पाकिस्तानवर जहरी शब्दात टीका केली.

पाकिस्तान आणि नरक असे दोनच पर्याय असतील तर मी नरक स्विकारेन, अशा शब्दात जावेद अख्तर यांनी पाकिस्तानमधील परिस्थितीची लक्तरे वेशीवर टांगली. त्यांच्या या वक्तव्याचे नेटीझन्समधून स्वागत होत आहे.

पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात बोलताना जावेद अख्तर यांनी आपल्या वक्तव्यांमुळे आणि खुले विचार मांडल्यामुळे हिंदू आणि मुस्लिम दोन्ही बाजूंनी आपल्यावर होणाऱ्या टीकेबद्दल भाष्य केले.

जावेद अख्तर म्हणाले, "दोनही बाजूंकडून मला शिव्याशाप मिळतात. एक मला काफिर म्हणतो आणि नरकात जाशील असं म्हणतो. तर दुसरा मला जिहादी म्हणतो आणि पाकिस्तानला निघून जा असं सांगतो. त्यामुळे जर माझ्याकडे नरक किंवा पाकिस्तान, फक्त हे दोनच पर्याय असतील, तर मी नरकात जाणं पसंत करीन."अख्तर पुढे म्हणाले, "दोनही बाजूंनी मला टीका सहन करावी लागते. हे एकतर्फी नाही. मी



हे मान्य न केल्यास मी कृतघ्न ठरीन. कारण खूप लोक माझं समर्थनदेखील करतात, माझं कौतुक करतात, प्रोत्साहन देतात.पण हेही तितकंच खरं आहे की दोन्ही बाजूंतील अतिरेकी विचारसरणीचे लोक मला शिव्या घालतात. हीच वास्तव परिस्थिती आहे. जर त्यांपैकी एक जरी गप्प झाला, तरी मला वाटेल की मी कुठेतरी चूक केली असावी." २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात सहभागी दहशतवादी अजूनही पाकिस्तानमध्ये मुक्तपणे फिरत आहेत, असे वक्तव्य जावेद अख्तर यांनी चक्क पाकिस्तानात लाहोरमध्ये केले होते. या वक्तव्यामुळे पाकिस्तानात मोठी प्रतिक्रिया उमटली. अनेक पाकिस्तानी कलाकार आणि पत्रकारांनी त्यावर टीका केली, पण भारतात मात्र त्यांच्या स्पष्टवक्तेपणाचं स्वागत झालं होतं.जावेद अख्तर त्यांच्या विचारी आणि बिनधास्त मतांसाठी ओळखले जातात. त्यांच्या लिखाणातून दिसते की ते चिकित्सक आणि अभ्यासू आहेत. आपली मते मांडताना ते अजिबात कुणाची भीडमुर्वत बाळगत नाहीत.

धर्माविषयीदेखील बोलताना ते कठोर शब्दात त्यातील कर्मकांडांवर प्रहार करतात. त्यामुळे कधीकधी ते कट्टर धार्मिक विचारसरणी असणाऱ्यांच्या टीकेच्या रडारवरही येतात.

## इस्रोच्या १०१ व्या मोहिमेचे तिसऱ्या टप्प्यातील उड्डाण तांत्रिक अडचणीमुळे अयशस्वी

श्रीहरिकोटा, दि.१८ वृत्तसंस्था

भारतीय अंतराळ संसोशन संस्था म्हणजेच इस्रोच्या १०१ व्या मोहिमचे उड्डाण तांत्रिक अडचणीमुळे अपयशी ठरले आहे. श्री हरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास पीएसएलव्ही उपग्रहाने उड्डाण केले. मात्र, प्रेक्षपणानंतर तो ठरेलेल्या कक्षेत पोहेचू शकला नाही. यामुळे इस्रोची १०१ वी मोहिम अयशस्वी ठरल्याची माहिती इस्रोने दिली आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास उपग्रहाचे प्रक्षेपण झाले. सतीश धवन अंतराळ केंद्रातून झालेले हे १०१ वे प्रक्षेपण होते. प्रक्षेपणानंतर इस्रोच्या अध्यक्षांनी सांगितलं की, या उपग्रहाच्या प्रक्षेपणाचे पहिले दोन टप्पे ठरल्यानुसार पार पडले.मात्र, तिसऱ्या टप्प्यात तांत्रिक अडचणी आल्या. तिसऱ्या टप्प्यात इंजिन सुरू झाले पण तांत्रिक अडथळ्यामुळे मोहिम पूर्ण होऊ शकली नाही. तांत्रिक अडथळे दूर करून पुन्हा प्रयत्न करणार असल्याचे इस्रोचे डॉ. व्ही. नारायणन यांनी सांगितले.

या मोहिमेअंतर्गत, -०९ (पृथ्वी निरीक्षण उपग्रह-०९) पृथ्वीच्या सूर्य समकालिक कक्षेत () ठेवले




जाणार होते. विविध क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना अचूक आणि नियमित डेटा मिळावा यासाठी रिमोट सेन्सिंग डेटा प्रदान करणे हा त्यामागचा उद्देश होता. दिवसा आणि रात्री तसेच सर्व परिस्थितीत पृथ्वीच्या पृष्ठभागाचे उच्च-रिझोल्यूशन प्रतिमा प्रदान करण्यासाठी हे डिझाइन केले होते. प्रगत रडार इमेजिंग तंत्रज्ञानामुळे ढग, धुके किंवा अंधार यासारख्या प्रतिकूल परिस्थितीतही अचूक आणि उच्च-गुणवत्तेच्या प्रतिमा कॅप्चर करता येतात.

#### मोहिमेचा फायदा काय?

देशाच्या संरक्षण उपक्रमांसाठी महत्त्वाची माहिती प्रदान करण्याच्या उद्देशाने -०९ ची रचना करण्यात आली आहे. यामुळे सीमांवर देखरेख, संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे आणि धोरणात्मक क्षेत्रांचे मॅपिंग करण्यास मदत मिळणार आहे. त्याची उच्च-रिझोल्यूशन इमेजिंग क्षमता सैन्याला महत्वाची माहिती प्रदान करण्यात उपयुक्त ठरणार असल्याचे सांगितले जाते.

## हार घालताच तरुणाचा मृत्यू; वरातीऐवजी निघाली अंत्ययात्रा

बागलकोट, दि.१८ वृत्तसंस्था

कर्नाटकात एका २६ वर्षीय तरुणाचा लग्नाचे विधी सुरू असतानाच हृदयविकाराच्या झटक्यानं मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडलीय. बागलकोट तालुक्यातल्या जामखंडी शहरात शनिवारी प्रवीण कुर्ने याचा लग्नसोहळा सुरू होता. वधूला मंगळसूत्र घातल्यानंतर वधु-वर एकमेकांना हार घालण्याचा विधी सुरू होता. यावेळी प्रवीणच्या छातीत दुखायला लागलं आणि तो स्टेजवर कोसळला. यानंतर त्याला रुग्णालयात नेण्यात आलं. मात्र उपचाराआधीच त्याचा मृत्यू झाला होता.



याबाबत मिळालेली माहिती अशी की, प्रवीण कुर्ने हा कुम्बरेहळ्ळी गावचे रहिवासी होता. तो कर्नाटक सायकलिंग असोसिएशनचे राज्य सचिव श्रीशैल कुर्ने यांचा मोठा मुलगा होता. एका खासगी बँकेत नोकरी करत असल्याने ते जामखंडीत राहत होते.

तर विवाह सोहळा नंदिकेश्वर कल्याण मंडप इथं सुरू होता.विवाहाचे सर्व विधी आनंदाने पार पडत होते. नव्या आयुष्याची सुरुवात होणार होती. त्याचवेळी नियतीने डाव टाकला आणि प्रवीणच्या संसाराचा मांडलेला खेळ मोडला. मंगळसूत्र बांधल्यानंतर, नवविवाहित जोडपे पारंपरिक विधीसाठी स्टेजवर उभे होते. तेव्हा प्रवीणच्या छातीत दुखायला लागलं. त्यानंतर काही क्षणांतच प्रवीण खाली कोसळला.प्रवीणच्या अकाली मृत्यूनं लग्नसोहळ्यातील आनंदाचं वातावरणच बदलून गेलं. अवघ्या काही मिनिटातच नववधू विधवा झाली. ज्याच्यासोबत आयुष्य जगण्याचं स्वप्न पाहिलं तो लग्नमंडपातच जग सोडून गेला.

## यूट्यूबर ज्योती मल्होत्रा पाकिस्तानला गुप्त माहिती कशी पुरवत होती?

नवी दिल्ली, दि.१८ वृत्तसंस्था

ऑपरेशन सिंदूर आणि शस्त्रविरामानंतर भारतीय सुरक्षा यंत्रणांनी देशाअंतर्गत कारवाईला सुरुवात केल्याचे दिसत आहे. मुंबई विमानतळावर शनिवारी (१७ मे) इसिसच्या दोन संशयित स्लीपर सेल्सच्या सदस्यांना अटक करण्यात आली. तसेच हरियाणामधून पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्या सहा लोकांना ताब्यात घेण्यात आले. यापैकीच एक आहे यूट्यूबर ज्योती मल्होत्रा. ज्योतीला हिसारच्या सिव्हिल लाईन्स पोलिसांनी अटक केली असून तिच्याविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ज्योती मल्होत्रा पाकिस्तानमधील गुप्तचर अधिकाऱ्यांच्या संपर्कात होती आणि राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण होईल, असे कृत्य तिने केल्याचे समोर येत आहे.

ज्योती मल्होत्रा ऊर्फ ज्योती रानी यूट्यूबवर ट्रॅव्हल विथ जो हे चॅनेल चालवते. ज्याचे ३,८०,०० सबस्क्राइबर आहेत. तर इन्स्टाग्रामवर तिचे १,३२,००० फॉलोअर्स



आहेत. ज्योतीने दोन वेळा पाकिस्तानला भेट दिल्याचे उघड झाले आहे. पाकिस्तान भेटीदरम्यान तिने 'इंडियन गर्ल इन पाकिस्तान', 'इंडियन गर्ल एक्सप्लोरिंग लाहोर', 'इंडियन गर्ल ॲट काटस राज टेम्पल' आणि 'इंडियन गर्ल राईड्स लक्झरी बस इन पाकिस्तान' असा नावाने काही व्हिडीओ तयार केले आहेत.

ज्योती मल्होत्राला अटक झाल्यानंतर आता तिच्या जुन्या फोटो आणि व्हिडीओवरून काही अंदाज बांधले जात आहेत. सोशल मीडियावर अनेकजण तिचे जुने फोटो शेअर करत आरोप करत आहेत. तिचा पहलगाम भेटीचा एक फोटो एका युजरने शेअर केला आहे. ज्योतीने पहलगामची रेकी केली होती का? असा प्रश्न या युजरने उपस्थित केला आहे.आणखी एका युजरने, यूट्यूबरचाही हेरगिरी करण्यासाठी कसा वापर होऊ शकतो, याची ढोबळ माहिती दिली आहे. व्लॉगरच्या मदतीने लष्करी तळ, सीमाभाग, विमानतळ, रेल्वे स्थानक आणि महत्त्वाच्या ठिकाणांचे व्हिडीओ तयार करून त्याद्वारे माहिती गोळा केली जाऊ शकते. यातून शत्रुला भौगोलिक परिस्थितीची आणि सैन्याच्या हालचालीची माहिती मिळू शकते.याच युजरने गुजरातमधील माणसाचे उदाहरण दिले आहे. ज्याने स्वतःला पीएमओ कार्यालयातील अधिकारी असल्याचे सांगून जम्मू-काश्मीरमध्ये कमांडोची सुरक्षा मिळवून भ्रमंती केली होती. याचप्रकारे यूट्यूबर आणि व्लॉगर्सना संवेदनशील ठिकाणांचा व्हिडीओ करण्याची मुभा मिळते, याकडे या युजरने लक्ष वेधले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्योती मल्होत्रा पाकिस्तानी गुप्तचर संस्थेमधील अधिकाऱ्यांच्या संपर्कात होती आणि व्हॉट्सॲप, टेलिग्राम आणि स्नॅपचॅट सारख्या ॲप्सचा वापर करून ती भारतातील संवेदनशील माहिती पुरवत होती. पाकिस्तानचे गुप्तचर विभागातील अधिकारी शाकीर आणि राणा शाहबाज यांचाही फोन नंबर ज्योतीच्या मोबाइलमध्ये सेव्ह असल्याचे दिसून आले आहे. कुणाला संशय येऊ नये म्हणून हे मोबाइल नंबर तिने जट रंधावा या नावाने सेव्ह केले होते.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## न्यायालय आणि राष्ट्रपती दरम्यानचा संघर्ष!

राज्यघटनेने कायदे मंडळ, न्याय मंडळ आणि कार्यकारी मंडळाचे अधिकार, त्यांच्या कार्यकक्षा ठरवून दिल्या आहेत. परस्परांनी एकमेकांच्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप करू नये, असे अभिप्रेत असते. भारतीय राज्यघटना जगातील सर्वात मोठी लिखित घटना असली, तरी त्यात काही संदिग्ध बाबी असतात. न्याय यंत्रणा त्याचा दुरुपयोग करीत नसली, तरी अशा संदिग्धतेचा गैरफायदा अन्य यंत्रणा घेत असतात. देशात एक सरकार असले आणि राज्यांत विरोधी पक्षांची सरकारे असली, की केंद्र राज्यांची राज्यपालांच्या माध्यमातून अडवणूक करते. राज्यांनी मंजूर केलेली विधेयके राज्यपाल अडवून धरतात. विधान परिषदेच्या सदस्यांच्या नियुक्त्या वर्षानुवर्षे केल्या जात नाहीत. महाराष्ट्रासारख्या राज्यात भगतसिंह कोश्यारी यांना उच्च न्यायालयाने निर्देश देऊनही त्यांनी कसे पालन केले नव्हते, हे देशाने अनुभवले आहे. आरिफ मोहम्मद खान, नजीब जंग, जगदीप धनखड, व्ही. के. सक्सेना, किरण बेदी आदी राज्यपालांनी संबंधित राज्यांची अडवणूक केली होती. लोकनियुक्त सरकार हे राज्यपालांपेक्षा मोठे असले, तरी सरकारला कामच करू द्यायचे नाही, असा चंग यापैकी काही राज्यपालांनी बांधला होता. त्यामुळे राज्य सरकारांनी राज्यपालांच्या विरोधात उच्च न्यायालयात आणि नंतर सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. सर्वोच्च न्यायालयाने कोणत्याही विधेयकावर किंवा प्रस्तावावर हो किंवा नाही, असा निर्णय ठराविक कालावधीत घ्यावा, असे निर्देश दिले. वास्तविक यात काहीच वावगे नाही. काय निर्णय घ्यायचा याचे अधिकार राज्यपालांना आणि राष्ट्रपतींना कायम आहेत; परंतु निर्णय ठराविक कालावधीत घेण्यास न्यायालयाने सांगितले. त्यामुळे राज्यपालांना आणि उपराष्ट्रपतींना आपल्या निर्णयात हा हस्तक्षेप वाटला. सर्वोच्च न्यायालय मर्यादाभंग करीत असल्याची ओरड केंद्राची पालखी वाहणाऱ्या अनेक राज्यपालांनी केली. धनखड यांनी तर वारंवार संसद सर्वोच्च आहे, असे सांगितले. वास्तविक सर्वोच्च न्यायालयानेच अनेक निर्णयात संसद सर्वोच्च असल्याचे म्हटले आहे. अनेक प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाकडे आदेश देण्याची मागणी करणाऱ्या याचिका केवळ कार्यकारी मंडळाच्या आणि कायदे मंडळाच्या अधिकारात हस्तक्षेप करण्यास नकार देत फेटाळून लावण्यात आल्या होत्या; परंतु पुरेपूर राजकारण अंगी भिनलेले राज्यपाल आणि घटनात्मक पदावरील काही व्यक्तींनी सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेली कालमर्यादा अव्हेरली. सर्वोच्च न्यायालयाने तमिळनाडू प्रकरणात दिलेल्या निकालावर आता राष्ट्रपतींनी काही प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा घटनात्मक प्रमुख आणि सर्वोच्च न्यायालयात पेच निर्माण झाला आहे. अर्थात राष्ट्रपतींनी प्रथमच प्रश्न उपस्थित केले आहेत, असे नाही. या वेळच्या प्रश्नांचे स्वरुप वेगळे असून, नव्याने सरन्यायाधीश झालेल्या भूषण गवई यांच्यापुढे आता हा पेच मिटविण्याचे आव्हान आहे. सर्वोच्च न्यायालयाने आठ एप्रिल रोजी दिलेल्या निर्णयावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आक्षेप घेतला आहे. त्यात देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने राज्य विधानसभांनी मंजूर केलेल्या विधेयकांवर कारवाई करण्यासाठी राष्ट्रपती आणि राज्यपालांना अंतिम मुदत दिली होती. यानंतर, राष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालयाला १४ प्रश्नांद्वारे संविधानाचा अर्थ लावण्याची विनंती केली आहे. या विषयावर सुमारे महिनाभर जोरदार चर्चा झाली. यामध्ये केंद्र सरकारचे विविध विभाग, ॲटर्नी जनरल आर. वेंकटरमणी, सॉलिसिटर जनरल तुषार मेहता आणि कायदा मंत्रालयाच्या विधिमंडळ शाखेत चर्चा झाली. यानंतर राष्ट्रपतींचा संदर्भ तयार करण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाने आठ एप्रिल रोजी दिलेल्या निर्णयाची प्रत केंद्र सरकारला १२ एप्रिल रोजी मिळाली. यानंतर असा निर्णय घेण्यात आला, की त्याचा आढावा घेतला जाणार नाही, तर राष्ट्रपतींमार्फत न्यायालयाकडून मार्गदर्शन मागविले जाईल. याअंतर्गत, वरिष्ठ कायदा अधिकाऱ्यांच्या पथकाने निर्णयामुळे उद्भवणारे कायदेशीर प्रश्न ओळखण्यास सुरुवात केली. सुरुवातीला अनेक प्रश्नांवर विचार करण्यात आला आणि नंतर ते संकलित केल्यानंतर अंतिम मसुदा ७ मे रोजी सरकारला सादर करण्यात आला. त्यानंतर हा दस्तावेज राष्ट्रपती सचिवालयात पाठविण्यात आला आणि १४ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रीमध्ये दाखल करण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाने तामिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी यांना फटकारले होते, की त्यांनी विधिमंडळाच्या इच्छेला अडथळा आणण्याचा प्रयत्न केला. न्यायालयाने राज्यपालांच्या १० पुनर्संमत विधेयकांना राष्ट्रपतींकडे पाठविण्याच्या निर्णयाला बेकायदेशीर घोषित केले होते. न्यायालयाने स्पष्ट केले, की जर राज्यपालांना कोणतेही विधेयक प्राप्त झाले, तर त्यांना एका महिन्याच्या आत त्यांची संमती, असहमती किंवा राष्ट्रपतींकडे पाठवावी लागेल. जर मंत्रिमंडळाच्या सल्ल्याविरुद्ध निर्णय घेतला, तर ते तीन महिन्यांच्या आत विधानसभेत परत करावे लागेल. या निर्णयात, ही कालमर्यादा राष्ट्रपतींनाही लागू करण्यात आली होती. राष्ट्रपतींनाही तीन महिन्यांच्या आत निर्णय घ्यावा लागेल, अन्यथा त्यांना कारणे द्यावी लागतील. राष्ट्रपतींच्या संदर्भात विचारण्यात आलेल्या १४ प्रश्नांमध्ये भारतीय संविधानातील अनेक कलमांचा अर्थ लावण्याची मागणी करण्यात आली आहे. राष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालयाला विचारलेल्या प्रश्नांवर विचार करण्यासाठी सर्वोच्च न्यायालय पाच न्यायाधीशांचे एक घटनापीठ स्थापन करेल आणि प्रश्नांची उत्तरे देणे, ते नाकारणे किंवा राष्ट्रपतींना प्रश्न पुन्हा तयार करण्यास सांगणे हे न्यायालयाच्या विवेकबुद्धीवर अवलंबून असेल. राष्ट्रपतींच्या १४ प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी आता सरन्यायाधीश गवई यांना किमान पाच न्यायाधीशांचे संविधान खंडपीठ स्थापन करावे लागेल.

### शिष्टमंडळ






लक्ष्यभेद
जयदीप सोनखासकर
9890508017

ऑपरेशन सिंदूरची
जगात देण्या माहिती
केली शिष्टमंडळाची
निवड ही एकहाती

काँग्रेसची ती नावे
भाजपाने गुंडाळली
सर्व पक्षीय नावाने
पुन्हा बोंबच झाली

सैन्याचा पराक्रम
जगाला सांगणार
पाक चा समाचार
थरूर का घेणार?

### ।। अभंगवाणी ।।

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१



अभंग म्हणजे
कधी न भंगणे ।
शुद्ध तू असणे
परिपूर्ण ।।

आतून मलिन
विचार नसणे ।
आतून असणे
नेतल तू ।।

नेतल विचार
समृध्द असती ।
प्रगत करती
देशास हो ।।

नेतल असावे
अपुले विचार ।
मनी सदाचार
ठेवुनिया ।।

# कितिक पिवसान बापहो?



कानोसा

विद्या भगतसिंग राणे
अकोला, 8888509456



येच्याआंदी आपून आपल्या लेखाईतून शाळेत होनारं गदरींग न् चांगल्या शिक्षनासाटी प्रायव्हेट शिकवन्या म्हंजे ट्यूशन क्लासेस यातून विद्यार्थ्यांईच्या पालकाईले जो आर्थिक तरास होते त्याचा हिसोब घेतला होता.आता आपुन प्रत्यक्ष शाळेच्या शिक्षनातून बी पालक कशे काय पियल्या जातात ते पाहू!

आपलं घोळं दुनियेच्या शर्यतीत मांगं राहू नोय म्हनून सा-याच मायबापाची मरमर असते. त्यासाटी वखद पळ्ला तं बिचारे उपाशी राहाले बी मांगं पुळं पायत नाईत. आपले उली-उली लेकरं साजरे शिस्तीत येखांदी इंग्रजीतली प्रार्थना म्हंतानी पाऊन त्याईले जन्म सफल झाल्यावानी वाट्टे. चांगलं शिक्षन याच लान लान गोठीतून दिसून पळते हे खरं हाये.पन मायबापाचा यात अक्षरशः उसासारका चेंदामेंदा करून त्याईले हुईन तितलं या शिक्षनव्यवस्थेनं पियनं लावलं.कसं?? शाळेतनी अनेक वैयक्तिक संस्थाईकून स्पर्धा घेतल्या जातात. आलिम्पियाडसारक्या हजारो रूपये फी उकळून चार रूपयाचं मेडल देना-या परिक्षा कायले शाळाईनं कायले पायजे? स्कालरशिप, नवोदय विद्यालय,अशा परिक्षा असताताच ना! अल्लग अल्लग कोर्सेस चं एंडोर्समेंट म्हंजे जाहिरातबाजी शाळेत काहाले पायजे? शाळा उन्हायात रिकामी राहू नोय म्हनून समर कॅम्प! काईबी शिकवाचा धंदा सायाचा! शाळेतला विद्यार्थी पुळे उद्योगधंदा करून आपल्या पायावर उभा राहाव म्हनून न्या-या न्या-या स्पर्धा घेतल्या जातात. शाळेतल्या आनंदमेल्यात खायच्या पदार्थाचे, खेळाचे, कलाकुसरीच्या वस्तूचे स्टाल लावातंत.त्यातल्या टेबलाचं भाळं बी शाळा घेते. तीन लेकराईनं येक स्टाल लावून त्याईनं तिनशे रूपये कमावले अस्तीन तं शंभर रूपये स्टालचं भाळं घेतात. मंग घ्या वाटून तिघाईत दोनशे, वा रे वा याईचं व्यवसाय मार्गदर्शन!

अमक्याच दुकानातून शाळेचे कपळे,ढमक्याच दुकानातून पुस्तकं,टमक्याच दुकानातले बुटमोजे हे तं कईपासून होतंच.त्यात भर पळ्ली शाळेतच आमी स्पोर्ट्स शिकोतो म्हनून जास्तीची पाच-पाच हजार रूपये फी भरा लागते न् त्याच्या मांगं स्पोर्ट्स चे कपळे न् स्पोर्ट्स बुटं, इंस्ट्रुमेंट्स् आलेच. लेकरू शाळेत नाचात भाग घेत अशिन,काई कारेक्रम अशिन नाईतं फँसी ड्रेस स्पर्धा अशीन तं आमी सांगू तथूनच तुमाले भाळ्यान कपळे आना लागतीन...समजलं??

कदी पुरा युनिफार्म नशिन तं त्याचा दंड अल्लग,शाळेत सायकल स्टँडचं वर्षाचं भाळं अल्लग! शाळेतलीच कँटीन न् तथुल्लंच खानं पायजे. इतलं कमी म्हनून का काय शाळेत पाचवीपासूनच क्लास घेतीन म्हंतात पुळच्या करियरसाटीचे तं मायबापाले घिऊन मिटींगले या. कायले? कारन मायबापच तं टार्गेट हायेत त्याईचे.पैसा तं आखरी त्याईच्याच खिशातून काळनं हाये कानी? हे बी ठिक हाये येक खेप. निदान हे सारं सारं लेकरायच्या भविष्याचं सपनं दाखून सुरू असते. हे सारं सारं शिकोतीन,घिऊन मांगतीन,पैसा कमावतीन पन शिक्षन घ्याले मात्र हे प्रायव्हेट टिवशनाच लावाले लावतीन. कारन शाळेत नेमका कितिक टाईम कामी आनतात त्याचा हिसोब आपुन लावूच शकतो. सनवार,दिवाई,नाताळ,उन्हायाच्या सुट्ट्या वजा करून वर्सातून चार खेपा तं अर्ध्या वर्गाले डान्स प्रक्टिस च्या नावाखाली न् अर्धा वर्ग डान्स प्रक्टिस ले गेला म्हनून बाकीच्याईले कवळीभरई शिकोत नाईत. न् त्यात का तुमचा पाल्य वर्गात तुमी शिकोत ना म्हनून गैरहजर रायला तं बापाबापा शाळेले असा पुयका येते लेकराच्या भविष्याचा का पुसू नोका. काऊन्सीलर काय आन्तीन, तुमचं लेकरू हुशार हाये... पन असं म्हनून कायजीच काय दाखोतीन! वर मायबापानं लेकराले टाईम देला नाई तं काय काय हू शकते म्हनून भेवाडून देनं न् मायबापानं टाईम देनं काऊन आवश्यक हाये हे समजाऊन आपली बी परेड घेतल्या जानं...मंग तुमी कित्तीकबी तीसमारखां असा!! हे सारं खरं मानून न् आता हेच आपली जिंदगी हाये,दुसरी शाळा येच्यावूनई खर्चिक हाये म्हनून शाळेची आपल्या आयुष्यातली अळचन आपुन फक्त लेकराच्या चांगल्या भविष्यासाटी सईन करत असतो.पन परिक्षा झाली न् पेपरं पाहाले शाळेत बलावलं का ठुलीच व्हय पालकाईपुळं चिठ्ठी. या या दुकानात पुळच्या वर्षीचे पुस्तकं भेटतीन. न् पुळच्या वर्षीच्या फी चा हप्ता याच मैन्यात भरा नाईतन् दाहा रूपये दरोजची लेट फी लागीन. असं इंग्रजीत लिहेल असते. त्यात बी चारच रोज शाळा होते. वर्गात जाव तं मास्तरीन काईतरी लियत असते न् मंदामंदात पोट्ट्याईले कल्ला नका करू अशी धमकी देत असते. प्रायव्हेट क्लासेसवाला शाळेच्याप्रार्थनेच्यावेळी येक घंटा आमचे क्लास लावले तरच तुमी डाक्टर,इंजीनीयर कशे होसान म्हनून सांगते न् आकोल्याच्या उनायात गोळ झोपीतून उठून सकाऊन नऊ वाजताच लेकरं न्याहारीच्याऐवजी घामात डबडब भिजून ते पचकं भाषन जबरदस्तीनं आईकतात ते बी उभं राहून!!

तुमी म्हनसान का मंग अशा इंग्रजी शाळेत तुमाले टाकाले कोन सांगते? झेडपीत कामुन ना टाकत? तं त्याचं असं हाये का माह्या वयखीच्या झेडपीच्या सा-या गुरूजी लोकायनंच तं आपले लेकरं प्रायव्हेट इंग्रजी शाळाईत टाकले.निर्राच नाईलाज अशीन तं अस्तीन कोनाचे लेकरं चार वर्ग झेडपीत... पन पुळे तो ट्रक चेंज करतेच न् प्रायव्हेट शाळा धरतेच. सामान्य पालक महागाईनं पूरा चिपला. त्यात हे अशे पुळच्या वर्षीचंबी याच वर्षी ओरबाळनारे शिक्षनसम्राट!! मैन्याचा किराना पाच हजारात हून जाईन पन शिक्षनाले पंधरा हजार काळून ठुवा लागतात. म्हनूनच, लेकरं दोनच पायजात हे सरकारचं नाई आईकलं लोकाईनं पन शाळेच्या खर्च पावून पक्क ध्यानात ठुलं. इतलं सईन करून बी पोट्टे मोठे हून मायबापाले म्हनत अस्तीन का काय केलं तुमी आमच्यासाटी तं हायेत कानी पक्के लाताखाऊ?वर ६२००० सरकारी शाळा प्रायव्हेटवाल्याईले चालोयाले देयेल हायेत.ज्याईनं चालोयाले घेतल्या ते पैशे कमाव्यासाटीच कानी? का समाजसेवा करतीन? अदिक कित्तीक पिवसान बापहो...!! आजकालच्या पालकाईनं काय कराव, काई सुचते का सांगजा बरं? आपलं तं काई डोक्सं नाई चालत रे बा!!

# भारताची सुरक्षा नीती आणि आंतरराष्ट्रीय संबंध



आंतरराष्ट्रीय

प्रा.सचिन सुरवाडे
अमरावती

मे २०२५ मध्ये भारताने 'ऑपरेशन सिंदूर' नावाने एक लष्करी कारवाई केली आणि त्यामुळे संपूर्ण देशाचेच नव्हे, तर जगाचे लक्ष वेधले गेले. ही कारवाई अचानक झाली नाही, त्यामागे गंभीर कारण होतं जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेला एक मोठा दहशतवादी हल्ला. या हल्ल्यामुळे अनेक निरपराध लोकांचा मृत्यू झाला आणि देशात संतापाची लाट उसळली. भारत सरकारने हा हल्ला फक्त नोंदवून ठेवण्याऐवजी, थेट कारवाईचा मार्ग निवडला. हेच ऑपरेशन सिंदूर. या कारवाईने भारताची सुरक्षा नीती, आंतरराष्ट्रीय संबंध, आणि जागतिक राजकारणातील भूमिका नव्याने समोर आली.

ऑपरेशन सिंदूरची पार्श्वभूमी जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या भयंकर दहशतवादी हल्ल्यात आहे. या हल्ल्यात २६ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला होता.या हल्ल्याचा केवळ मानवी नुकसानापुरता विचार केला तरी तो अत्यंत गंभीर होता, पण त्याचबरोबर या घटनेने भारताच्या सार्वभौमत्वाला, अंतर्गत सुरक्षेला आणि सीमावर्ती धोरणाला एक थेट आव्हान दिले होते. या पार्श्वभूमीवर मागील दोन दशकांचा विचार करणे आवश्यक आहे. २००१ च्या संसदेवरील हल्ल्यापासून ते २००८ मधील मुंबईवरील २६/११ चा दहशतवादी हल्ला, २०१६ मधील उरी हल्ला आणि २०१९ मधील पुलवामा हल्लाप्रत्येकवेळी भारताने संयम दाखवला, आंतरराष्ट्रीय स्तरावर मुद्दा मांडला आणि प्रत्यक्ष कारवाई मर्यादित स्वरूपात केली. मात्र आता भारताचं धोरण बदललं आहे. संयमासोबतच ठोस प्रतिहल्ला ही नव्या युगाची गरज बनली आहे. याचाच परिपाक म्हणून भारत सरकारने तातडीने ऑपरेशन सिंदूर राबवण्याचा निर्णय घेतला. ७ मे २०२५ रोजी पहाटे भारतीय वायुदलाने पाकिस्तानमधील बहावलपूर, मुरिदके, कोटली, भिंबर आणि मुझफ्फराबाद इत्यादी भागांतील दहशतवादी अड्ड्यांवर अचूक आणि नियोजनबद्ध हल्ले केले. या कारवाईत राफेल लढाऊ विमानांचा वापर करण्यात आला. ही कारवाई पूर्णतः लक्ष्याधारित होती आणि त्यात नागरी वस्त्यांना कोणताही धोका निर्माण झाला नाही. भारताने यामध्ये 'हॉट पर्स्यूट' धोरणाचा अवलंब केला, ज्याचा अर्थ सीमापार दहशतवाद्यांच्या अड्ड्यांचा नाश करण्यासाठी तात्काळ लष्करी कारवाई. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या सेल्फ डिफ ेन्स या तत्त्वाच्या चौकटीत भारताची ही कृती न्याय्य मानली जाते. जागतिक स्तरावर यावर चर्चाही झाली. काही देशांनी भारताच्या कारवाईला समर्थन दिलं, तर काहींनी संयम बाळगण्याचं आवाहन केलं. पण एक गोष्ट स्पष्ट झाली,की भारत आता अशा प्रकारच्या दहशतवादी कारवाया सहन करणार नाही. पाकिस्तानने या कारवाईला उत्तर देताना ऑपरेशन बुनयान उल मरसूस सुरू केलं आणि दोन्ही देशांमध्ये तणावाचा एक नवा अध्याय सुरू झाला. या संघर्षामुळे आंतरराष्ट्रीय



समुदायामध्ये मोठी हालचाल निर्माण झाली. अमेरिका, सौदी अरेबिया आणि चीनसारख्या देशांनी मध्यस्थीचे प्रयत्न केले. अमेरिका खास प्रतिनिधी पाठवून युद्धविरामाचे समन्वयन करत होती. काही वेळेसाठी युद्धविराम जाहीर झाला खरा, पण प्रत्यक्षात तो फार काळ टिकला नाही. हे चित्र संयुक्त राष्ट्रांच्या क्षमतेबाबतही अनेक प्रश्न उपस्थित करतं.

'ऑपरेशन सिंदूर' च्या माध्यमातून भारताने आपली राष्ट्रीय सुरक्षा नीती आणि आंतरराष्ट्रीय संबंधांमधील स्थान ठामपणे मांडले. याला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. १९७१ साली भारताने पाकिस्तानच्या विरुद्ध जेव्हा लढा दिला, तेव्हा बंगालमधून एक नवीन राष्ट्र निर्माण झालं बांगलादेश. त्या वेळीही भारताने शांततापूर्ण भूमिका घेत देशहित जोपासलं. पण १९९९ मधील कारगिल युद्धानंतर भारताने प्रतिबंधात्मक कारवाई या धोरणाची दिशा स्वीकारली. ऑपरेशन सिंदूर हे त्याच धोरणाचा विस्तार म्हणता येईल. या लष्करी कारवाईचा आर्थिक परिणामही समजून घ्यावा लागेल. युद्धजन्य वातावरणामुळे सीमा भागातील गुंतवणूक, व्यापार आणि पर्यटन या क्षेत्रांवर परिणाम होतोच. पण जागतिक व्यासपीठावर भारताची प्रतिमा एक निर्णायक आणि सक्षम राष्ट्र म्हणून उभी राहिल्याने, दीर्घकालीन परिप्रेक्ष्यात परदेशी गुंतवणूकदारांचा विश्वास वाढण्याची शक्यता नाकारता येणार नाही. संरक्षण उत्पादन, तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा यामध्ये भारताला नवीन संधी प्राप्त होऊ शकतात. मात्र, यासाठी देशाच्या आर्थिक धोरणामध्ये दूरदृष्टी आणि जागतिक समन्वय आवश्यक आहे. या सर्व घडामोडींमध्ये आंतरराष्ट्रीय कायद्याचा विचार करणे महत्वाचे ठरते. संयुक्त राष्ट्रांच्या चार्टरच्या कलम ५१ नुसार, कोणतेही राष्ट्र आपल्या संरक्षणासाठी प्रत्युत्तरात्मक कारवाई करू शकते. भारताने केलेली कारवाई ही या कलमानुसार ग्राह्य धरली जाऊ शकते. पण आंतरराष्ट्रीय राजकारणात कायदेशीर तत्त्वांपेक्षा बळ आणि प्रभाव यांचं महत्त्व अधीक असतं. त्यामुळे भारताला आपली भूमिका अधिक स्पष्ट आणि सहानुभूतीपूर्ण पद्धतीने मांडावी लागेल. या मोहिमेत भारताने अत्यंत अचूक नियोजन, गुप्तचर माहिती आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला. यामुळे दहशतवाद्यांच्या ठिकाणांवर अचूक आणि प्रभावी हल्ला करता आला, तर दुसरीकडे सामान्य नागरिकांचे प्राण सुरक्षित ठेवले गेले. ही कारवाई केवळ सैनिकी विजय नव्हे, तर नैतिक आणि राजनैतिक विजय देखील ठरली. भारताच्या परराष्ट्र धोरणामध्ये बदल घडवून आणणारा ऑपरेशन सिंदूर हा एक मैलाचा दगड आहे. आणि जागतिक राजकारणात भारताची 'फॅक्टर' म्हणून ओळख निर्माण करणारा क्षण आहे. जागतिक राजकारण रिअलिझम या तत्वज्ञानानुसार चालतं, ज्यामध्ये शक्ती, सुरक्षा आणि स्वार्थ यांना सर्वोच्च महत्त्व असतं. भारत यापुढे नैतिकतावादी शांततावादी भूमिकेपेक्षा अधिक संयमित आक्रमक धोरण अंगीकारेल, अशी चिन्हं या कारवाईतून दिसत आहेत. दहशतवाद हा एक जागतिक प्रश्न आहे. त्याच्याशी लढताना देशांना आत्मसंरक्षणाचा हक्क वापरण्याचा अधिकार आहेच, पण तो करताना आंतरराष्ट्रीय कायद्याचा आदर आणि मर्यादा पाळणं ही सुद्धा जबाबदारी आहे. भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून हेच दाखवून दिलं की, आपण शांततेचे पुरस्कर्ते आहोत, पण आपल्या नागरिकांच्या सुरक्षेच्या बाबतीत कोणताही तडजोड स्वीकारणार नाही.

दहशतवादाविरोधातील ही लढाई केवळ भारताची नाही. हा संपूर्ण जगासाठी एक गंभीर इशारा आहे. भारताने यावेळी शांततेच्या मार्गावर चालत, कायद्याच्या चौकटीत राहून सशक्त आणि ठाम भूमिका घेतली असली तरी'ऑपरेशन सिंदूर' ही केवळ लष्करी कारवाई नव्हे, तर ती भारताच्या शौर्याची, धैर्याची आणि आंतरराष्ट्रीय उत्तरदायित्वाची साक्ष आहे.

# दहावीचा निकाल: चिंतनाची गरज



विचारमंथन

सचिन शिंदे
8329944365

यंदाच्या दहावीच्या परीक्षेचा निकाल एक महत्त्वपूर्ण चित्र स्पष्ट करणारा ठरला आहे. या परीक्षेत ग्रामीण आणि शहरी भागांतील हजारो विद्यार्थी मराठी तसेच इंग्रजी माध्यमातून सहभागी झाले होते. या निकालाने, विशेषतः पालकांच्या अपेक्षा आणि वर्तमानातील शिक्षणपद्धती यांवर नव्याने विचार करण्याची गरज अधोरेखित केली आहे.

प्रत्येक पालकाचे स्वप्न असते की, आपल्या मुला-मुलींनी उत्तम शिक्षण घेऊन आपले भविष्य उज्ज्वल करावे. या ध्येयासाठी पालक कोणताही त्याग करण्यास, अगदी आर्थिक भार सोसण्यासही तयार असतात. एकीकडे राज्य शासनाने मराठी आणि सेमी-इंग्रजी माध्यमांतून मोफत किंवा अल्प शुल्कात शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिलेली असताना, दुसरीकडे इंग्रजी माध्यमाचा पगडा वाढत असल्याचे चित्र सर्वत्र दिसते. अनेक पालक आपल्या पाल्याला वयाच्या अवघ्या दोन-अडीच वर्षांपासून इंग्रजी माध्यमांच्या खासगी शाळांमध्ये दाखल करतात. तेव्हापासून सुरू होतो तो वार्षिक लाखो रुपयांच्या खर्चाचा प्रवास. आपला मुलगा किंवा मुलगी लहानपणापासूनच सफाईदार इंग्रजी बोलायला पाहिजे, मोठे झाल्यावर डॉक्टर,



इंजिनिअर, वकील किंवा उच्चपदस्थ अधिकारी बनायला हवे, प्रसंगी परदेशात जाऊन गलेलठ्ठ पगाराची नोकरी मिळवावी, या महत्त्वाकांक्षेपायी पालक इंग्रजी माध्यमातील शिक्षणावर प्रचंड खर्च करतात. मात्र, यामाध्यमातून खरोखरच अपेक्षित यश मिळते का, आणि या महागड्या शिक्षणाच्या ओझ्याखाली विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक भावना आणि क्षमता दाबल्या जात नाहीत ना, हा प्रश्न अनुत्तरित राहतो. दरवर्षी हजारो विद्यार्थी इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये लाखो रुपयांची भरमसाट फी भरून शिक्षण घेतात. परंतु, या वर्षीच्या यवतमाळ जिल्ह्यातील दहावीच्या निकालावर नजर टाकल्यास, पालकांनी निश्चितच गंभीरपणे चिंतन करण्याची आणि आपण मुलांच्या शिक्षणावर करत असलेला अवाढव्य खर्च योग्य दिशेने जात आहेकी नाही, याचे आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. या चिंतेला अधिक बळ देणारी घटना म्हणजे, आर्णी शहरातील श्री महंत दत्तराम भारती विद्यालय, गांधीनगर येथील मराठी माध्यमाची विद्यार्थिनी कुमारी श्रेया विष्णू वानखेडे हिने दहावीच्या परीक्षेत तब्बल ९८.६०टक्के गुण मिळवून यवतमाळ जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावला. श्रेयाने हे यश संपादन करताना इंग्रजी माध्यमांतील त्या सर्व विद्यार्थ्यांना मागे टाकले आहे, जे आपल्या शिक्षणासाठी अगदी नर्सरीपासून प्रचंड खर्च करत आहेत आणि मोठमोठ्या नामांकित शाळांमध्ये शिकत आहेत.

जर विनाशुल्क किंवा नाममात्र शुल्कात शिक्षण घेणारी, मराठी माध्यमातील एक विद्यार्थिनी अशा प्रकारे उत्तुंग यश मिळवू शकत असेल, तर इंग्रजी माध्यमांच्या शाळा आणि त्यांच्यामागे धावणारे पालक यांनी खरोखरच विचार करण्याची गरज आहे. महागडे शुल्क आकारणाऱ्या इंग्रजी माध्यमांच्या शाळा आपली फसवणूक तर करत नाहीत ना? केवळ इंग्रजी माध्यम म्हणजेच उज्ज्वल भविष्य, हे समीकरण कितपत योग्य आहे? या आणि अशा अनेक प्रश्नांवर आता गांभीर्याने विचार करण्याची आणि शिक्षणव्यवस्थेतील गुणवत्तेवर नव्याने प्रकाश टाकण्याची निकड निर्माण झाली आहे.

### प्रवास



दीपक शिव
मो. ९८२२२४००१२

मी दीर्घ उसासा
टाकला....अन्
गर्दीतले रस्ते
निर्मनुष्य व्हायला
लागले...

एक एक पावलं
पुढे टाकताना
स्मशानभूमीतील
धगधगत्या ज्वाला
जवळ मी केव्हा
आणि कसा
पोहचलो हे माझे
मला ही कळले
नाही....

पेटलेली चिता
चिंताग्रस्थ झालेली
प्रथम पाहिली...

ती म्हणाली
माझं सर्वस्व जळलं
आयुष्यभर जाळत
आलेली माणसे
कवटीचा आवाज
होईस्तोवर थांबली
अन्
दोन चार
काड्या टाकून
निघून गेलीत...

विवस्त्र झालेला
माझा देह
ती परताना पहात
होता...

त्यांची कोरडी
झालेली नजर ...
पहाताना
माझे डोळे जरा
ओलसर झालेले,
कंठात हुंदका
दाटलेला
तो गर्दीच्या गोंगाटात
हरवलेला...

सहज वाटून गेलं
देह जळतो आहेच
चिंता ही जळते आहे
आयुष्यभर
जाळत आलेली
यातली,

माझी माणसे
काही आतली तर
काही बाहेरची
होती...

दाह माझा ही होतच
होता तरीसुद्धा
मी शाबूत आणि
तटस्थ
होते,सगळं निवांत
झालं..की मिळेल
चिरशांती.
पण नाही...

दुस-या दिवशी
राख कुणी उचलायची
यावर झालेले वाद..
त्या रात्रीच कळले ...

गजबजलेले आवाज
करीत येणारी पाऊले
सरकत सरकत
पुढे आलीत...
त्यातल्या अपवित्र
हातांचा
स्पर्श बोचत होता...

मोक्ष मिळावा म्हणून
गंगेच्या पवित्र पाण्यात
शिरवलेली माझी
राख आणि शेवटच्या
नमस्कारसाठी
जोडलेले हात पहात
माझा पुढचा प्रवास
सुरू झाला
तेव्हा जिथे या पैकी
कुणी ही
नसणार......

# तीन खाड्यांचा संगम, करजुवे..!



कोकणची रचना इतकी वैशिष्ट्यपूर्ण आहे की आपल्या भटकंतीमध्ये आपल्याला अनेकदा विविध नद्या, खाड्या आडव्या येत असतात. अनेकठिकाणी आता या नद्यांवर पूल बांधलेले आहेत, तर अनेक ठिकाणी अजूनही या काठावरून पलीकडे जाण्यासाठी होडीचा वापर होतो. या होडीला 'तर' असे म्हणतात. अतिशय माफक दरात या तरीतून आपण पलीकडच्या काठावरील गावात जाऊ शकतो. करजुवे या गावची तर विविध गोष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण झालेली आहे. म्हणजे इथे समोर असलेल्या भातगावला जाता येते हा झाला एक भाग. पण करजुवेगावाचे स्थान अगदी मोक्याचे असे असल्यामुळे इथल्या नौकाविहाराला जास्त महत्त्व प्राप्त होते. संगमेश्वरहून करजुवेइथे जाण्यासाठी दोन मार्ग आहेत. एक मार्ग संगमेश्वर-धामणी-तुरळ-गोळवली मावळंगे तिठा-धामापूर-आरवली डिंगणी तिठा मार्गे करजुवेला जातो. हे अंतर ३२ कि.मी. इतके आहे. दुसरा रस्ता संगमेश्वर आसुर्डे डिंगणी पूल-पिरंदवणे-करजुवे असा आहे. हे अंतर सुद्धा अंदाजे ३५ कि.मी. आहे.(तीन खाड्यांचा संगम, करजुवे)

आपण अनेकदा तीन नद्यांचा संगम झालेला पाहतो. त्याला त्रिवेणी संगम असेही संबोधले जाते. धार्मिकदृष्ट्या देखील या त्रिवेणी संगमाला विशेष महत्त्व आहे. पण करजुवे इथे तीन खाड्यांचा संगम झालेला आहे. खाडी म्हणजे खरेतर नदीच असते. मात्र समुद्राच्या जवळ गेल्यावर त्या नदीचे पाणी गोड रहात नाही तर त्यात समुद्राचे पाणी मोठ्या प्रमाणावर मिसळल्यामुळे ते खारे झालेले असते. त्यामुळे त्या नदीला पुढे खाडी असे म्हटले जाते. करजुवे इथून समुद्र जवळ असल्यामुळे इथे असलेल्या तीन खाड्या महत्त्वाच्या ठरतात. अबलोली वरुण येणारी कापशी नदी आणि आरवली वरुण येणारी गड नदी यांचा संगम करजुवे इथे होतो, आणि लगेचच पुढे या दोन्ही नद्या मिळून संगमेश्वरवरुण येणाऱ्या शास्त्री नदीला मिळतात. पुढे ही शास्त्री नदी जयगडपाशी समुद्राला जाऊन मिळते. तिथे तिला जयगडची खाडी म्हटलेले आहे.

तीन खाड्यांचा हा अनोखा संगम आपल्याला करजुवे इथे बघायला मिळतो. करजुवे हे ठिकाण अत्यंत शांत-निवांत असे आहे. कसलाही आवाज नाही. समोर खाडीचे निवळशंख पाणी, त्यात असलेले विविध मासे, क्वचित एखादी होडी इकडून तिकडे चाललेली असे हे सगळे रमणीय दृश्य असते. इथल्या तरीवर उभे राहिले की आपल्या चारही बाजूंनी डोंगराचा गराडा पडलेला दिसतो. इथले अजून एक भौगोलिक वैशिष्ट्य म्हणजे आपण चार तालुक्यांच्या सीमेवर उभे असतो.

करजुवेपाशी गुहागर, चिपळूण, रत्नागिरी आणि संगमेश्वर हे चार तालुके एकत्र येतात. तीन खाड्या आणि चार तालुक्यांच्या संगमावर असलेले हे आगळेवेगळे ठिकाण करजुवे आपल्या भटकंतीमध्ये अवश्य समाविष्ट करून घ्यायला हवे. 'संतोष महांकाळ' हे इथल्या होडीवाल्याचे नाव. तो इथेच असतो. इथे नसला तर समोरच्या तीरावर तो असतो. करजुवे तरीवरून आपल्याला होडीतून चांगला मोठा फेरफटका मारायचा असेल तर भातगावच्या पुलापर्यंत आपण या होडीतून जाऊ शकतो. कुठलाही गडबड गोंगाट नसलेल्या या ठिकाणी होडीतून केलेली भटकंती नक्कीच स्मरणीय होते.

तीन खाड्यांच्या आणि चार तालुक्यांच्या संगमाचा हा करजुवे परिसर शांत-निवांत आहे. इथली शांतता, इथले सौंदर्य तसेच अबाधित ठेवण्याची जबाबदारी आपल्या सर्वांवर आहे याचे भान मात्र असायला हवे. इथे निसर्गाने भरभरून दिलेले आहे. त्याचा शांतपणे आस्वाद घेणे हेच आपल्या भटकंतीचे फलित म्हणावे लागेल.

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 45

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ■ | | | | | ■ | | | | ड |
| | ■ | | ■ | | ■ | | ■ | | ■ | | | | ■ |
| | ■ | | | | | | ■ | ■ | | | ■ | | स |
| ■ | मा | ज | र | पा | ट | ■ | | | | ■ | | ■ | न |
| आ | न | ■ | | ■ | | | | | | ■ | | | ई |
| पा | ■ | | | | ■ | | ■ | | | | | | ■ |
| द | ■ | | ■ | | | | | ■ | ■ | | | | ■ |
| म | | | ■ | | | ■ | | ■ | | | ■ | ■ | |
| स्त | ■ | | ■ | | ■ | | | य | ■ | | | | |
| क | ■ | | | ■ | | ■ | | म | | ■ | | ■ | |
| ■ | | ■ | | | | | ■ | न | | | ■ | | |
| | | | ■ | ग | वा | क्षा | ■ | ■ | | | | | ■ |
| | | ■ | | | ■ | | ■ | न | व | स | ■ | | |
| | ■ | ना | | | | ■ | | | ■ | ■ | | | |

### हे कोडे कसे सोडवाल

मित्रांनो
संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा.

**संकेत शब्द:–**

**दोन अक्षरी**
आई
आन
आशा
कव
खास
तीर
धग
नक्त
नर
नस
पांचु
मान
यती
यज्ञ
योग
रवा
वन
वधु
व्याध
संघ
सार

**तीन अक्षरी**
अंतर
आलय
गवाक्ष
गारुडी
जवस
डकार
तामसी
नमाज
नवस
पपई
परडी
परिघ
पांडव
प्रतीक्षा
मटका
मणका
मस्जिद
यमन
रमणी
रक्षक
रिवाज
वखार
वजन
वरण
विधवा
शेरपा
सनई
सवड
सुरस

**चार अक्षरी**
आवाहन
गंगाधर
त्रयोदशी
देवदासी
धुरंधर
नाईलाज
पखवाज
परवड
पापभीरू
रंगशाला
रयतावा
वसीयत
शीतलता
सभापती
सरस्वती
संवरण
सारवान
सीमा देव
क्षात्रधर्म

**पाच अक्षरी**
कामचुकार
प्रतिकारक
माजरपाट
रणगंभीर
वासरमणी

**सहा अक्षरी**
आपादमस्तक

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| फा | स | ळी | ■ | प्र | जा | स | त्ता | क | ■ | अ | क | ब | र |
| ■ | र | ■ | गा | भा | ■ | मी | ■ | ड | ■ | र्थ | ■ | क | सा |
| जा | ग | र | ■ | त | ■ | प | थ | क | र | ■ | ■ | री | त |
| हि | म | ■ | चौ | फे | र | ■ | ■ | ल | ■ | पा | त | ■ | ळ |
| रा | ■ | बा | स | री | ■ | ■ | ल | क्ष्मी | कां | त | बे | र्डे | ■ |
| त | क | ■ | र | ■ | सु | ल | ग्न | ■ | ■ | क | ला | ■ | स |
| ■ | न्या | य | ■ | सा | व | ■ | घ | टि | का | ■ | ■ | पा | व |
| ■ | ■ | जु | ■ | प | र्ण | कु | टि | ■ | स्त | व | ■ | क | ल |
| ■ | स | र्वे | श | ■ | म | ळ | का | ■ | का | ■ | पा | ■ | त |
| ह | ■ | द | म | ■ | ध्य | ■ | ■ | प | र | शु | रा | म | ■ |
| ल | ■ | ■ | न | ग | ■ | कु | मु | द | ■ | द्ध | ■ | त | ळ |
| का | पू | र | ■ | दा | न | व | ■ | वी | र | ■ | धा | म | ■ |
| ■ | ज | ■ | व | ध | ■ | त | ■ | ध | व | ल | ■ | तां | ■ |
| मा | नी | ■ | सा | र | थी | ■ | स | र | ण | ■ | का | त | र |
| म | य | ■ | ह | ■ | ■ | ग | र्व | ■ | ■ | हा | व | र | ट |
| ला | ■ | स | त | त | धा | र | ■ | गो | ता | व | ळा | ■ | णे |

Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 424

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | 2 | 3 | | 4 | ■ | 5 | 6 | 7 | | ■ | 8 | 9 | ■ | 10 |
| | ■ | 11 | | ■ | | ■ | 12 | | | ■ | 13 | | | 14 | |
| 15 | | | ■ | 16 | | 17 | | ■ | 18 | 19 | | ■ | 20 | | ■ |
| | ■ | 21 | 22 | ■ | 23 | | ■ | 24 | ■ | 25 | | ■ | 26 | | |
| 27 | 28 | ■ | | ■ | 29 | | | | | | ■ | 30 | | ■ | ■ |
| 31 | | 32 | ■ | 33 | ■ | | ■ | | ■ | 34 | 35 | | ■ | 36 | ■ |
| | ■ | 37 | | | 38 | ■ | 39 | | | ■ | | ■ | 40 | | |
| ■ | 41 | | ■ | ■ | | ■ | 42 | | ■ | ■ | 43 | | | | ■ |
| 44 | | | ■ | 45 | | | ■ | ■ | 46 | | | ■ | 47 | | 48 |
| ■ | | ■ | 49 | | | ■ | 50 | | | ■ | 51 | 52 | ■ | ■ | |
| 53 | | | ■ | 54 | | | ■ | ■ | 55 | 56 | ■ | 57 | 58 | | ■ |
| | ■ | ■ | 59 | | | ■ | 60 | 61 | | | ■ | 62 | | ■ | 63 |
| 64 | 65 | | | ■ | ■ | 66 | ■ | 67 | | ■ | 68 | ■ | 69 | | |
| 70 | | ■ | 71 | 72 | 73 | | ■ | | ■ | 74 | | ■ | | ■ | |
| ■ | | ■ | 75 | | | ■ | ■ | ■ | 76 | | | | | ■ | |

**—: आडवे संकेत :—**

1) आंतरराष्ट्रीय ख्यातीचे आणि हाथरस गावी जन्मलेले एक प्रसिद्ध हिंदी हास्य कवी
5) पंचेचाळीस अंशाचा कोन
8) तोंडी घेतलेला अन्नाचा गोळा
11) लोक, नागरिक
12) मृदू, मुलायम
13) वरुन खाली उतरणे, ग्रंथातील उतारा
15) स्पष्ट, मोठे
16) अतिक्रमण, ओलांडणे, आज्ञाभंग
18) सुंदर स्त्री
20) तेथवर (हिं.)
21) डिंक, गोंद
23) नवरात्रात देवीच्या पूजेपूर्वी समंत्रक मांडलेला कलश
25) मार्ग, संप्रदाय
26) सर्पयोनीतील सरपटणारा एक घातक प्राणी
27) बळी (हिं.)
29) माणूसघाण्या, मत्सरी
30) पकड, आधार
31) सातांचा समुदाय
34) मोठ्या भावाची बायको
37) एखाद्या व्रताचरणाचे फल सांगणारा ग्रंथ
39) कृतज्ञता व्यक्त करणे, धन्यवाद
40) खादाड
41) रानटी जात
42) सचोटीविषयीचा दुसऱ्यावरचा विश्वास, अब्रू
43) मनन करण्यास योग्य
44) घटक, प्रमाण
45) लग्नाच्यावेळी नवरा व नवरी यांच्या कपाळावर बांधण्याचे आभूषण
46) विद्वान, ज्ञानी
47) त्या बाजूकडे
49) फुलातील रजःकण
50) अनुराग, तत्परता
51) चार युगांपैकी सध्या चालू असलेले युग
53) माणसाळलेला
54) महाराष्ट्रातील एक विशेष समाज
55) रयत, जनता
57) मायावी, कपटी, प्रेम लावणारा
59) अतिशय, भरपूर
60) खोडेगावातील पंचायत समितीचा मुख्य, कमिटीचा अध्यक्ष
62) नवरा, आशीर्वाद
64) एका पालेभाजीचे नाव
67) पायाची खोट
69) कुक्कुट
70) रिकामा, रिक्त
71) एका बाजूचा, एक पक्षीय
74) वृक्षाभोवती बांधलेला ओटा
75) वस्त्र
76) दुसऱ्याच्या मनातील नेमके भाव ओळखणारा

**—: उभे संकेत :—**

1) आवाजाच्या अधिकतेने बधिरता येते या अर्थाचा एक वाक्प्रचार
2) गुन्हेगारांच्या हातात पोलिसांनी घातलेली बेडी
3) पक्ष्यांच्या जमाव
4) दसऱ्याचे शिलांगण
5) अरण्य, जंगल
6) उपहास, थट्टा
7) मृदू, नरम
8) शस्त्राच्या वाराने झालेली जखम
9) एकसारखा पडणारा पाऊस
10) समुदाय, वर्ग, भक्तांचा समूह
13) ज्याला कुणीही नाही असा
14) द्रव्यसंख्या
17) एका रोगाचे नाव
19) लपाछपीचा खेळ, लपून केलेले कृत्य
22) डोंगराची तुटलेली बाजू
24) साखर, केशर, तूप घालून केलेला गोड भात
28) माखलेला, व्यापलेला
30) मालक, स्वामी
32) कंगाल, ज्याच्या जवळचे पैसे संपलेले आहे असा
33) डोळ्यातील आसवे
35) कल्याण चिंतणारा
36) हिंदीत आमदार, प्रत्यक्ष कृतीचा
38) तिरसट मनुष्य
39) उदक, पाणी
40) अधर्म, दुष्कर्म
41) पुरुषांनी कानात घालावयाचा मोत्याचा दागिना
45) पश्चिम महाराष्ट्रात पुण्याजवळील प्रसिद्ध असा एक लोकसभा मतदार संघ
46) पंगत वाढताना केलेला भेदभाव
48) रांजण, मोठे पोट
52) जाहिरपणे वस्तूची बोली बोलणे
53) पायी चालणारा
56) गांजणूक, छळ
58) एकलकोंडा, घरीच राहणारा. लोकांत मिसळयाचा कंटाळा करणारा
59) यासाठी
61) कंटाळणे, नीरस
63) जोराचे भांडण
65) ओळ, रांग (हिंदी)
66) एक चौकोर मिठाई
68) यमलोकीची पापीजनांना शिक्षा देण्याची यातनाप्रद जागा
72) तत्वांश, अर्क, धातूची परीक्षा
73) शरीर
74) विडा, पर्ण ●

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्र | थ | म | पु | रू | ष | ■ | कै | ला | स | वा | सी | ■ | वि | र | ह |
| यो | ■ | हा | र | ■ | ट | ■ | व | ज | न | ■ | ■ | वि | ष | ■ | ल |
| ग | ग | न | चुं | बी | ■ | श | ल्य | ■ | ई | शा | न्य | ■ | म | ट | क |
| शा | ळा | ■ | डी | ■ | पा | प | ■ | आ | ■ | खा | ■ | प्र | भू | ■ | ■ |
| ळा | ■ | अ | ■ | अ | ना | थ | आ | श्र | म | ■ | दो | ■ | ज | क | त |
| ■ | मो | ह | र | म | ■ | वि | ■ | या | त | ना | ■ | क्ष | त्रि | य | ■ |
| क | ल | म | ■ | र | ■ | धी | ■ | स | ■ | ग | ■ | ■ | को | म | ल |
| ल | ■ | ह | ■ | ■ | अ | ■ | गो | ■ | स | म | रां | ग | ण | ■ | ■ |
| प | रि | मि | ती | ■ | चा | ■ | ष | ष्ठी | ■ | णी | ■ | र्भा | ■ | अ | सा |
| ■ | ■ | क | र | स्था | न | ■ | वा | ■ | घ | ■ | प्र | श | म | न | ■ |
| ख | स | ■ | क | न | क | ना | रा | य | ण | ■ | ग | य | ■ | व | न |
| ड | म | ड | म | ■ | ■ | ग | ■ | ज्ञ | ■ | बे | ट | ■ | उ | धा | र |
| त | ■ | ■ | ठा | णे | दा | र | ■ | ■ | आ | ता | ■ | उ | द्या | न | ■ |
| र | वा | ना | ■ | ■ | ■ | मो | ड | ता | घा | ल | णे | ■ | प | ■ | पा |
| ■ | म | ■ | क्षौ | ■ | व्य | था | ■ | री | त | ■ | ■ | क | न | व | ट |
| ध | न | ग | र | ■ | य | ■ | डं | ख | ■ | स | त | र्क | ■ | र | ■ |

Uday Munde - 8446302691

## राशी-भविष्य

**मेष :** आज तुम्ही कठोर परिश्रमाने केलेले काम यशस्वी होईल. नोकरीत तुमचा आदर वाढेल. व्यवसायात तुम्हाला नफा मिळेल.

**वृषभः** आज तुमचे धाडस वाढेल. तुमचे विरोधक गप्प राहतील. लग्नाच्या चर्चा शक्य आहेत. द्वेषाची भावना महागात पडू शकते.

**मिथून :** आज तुमच्या राजकीय क्षेत्रात गोंधळाची परिस्थिती असेल. व्यवसायात नफा होण्याची शक्यता आहे. तुम्हाला थकवा आणि ताण जाणवेल.

**कर्क :** आज तुम्हाला तुमच्या कामात यश मिळेल. तुमच्यासाठी उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण होतील. तुमच्या व्यवसायाची परिस्थिती सुधारेल.आज तुमचे सकारात्मक विचार देखील खूप उपयुक्त ठरतील.

**सिंह :** आज तुमच्या कामात तुमचा अधिकार वाढेल. आर्थिक क्षेत्रात समस्या येऊ शकतात. व्यवसाय क्षेत्रात सावधगिरी बाळगा.

**कन्या :** आज तुम्हाला भविष्याची चिंता असेल. आरोग्यात फायदा होईल. व्यवसायात चढ-उतार येतील. तुमच्या योजनांमध्ये अडथळे येतील.

**तुळ :** आज तुम्हाला चांगली बातमी मिळेल. तुमच्या स्वतःच्या प्रयत्नांनी सरकारकडून पैसे मिळवणे शक्य आहे. व्यवसायात नफा मिळण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** नवीन योजना बनवाल. पैसे मिळवणे शक्य आहे. प्रवासामुळे तुमचा उत्साह वाढेल. आज, प्रतिष्ठेला हानी पोहोचवू शकणाऱ्या लोकांशी संगत टाळा.

**धनु :** आज तुमचा आळस तुमच्या प्रगतीत अडथळा आणेल. वाद टाळा. आर्थिक क्षेत्रात समस्या येतील, रागावर नियंत्रण ठेवा.

**मकर :** आज तुम्ही योजनांचा सखोल अभ्यास कराल. नवीन योजनेचे फायदे होतील. नोकरीत मान-सन्मान वाढेल. तुमच्या अनुपस्थितीत सर्व काम सुरळीत चालू राहील.

**कुंभ :** आज तुमचा राजकीय आदर वाढेल. तुमची लोकप्रियता वाढेल. लांब पल्ल्याचा प्रवास टाळा. जर तुम्ही आज इतरांचे ऐकून गुंतवणूक केली तर तुम्हाला आर्थिक नुकसान होईल.

**मीन :** आज तुमचे आरोग्य स्थिर राहील. नोकरीत कार्यक्षमतेचा फायदा तुम्हाला मिळेल. मुलांशी झालेल्या वादामुळे चिडचिड होईल.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## थोडक्यात

### प्रांतिक तैलिक महासभेने घेतली मुख्यमत्र्यांची भेट

**नागपूर :** माजी खासदार रामदास तडस यांच्या अध्यक्षतेखालील महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घेतली भेट घेतली.
संत श्री संताजी महाराज आर्थिक विकास महामंडळ तातडीने सुरू करणे व त्यावर समाजाचे प्रतिनिधी नेमणे, पारंपरिक तेलघाणी उद्योगाच्या पुर्नविकासासाठी मध्यप्रदेश, झारखंड, राजस्थान राज्याच्या धर्तीवर महामंडळ स्थापन करणे, तेलघाणीतील सुटे तेल विक्रीवर शासनाचे निर्बंध उठविणे आदी मागण्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे मांडल्या. शिष्टमंडळात माजी खासदार रामदास तडस, डॉ. भूषण कर्डिले, गजानन शेलार, संजय विभुते, बळवंत मोरघडे, पुष्पा बोरसे, अतुल वांदिले, जगदीश वैद्य, कुणाल पडोळे, प्रवीण बावनकुळे, नरेंद्र सुर्यवंशी, भगवान बोरसे सहभागी होते.

### मेडिकलमधून कैदी झाला फरार

**नागपूर :** नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचारासाठी दाखल आरोपी हर्ष महेंद्र रामटेके रा. भंडारा पळाल्याचे आढळून आले आहे आता पोलिसांकडून त्याचा शोध सुरू आहे.
माहितीनुसार, हर्ष रामटेकेला घरफोडीच्या प्रकरणात पोलिसांनी अटक केली होती. यानंतर नागपूर जिल्हा मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले मात्र, प्रकृती बिघडल्याने त्याला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील वॉर्ड क्रमांक ३६ मध्ये त्याच्यावर उपचार सुरू होते. १७ मेच्या मध्यरात्रीनंतर तो सुरक्षा रक्षकांची नजर चुकवून फरार झाला. ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चित्रीत झाली असून, वॉर्डमधून बाहेर पडत असताना एक सुरक्षा रक्षक खुर्चीवर बसलेला दिसून येतो. सध्या पोलिस त्याचा शोध घेत असून, छायाचित्रही जारी केले आहे.

### दिग्दर्शक उबाळे यांची आत्महत्या

**नागपूर :** प्रसिद्ध लेखक तसेच चित्रपट दिग्दर्शक आशीष उबाळे यांनी नागपूरमधील रामकृष्ण मठात गळफास घेऊन आत्महत्या केली. ते पुणे येथे वास्तव्यास होते. आशीष यांचा लहान भाऊ सारंग नागपुरातील रामकृष्ण मठामध्ये सेवेकरी म्हणून काम करत असून, त्यांना भेटण्यासाठीच ते नागपुरात आले होते. रामकृष्ण मठाच्या गेस्ट रूममध्ये मुक्कामी होते. शनिवारी मठामध्ये जेवणानंतर आराम करण्यासाठी गेस्ट रूममध्ये गेले. सायंकाळी सारंग त्यांना उठवण्यासाठी गेले असता रूम उघडली नाही. त्यानंतर हा सगळा प्रकार समोर आला. पोलिसांना मृत आशीष उबाळे यांच्या मोबाईलमध्ये व्हाट्सअपवर एक सुसाईड नोट आढळली. त्यामध्ये डोक्यावर प्रचंड कर्ज असल्याचे आत्महत्या केल्याचे नमूद आहे. आशिष उबाळे हे मूळचे नागपूरचे असून, त्यांनी पुण्यातील एफटीआयमधून पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला. यानंतर त्यांनी टीव्हीसाठी गजरा, अग्नी, एका श्वासाचे अंतर, किमयागार, चक्रव्यूह अशा मालिकांचे दिग्दर्शन केले. याशिवाय गार्गी, आनंदाचे डोही आणि बाबूरावला पकडा अशा चित्रपटांचे दिग्दर्शन केले. गार्गी हा चित्रपट 'कार्ल्सबर्ग' महोत्सवात दाखवण्यात आला होता.

---

देशाच्या मध्यवर्ती नागपुरात प्रवासी संख्येत वाढ | सर्वसामान्यांच्या एसटी सेवेला आधुनिकता गरजेची

# नागपूर शहरात 'डबल डेकर' बसस्थानकाची निर्मिती व्हावी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ संजय मुंदलकर



**अन्य सेवाही**

- सध्याच्या बसस्थानकाच्या ठिकाणी 'डबल डेकर' नवी इमारतीसोबतच अन्य काही महत्त्वाच्या सुविधा शक्य आहेत यात लहान मॉल आणि थिएटर, अतिथीगृह, रेल्वे-विमानप्रवास तिकीट आरक्षण कक्ष, महिलांसाठी विशेष कक्ष, अत्याधुनिक पोलिस नियंत्रण कक्ष आदींची उभारणी करून प्रवाससेवा प्रदान करता येईल शिवाय यातून राज्य परिवहन महामंडळाला मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त होऊ शकतो

**नागपूरः दि.१८ :** देशात मध्यवर्ती तसेच महाराष्ट्र राज्याची उपराजधानी आणि चार राज्यात आंतरराज्यीय बससेवा चालविणाऱ्या नागपूर शहरात अत्याधुनिक बसस्थानकाची उभारणी व्हावी. गणेशपेठ बसस्थानकाच्या ठिकाणीच 'डबल डेकर' अर्थात एक मजली बसस्थानकाची संकल्पना प्रत्यक्षात आणावीयाठिकाणी अन्य काही महत्त्वाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्यास राज्य परिवहन महामंडळाला मोठा महसूल प्राप्त होऊ शकेल, यात शंका नाही.

शहर बस वाहतूक 'आपली बस' आणि मेट्रो ट्रेनच्या मदतीने नागपूर शहर आणि परिसरातील सार्वजनिक वाहतुकीला अधिक आरामदायी, सुरक्षित आणि अत्याधुनिक बनविण्यास प्राधान्य देणे गरजेचे आहे.

देशाच्या मध्यभागी असलेल्या नागपूरची शहराची सर्वांगीण विकासाकडे जोरदार घोडदौड सुरू आहेमागील दिवसात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'नवीन नागपूर' उभारणीची घोषणा केली असून, शहरालगतचा भाग तीव्र गतीने विस्तार आहे शहरातून जहाजसेवा वगळता अन्य सर्व प्रवाससेवा उपलब्ध आहेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावरून देशांतर्गत आणि विदेशी प्रवास सेवा अव्याहत सुरू आहे. याशिवाय चारही दिशांना नागपुरातून रेल्वेगाड्या २४ तास धावत असतात देशाचे उत्तर, दक्षिण, पूर्व आणि पश्चिम टोक रेल्वेमार्गाने जोडले आहेत. या दोन्ही प्रवाससेवा अस्तित्वात असतानाच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (एमएसआरटीसी) बससेवा सुद्धा मागील अनेक दशकांपासून सुरू आहे. नागपूर शहर देशाच्या अन्य भागाशी एशियन हायवेज, राष्ट्रीय महामार्ग, राज्य-जिल्हा मार्गाने जोडलेले आहे

**सर्वदूर एसटी**

उपराजधानी नागपुरातून कोकण वगळता राज्यभरातील शहरात बससेवा सुरू आहे. याशिवाय आंध्र प्रदेश, तेलंगणा, छत्तीसगड, मध्य प्रदेश या चार राज्यातील प्रवासासाठी बससेवा उपलब्ध आहे. यात्रा काळात नागपुरातून मध्यप्रदेशात विशेष बसेस सोडण्यात येत असतात इमामवाडा, वर्धमान नगर, गणेशपेठ अशी बस आगरे तयार करण्यात आली आहेत. साधी बस, शिवशाही, हिरकणी, जलद बससेवा आदींतून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला मोठा महसूल प्राप्त होतो. याशिवाय महिलांना शासनाकडून बसप्रवास सवलत मिळाल्याने त्यांची संख्या बरीच वाढली आहेहीच जमेची बाजू राखून 'एमएसआरटीसी'ने नागपूर मध्यवर्ती बसस्थानकाचे रुपडे पालटणे अतिशय गरजेचे आहे.

**विद्यमान बसस्थानक**

नागपुरातील गणेशपेठ मध्यवर्ती बसस्थानकातून सर्व प्रकारच्या बसेसचे संचालन करण्यात येते. राज्यभरात मजबूत अशा रस्त्यांचे आणि पुलांची निर्मिती झाल्याने बससेवा अधिक सुरक्षित झाली आहे; परंतु सध्याची जागा अतिशय लहान असून, बसस्थानकाची दूरवस्था झाल्याचे वारंवार दिसून येते. आत प्रवेश करताना वा बाहेर पडताना बसचालकांना अतिशय अडचणीचे ठरत असल्याचे आढळून आले आहे भरीसभर बसस्थानकाबाहेर खाजगी बस आणि ॲटो वाहनधारकांनी जवळ जवळ अतिक्रमणच केले आहेत्यामुळे बसस्थानकाजवळील रस्त्यावर वाहतूक सर्रास खोळंबलेली आढळून येते.

**अशी असावी रचना**

नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर, अंबेजोगाई, सोलापूर, परळी, नांदेड, हिंगोली, बीड अशा लांब पल्ल्याच्या बसेस वरील मजल्यावरील बसस्थानकातून संचालित कराव्यात. सोबतच आंतरराज्यीय बसेस सुद्धा येथूनच सोडाव्यात. 'डबल डेकर' वरून सुटणाऱ्या बसेसना बाहेर पडण्यासाठी वरूनच रस्ता बांधता येईल.

**नागपुरातून बाहेर पडताना...**

गणेशपेठ बसस्थानकातून भंडारा रोड, गडचिरोली, वर्धा रोड, हिंगणा, मध्य प्रदेशात जाणाऱ्या बसेस, अमरावतीकडे जाणाऱ्या बसेससाठी मार्ग आहेत. सध्या भंडारा आणि उमरेड तसेच पुढील पवनी, आरमोरी, गडचिरोलीकडील प्रवासासाठी तयार होत असलेल्या 'फ्लायओव्हर'चा उपयोग होणार आहे हिंगणा आणि अमरावतीच्या दिशेने जाणाऱ्या बसेसना सध्याचाच मार्ग अवलंबवावा लागेल.

---

# भारताच्या ताकदीची 'ऑपरेशन सिंदूर'मधून प्रचिती

## तिरंगा यात्रेत मुख्यमंत्री फडणवीसांची उपस्थिती

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**नागपूरः दि.१८ :** 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी करताना भारतीय सैन्याने पाकिस्तानचा एकही हल्ला सफल होऊ दिला नाही. देशातच निर्माण केलेली शस्त्रे वापरून जिंकलेल्या या युद्धाने भारताची ताकद आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारता'ची झलक संपूर्ण जगाला दिसली आहे. ही आपल्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

खापरखेडा (नागपूर) येथे 'ऑपरेशन सिंदूर' मोहिमेच्या यशानिमित्त आयोजित तिरंगा रॅलीप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार आशीष देशमुख, चरणसिंग ठाकूर उपस्थित होते.

प्रत्येकाच्या हृदयात राष्ट्रप्रेमाची भावना जागृत करण्यासाठी व आपल्या वीर जवानांप्रति कृतज्ञता प्रतीत व्हावी, यासाठी तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, की पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार असलेल्या पाकिस्तानला पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात 'ऑपरेशन सिंदूर' राबवून चोख उत्तर देण्यात आले आहे. देशावरील कोणताही हल्ला यापुढे सहन केला जाणार नाही. त्याला तत्काळ कडक उत्तर दिले जाईल, हा संदेश यानिमित्ताने आपण दिला आहे. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी शौर्य गाजवणाऱ्या आपल्या वीर जवानांप्रति तिरंगा यात्रेच्या माध्यमातून कृतज्ञता व्यक्त करूया, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

युद्धात वीरगती प्राप्त झालेल्या जवानांना मानवंदना देत व संपूर्ण देश त्यांच्या कुटुंबियांच्या पाठीशी खंबीरपणे उभा असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, दहशतवाद्यांचे पाकिस्तानातील अड्डे उद्ध्वस्त करण्यासाठी भारताने अत्यंत आक्रमक कारवाई केल्याने या युद्धाची परिणीती पाकिस्तानने केलेल्या युद्धबंदीच्या मागणीने झाली, हा संपूर्ण देशाचा विजय आहे, असेही ते म्हणाले.

पालकमंत्री बावनकुळे म्हणाले, की तिरंगा यात्रेच्या माध्यमातून सर्वधर्मसमभाव व देशाच्या एकतेचे दर्शन होत आहे. ही यात्रा आपल्या सैनिकांनी दाखवलेल्या कर्तृत्वाप्रति कृतज्ञता आणि अभिमान दर्शवत आहे.

---

### चार तास रेल्वे वाहतूक बंद

**नागपूरः दि.१८ :** रेल्वे विभागाकडून येत्या बुधवारी (२१ मे) अप गुड्स लूप लाईनवर लक्ष केंद्रित करून १२ तासांचे नॉन-इंटरलॉकिंग (एनआय) काम होणार असल्याने चार तास वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातील नागपूर आणि इटारसी रेल्वे स्थानकादरम्यानच्या तिसऱ्या लाईनच्या कमिशनिंगचा भाग म्हणून नागपूर स्थानकावर प्रमुख रूट रिले इंटरलॉकिंग मॉडिफिकेशनची कामे हाती घेणार आहे. गोधनी रेल्वे स्थानाकापासून उत्तरेकडे जाणाऱ्या मार्गावर अद्यावतीकरण केले जात आहे.

---

## कामठीत म्हाडा उभारणार तब्बल सहा हजार घरे

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूरः दि.१८ :** नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळासाठी (म्हाडा) कामठी येथे सहा हजार घरे बांधण्यास आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यास महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे परिसरातील नागरिकांसाठी मोठ्या प्रमाणात घरे उपलब्ध होणार आहेत.

या बैठकीस उपसचिव अजित कवडे, अश्विनी यमगर यांच्यासह मीसूल व गृहनिर्माण विभागाचे अधिकारी उपस्थित होते, तर कामठी नगरपालिका व म्हाडाचे (नागपूर) अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले. मंत्री बावनकुळे यांनी या घरांसाठी आधार आधारित नोंदणी सुरू करण्याचे, सविस्तर आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले. तसेच, कामठीत ६ एकर जागेवर १०० खाटांचे सुसज्ज रुग्णालय बांधण्यासाठी आरोग्य विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यास सांगितले. म्हाडाच्या अतिक्रमित जागा ताब्यात घेऊन कुंपण घालणे व कुंभारी कॉलनीतील घरे मुद्दल घेऊन व्याज माफ करून नियमित करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. घरकुल बांधकामासाठी वाळू उपलब्धतेबाबत परिपत्रक काढण्याचे निर्देशही देण्यात आले.

---

## रामदेवबाबा विद्यापीठात 'इनोव्हान्झा' उत्साहात

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूरः दि.१८ :** रामदेवबाबा विद्यापीठाच्या स्कूल ऑफ काम्प्युटर सायन्स अँड इंजिनीअरिंगच्या वतीने 'इनोव्हान्झा'चे आयोजन उत्साहात पार पडले ही राष्ट्रीय स्तरावरील प्रकल्प स्पर्धा आहे.

रामदेवबाबा अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन महाविद्यालयाकडून 'शिक्षणापासून स्वातंत्र्यापर्यंत : एक नवीन दृष्टिकोन' या प्रकल्पासाठी टीम एज्युस्फीअरला पहिले बक्षीस (२० हजार), सिंटेलएआयः एआय-पॉवर्ड व्हिडिओ व डॉक्युमेंट समरायझेशन साठी टीम कॉपी पेस्टला १५ हजारांचे दुसरे बक्षीस मिळाले यवतमाळ शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या 'जीसीओईवाय'ला 'एआय-पॉवर्ड करिअर कोच'साठी तिसरे १० हजार बक्षीस देण्यात आले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आदित्य अभ्यंकर यांनी विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान व सर्जनशीलतेच्या सीमा ओलांडण्यास प्रोत्साहित केले. तंत्रज्ञानातील वाढ व आपल्या नजीकच्या भविष्यात त्याचा प्रभाव यावर भर दिला. कार्यक्रमात व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ. एस. एस. मंथा, कुलगुरू डॉ. राजेश पांडे, प्राचार्य मनोज चांडक, स्कूल ऑफ सीएसईच्या अधिष्ठात्या डॉ. उर्मिला श्रवणकर उपस्थित होत्या.

---

### मोबाईल चोरट्या टोळीचा छडा

**नागपूरः दि.१८ :** रेल्वे स्थानकावर प्रवाशांचे मोबाईल चोरणाऱ्या एका आंतरराज्यीय चोरट्यांच्या टोळीचा लोहमार्ग पोलिसांनी छडा लावला आहे. याप्रकरणी तीन आरोपींना अटक केली असून, त्यांच्याकडून पाच मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. रेल्वे स्थानकाच्या विविध प्लॅटफॉर्मवर दोन प्रवाशांचे मोबाईल चोरी गेल्याच्या तक्रारी लोहमार्ग पोलिस ठाण्यात दाखल झाल्या होत्या. पहिल्या घटनेत बिहारमधील गोलुकुमार रॉय प्लॅटफॉर्म क्रमांक तीनवर बसले असताना त्यांच्या बॅगेतून मोबाईलची चोरी झाली होती दुसऱ्या घटनेत मध्य प्रदेशातील विदिशा येथील रजीत अहिरवार यांचा मोबाईल प्लॅटफॉर्म क्रमांक आठवरून चोरीस गेला होता. या तक्रारींवरून लोहमार्ग पोलिस व रेल्वे सुरक्षा दलाने संयुक्त तपास सुरू केला. सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर पंकज रनगीरे, रितेश उर्फ मोनू रनगीरे (मध्य प्रदेश), आणि जी. शंकर कणेशन (तामिळनाडू) यांना अटक केली.

---

# नागपुरात 'बायो-डायव्हर्सिटी पार्क'ची निर्मिती

## मुख्यमंत्री फडणवीसांच्या उपस्थितीत आढावा बैठक | दीडशेपेक्षा अधिक जातीच्या बांबूची लागवड

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**संशोधन, संवर्धन**

- तीन लाख स्केअर मीटर क्षेत्रातील डायव्हर्सिटी पार्कमध्ये आध्यात्मिक अनुभूतीसह उच्च तंत्रज्ञानाच्या माध्यमातून संवर्धनावर भर राहील. देवराई वन, नक्षत्र वन, राशी वन, औषधी वनस्पती संशोधन व संवर्धन, फुलपाखरु व काजवे असलेले वन, विविध मातींचे वैविध्य जपणारे दालन, पर्जन्यमापन, दिशा शास्त्र, योगा झोन, पीस झोन, फॅमिली झोन, मानसशास्त्र, आरोग्य या प्रमुख घटकांशी अंर्तमुख करणारा हा पार्क असेल.

**नागपूरः दि.१८ :** गोरेवाडा परिसरात सुमारे तीन लाख स्केअर मीटर क्षेत्रात बायो-डायव्हर्सिटी पार्क साकारण्यात येणार आहे. या संदर्भात आज प्राथमिक आढावा बैठक मुख्यमंत्री यांचे शासकीय निवासस्थान 'रामगिरी' येथे पार पडली.

निसर्गाचे जतन आणि संवर्धन ही भावना समाजाच्या प्रत्येक घटकात रुजण्यासाठी निसर्गाच्या माध्यमातून लोकांना कृतिशील संदेश देणे आवश्यक आहे. यासाठी गोरेवाडा परिसरातील प्रस्तावित बायो-डायव्हर्सिटी पार्क एक उत्तम माध्यम ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. पार्क निर्मितीसाठी लागणारा काही निधी शासनाकडून व काही निधी सीएसआरद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**असा असेल पार्क**

निसर्गाशी जवळीकता साधत त्याच्या जपवणुकीविषयी सर्वच धर्मांनी भर दिला आहे. यातील तत्व लक्षात घेऊन हा जैवविविधता पार्क पर्यावरणाच्या संवर्धनासह शिक्षण आणि प्रत्यक्ष अनुभूती देणाऱ्या तीन तत्त्वांवर उभारण्यात येणार आहे यात विद्यार्थ्यांना विविध संशोधनाची, शिक्षणाची संधी मिळेल. कृषी, विज्ञान, वन, जैवविविधता या क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना याचा विशेष लाभ होईल. पूर्वापार चालत आलेली व या मातीत एकरुप असलेली विविध प्रकारची झाडे लावली जाईल. सुमारे दीडशेपेक्षा अधिक बांबूच्या जातींचे याठिकाणी संवर्धन होईल.

विधानपरिषद सदस्य संदीप जोशी, मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त ब्री वैष्णवी, ग्रीन यात्राचे प्रदीप त्रिपाठी आदी मान्यवर उपस्थित होते.

---

# मुख्यमंत्र्यांनी स्वीकारली १,०५१ नागरिकांकडून निवेदने

## वयोवृद्ध, तरुण ते दिव्यांगांचाही समावेश, २१ झोपडपट्टीधारकांना प्राथमिक स्वरुपात पट्टे वाटप

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**मंगळवारी शिबीर**

- 'सर्वांसाठी घरे योजना-२०२२' या धोरणाची प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने नागपूर शहरामधील नझुलच्या जागेवरील ३३ झोपडपट्टीच्या प्रस्तावातील ३,७१४ झोपडपट्टी धारकांचे अतिक्रमण नियमानुकुल करण्यात आले आहे. आजवर मंजूर पट्ट्यांपैकी २,१५७ पीटीएस झोपडपट्टी धारकांना चलान देण्यात आलेले आहेत;परंतु सदर अकृषिक आकारणीची रक्कम चलानद्वारे भरणा केलेली नसल्याने वाटप करण्यास शिल्लक आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून १८ पैकी तुकडोजी नगर, कामगार कॉलनी, भांडेवाडी या तीन झोपडपट्ट्यांमध्ये एकूण १६० झोपडपट्टीधारकांना पट्टे वाटप केले आहेत. ४७४ संबधित पट्टेधारकांनी चलानाची रक्कम शासन जमा केल्यानंतर पट्टा वाटप करण्यात येईल.

**नागपूरः दि.१८ :** हैदराबाद हाऊस येथे शनिवारी आयोजित जनता दरबाराला नागरिकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. यात महिलांपासून वयोवृद्ध नागरिकांपर्यंत, तरुणांपासून दिव्यांग व्यक्तींनी मुख्यमंत्र्यांची भेट घेत त्यांना आपली निवेदने दिली. यात मुख्यमं देवेंद्र फडणवीस यांनी तब्बल १,०५१ नागरिकांकडून निवेदने स्वीकारली

जनता दरबाराचा प्रारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सात वेगवेगळ्या झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या २१ झोपडपट्टीधारकांना प्राथमिक स्वरुपात पट्टे वाटप करून झाला. यानंतर त्यांनी जनतेची निवेदने स्वीकारली.

नागपूर महानगरामध्ये अनेक वर्षांपासून स्वतःच्या मालकी हक्काचे घर व्हावे अशी इच्छा हजारो झोपडपट्टीधारकांची आहे. यापासून वंचित असलेल्या लोकांना पट्टे वाटपाच्या माध्यमातून हक्काचे घर मिळत आहेत. निकषाची पुर्तता करणारा एकही व्यक्ती हक्काच्या घरांपासून वंचित राहणार नाही. जे झोपडपट्टीधारक शासनाच्या निकषात मोडतात त्यांनी आपल्या हक्काच्या घरासाठी महानगरपालिका, नझूल विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. सर्वसामान्य नागरिकांना जनता दरबारातून आपले प्रश्न मार्गी लागतात,असा लोकांचा विश्वास वाढीस लागला आहे. यासाठी महिन्यातून एकदा जनता भेटीचा कार्यक्रम नागपूरमध्ये मुख्यमंत्री या नात्याने मी करतो. यात प्राप्त झालेल्या लोकांच्या निवेदनांवर गंभीरतेने विचार करून पात्र असलेल्या प्रत्येकाला न्याय मिळतो, ही समाधानाची बाब असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

विधान परिषद सदस्य संदीप जोशी, आमदार प्रवीण दटके, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, पोलिस आयुक्त डॉ. रविंद्र सिंगल, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मीणा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, प्रभारी जिल्हाधिकारी प्रदीप कुलकर्णी, महामेट्रोचे महाव्यवस्थापक अनिल कोकाटे आदी उपस्थित होते.

---

### महिला सीमा ओलांडून पाकिस्तानात

**नागपूरः दि.१८ :** नागपुरातील सुनिता जामगडे हिने कारगिलच्या सीमेवरील शेवटच्या 'हुंदरमान' गावातून नियंत्रण रेषा ओलांडून पाकिस्तानात प्रवेश केल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. सुनिता जामगडे संत कबीरनगर भागात राहणारी असून, खासगी रुग्णालयात परिचारिका म्हणून काम करत होती. ती १४ मे रोजी आपल्या १२ वर्षीय मुलासह काश्मीरच्या दिशेने निघाली. पुढे लडाखच्या कारगिल जिल्ह्यातील हुंदरमान या शेवटच्या गावात पोहोचली. मात्र, तिने आपल्या मुलाला 'लवकरच परत येते, असे सांगून सोडून दिले. स्थानिक नागरिकांनी हा मुलगा एकटाच फिरताना पाहून त्याला तातडीने लडाख पोलिसांच्या हवाली केले. अन्य माहितीनुसार, सुनिता ही काही काळापासून पाकिस्तानमधील एका धर्मगुरूच्या संपर्कात होती. त्याच्यासोबतच्या ऑनलाईन संभाषणांमुळे ती मानसिकरित्या प्रभावित झाली होती, असा संशय आहे. सुरक्षा यंत्रणा अधिक तपास करत आहे.

## आयपीएल गुणतालिका

| Teams | M | W | L | T | NR | PTS | NRR |
|---|---|---|---|---|---|---|---|
| गुजरात | 11 | 8 | 3 | 0 | 0 | 16 | +0.793 |
| बेंगलुरु | 11 | 8 | 3 | 0 | 0 | 16 | +0.482 |
| पंजाब | 11 | 7 | 3 | 0 | 1 | 15 | +0.376 |
| मुंबई | 12 | 7 | 5 | 0 | 0 | 14 | +1.156 |
| दिल्ली | 11 | 6 | 4 | 0 | 1 | 13 | +0.362 |
| कोलकाता | 12 | 5 | 6 | 0 | 1 | 11 | +0.193 |
| लखनौ | 11 | 5 | 6 | 0 | 0 | 10 | -0.469 |
| हैदराबाद | 11 | 3 | 7 | 0 | 1 | 7 | -1.192 |
| राजस्थान | 12 | 3 | 9 | 0 | 0 | 6 | -0.718 |
| चेन्नई | 12 | 3 | 9 | 0 | 0 | 6 | -0.992 |

# पंजाबची विजयी गर्जना: राजस्थानवर १० धावांनी मात

नवी दिल्ली : दि. १८ प्रतिनिधी



आयपीएल २०२५ मध्ये राजस्थानातील सवाई मानसिंग स्टेडियममध्ये रविवारी झालेल्या सामन्यात पंजाब किंग्जने राजस्थान रॉयल्सला पराभूत केले. पंजाबच्या २१९ धावांचा पाठलाग करताना राजस्थानचा संघ निर्धारीत २० षटकात २०९ धावाच करू शकला. आक्रमक सुरवातीनंतरही राजस्थानचा अवघ्या १० धावांनी पराभव झाला. पंजाबच्या विजयात नेहल आणि हरप्रीत यांनी महत्वाचा वाटा उचलला.

या विजयामुळे पंजाबचे आता १२ सामन्यांत मिळून एकूण १७ गुण झाले असून रॉयल चॅलेंजर्स बेंगळूरू संघाचेही १२ सामन्यात १७ गुण झाले आहेत. राजस्थान रॉयल्सचे स्पर्धेतील आव्हान यापुर्वीच संपुष्टात आले आहे. गुणतक्त्यात बेंगळूरू पहिल्या तर पंजाब दुसऱ्या स्थानावर आहे.पंजाब किंग्जने दिलेले २१९ धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या राजस्थान रॉयल्सने आक्रमक सुरवात केली. सलामीवीर यशस्वी जयस्वाल आणि वैभव सूर्यवंशी यांनी ५ व्या षटकांपर्यंत ७६ धावा फटकावल्या. वैभवने ४ षटकार आणि ४ चौकारांच्या सहाय्याने अवघ्या १५ चेंडूत ४० धावा फटकावल्या. हरप्रीत ब्रारच्या गोलंदाजीवर झेवियर बार्टलेट याने त्याचा झेल घेतला.

त्यानंतर आठव्या षटकात संघाचे शतक फलकावर लागलेले असताना यशस्वी जयस्वाल २५ चेंडूत ५० धावा काढून बाद झाला. त्याने ९ चौकार आणि १ षटकार ठोकला. त्यानंतर कर्णधार संजू सॅमसन १६ चेंडूत २०, रियान पराग याने ११ चेंडूत १३ धावा कडून स्वस्तात परतले.त्यानंतर ध्रुव जुरेलने ३१ चेंडूत ४ षटकार, ३ चौकारांच्या सहाय्याने ५१ धावांची खेळी केली. पण तोपर्यंत सामना पंजाबच्या बाजूने झुकला होता.पंजाबकडून हरप्रीत ब्रार याने ३ विकेट घेतल्या. तर अजमततुल्लाह ओमरझाई आणि मार्को यानसेन यांनी प्रत्येकी दोन विकेट घेतल्या.तत्पुर्वी नाणेफेक जिंकून पंजाबचा कर्णधार श्रेयस अय्यर याने प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. निर्धारित २० षटकांत पंजाबने ५ बाद २१९ धावा केल्या.

दरम्यान, सामन्याच्या दुसऱ्या डावापूर्वी कर्णधार श्रेयस अय्यरला बाहेर बसवले. श्रेयस थोडा अस्वस्थ असल्यामुळे त्याला विश्रांती देण्यात आली आणि त्याच्या जागी हरप्रीत ब्रार मैदानात उतरला, तर उर्वरित सामन्यासाठी शशांक सिंगने पंजाबच्या कर्णधारपदाची जबाबदारी सांभाळली.श्रेयसने प्रथम डावात फलंदाजी केली होती, पण नेहमीच्या क्रमांक ३ ऐवजी तो क्रमांक ५ व्या क्रमांकावर फलंदाजीला आला. त्याने आपल्या जागी पदार्पण करणाऱ्या मिचेल ओवेनला संधी दिली, मात्र ओवेन केवळ दोन चेंडूत बाद झाला. पंजाबने झपाट्याने सुरुवात केली होती, पण लवकरच प्रियांश आर्य बाद झाला. त्यानंतर ओवेन आणि प्रभसिमरनही झटपट माघारी परतले आणि केवळ ३.१ षटकांत ३४ धावांवर पंजाबचे ३ फलंदाज माघारी गेले.अशा कठीण परिस्थितीत श्रेयसने निहाल वढेरा बरोबर भागीदारी केली.

## हर्ष दुबे चा आलेख: १८ सामने, ९७ विकेट्स



नवी दिल्ली : दि. १८ प्रतिनिधी

भारताचा अ संघ ३० मे पासून होणाऱ्या कसोटी मालिकेसाठी इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे. यासाठी बीसीसी आणि भारतीय संघाची घोषणा केली आहे. यामध्ये भिमन्यू ईश्वरण याच्याकडे भारतीय असंघाचे कर्णधार पद सोपवण्यात आले आहे. तर या संघाचा उपकर्णधार ध्रुव जुरेल असणार आहे. त्याचबरोबर या संघामध्ये करुण नायरला देखील संघामध्ये स्थान मिळाले आहे. असे म्हटले जाते की कोणत्याही मोठ्या पदावर पोहोचण्यासाठी खूप कठीण मेहनत घ्यावी लागते. त्यानंतरच यशाचे फळ मिळते आणि ते फळ देखील गोड असते.कठीण परिश्रमानंतर यश कधी दार ठोठावेल हे सांगता येत नाही. महाराष्ट्रात जन्म झालेला २२ वर्षीय स्टार गोलंदाज हर्ष दुबे देखील अशाच आशेने देशांतर्गत स्पर्धांमध्ये सतत कठोर परिश्रम करत होता. तथापि, १६ मे रोजी, जेव्हा या तरुण खेळाडूची इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय अ संघात निवड झाली तेव्हा त्याला त्याच्या कठोर परिश्रमाचे फळ मिळाले. हर्षची पहिल्यांदाच भारतीय अ संघात निवड झाली आहे.आता त्याच्याकडून आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी अपेक्षा आहे. भारत अ संघाच्या इंग्लंड दौऱ्यासाठी निवडलेल्या संघात एक नवीन नाव सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे ते म्हणजे हर्ष दुबे. या २२ वर्षीय डावखुरा फिरकी गोलंदाजाने आपल्या शानदार कामगिरीने सर्वांना आश्चर्यचकित केले आहे. महाराष्ट्रातील पुणे येथे जन्मलेल्या हर्ष दुबेने डिसेंबर २०२२ मध्ये रणजी ट्रॉफीसह प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. फक्त तीन हंगामात त्याने आपल्या गोलंदाजीने अशी जादू निर्माण केली की निवडकर्त्यांनाही त्याच्या प्रतिभेकडे दुर्लक्ष करता आले नाही.२०२४-२५ चा रणजी ट्रॉफी हंगाम हर्षसाठी खूप खास होता. त्याने या हंगामात ६९ बळी घेत एक नवा विक्रम रचला आणि विदर्भाला रणजी जेतेपद जिंकून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्याच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी, त्याला 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट' म्हणून निवडण्यात आले. हर्षने आतापर्यंत १८ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये एकूण ९७ विकेट्स घेतल्या आहेत. तो अलिकडेच सनरायझर्स हैदराबाद संघात दाखल झाला आहे, ज्यामुळे त्याचा आत्मविश्वास आणखी वाढला आहे.

## विराटला भारतरत्न पुरस्कार मिळायला हवा-सुरेश रैना

नवी दिल्ली : दि. १८ प्रतिनिधी

भारतीय क्रिकेटच्या इतिहासात केवळ एकाच खेळाडूला भारतरत्न पुरस्काराने सन्मानित केलं गेलं आहे. भारतीय क्रिकेटसाठी बहुमूल्य योगदान देणाऱ्या सचिन तेंडुलकरला २०१४ मध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. त्यानंतर कुठल्याही खेळाडूला हा पुरस्कार दिला गेलेला नाही. आता माजी भारतीय क्रिकेटपटूने विराट कोहलीला भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा अशी मागणी केली आहे.

भारताचा माजी क्रिकेटपटू सुरेश रैनाने स्टार स्पोर्ट्सच्या एका कार्यक्रमात बोलताना म्हटले की, '' विराट कोहलीने जे यश मिळवलं आहे आणि भारतीय क्रिकेटसाठी जे काही केलं आहे ते पाहता त्याला भारतरत्न पुरस्कार मिळायला हवा. भारत सरकारने त्याला भारतरत्न पुरस्कार द्यायला हवा.''विराट कोहलीने भारतीय क्रिकेटमध्ये मोलाचं योगदान दिलं आहे. २०२४ मध्ये झालेल्या टी २० वर्ल्डकप स्पर्धेत भारतीय संघाने जेतेपदाला गवसणी घातली होती. ही स्पर्धा झाल्यानंतर विराट कोहलीने टी २० क्रिकेटला रामराम करण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयामुळे सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला होता. मात्र, दिलासा या गोष्टीचा आनंद होता की टी २० नाही, तर वनडे आणि कसोटीत विराट खेळताना दिसेल. मात्र आता त्याने कसोटी क्रिकेटमधूनही निवृत्त होण्याचा निर्णय घेतला आहे.येत्या काही दिवसांत भारतीय संघ कसोटी मालिकेसाठी इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे.

## रोस्टन चेसच्या हाती वेस्ट इंडिजच्या कसोटी संघाची कमान

नवी दिल्ली : दि. १८ प्रतिनिधी



रोस्टन चेसची वेस्ट इंडिजचा नवा कसोटी कर्णधार म्हणून तर डावखुरा फिरकी गोलंदाज जोमेल वॉरिकनची उपकर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. येत्या २५ जूनपासून ऑस्ट्रेलिया विरूद्ध वेस्ट इंडिज तीन कसोटींची मालिका घरच्या मैदानावर खेळणार आहे. या मालिकेत चेस प्रथमच कसोटी संघाचे नेतृत्व करणार आहे.२५ जून पासून होणारी कसोटी ही रोस्टन चेसची ५० वी कसोटी असणार आहे. त्याने दोन वर्षांपुर्वी शेवटचा कसोटी सामना खेळला होता. ब्रिजटाऊन येथे २५ जूनपासून पाहिल्या कसोटीला सुरुवात होणार आहे. ही कसोटी मालिका दोन्ही संघांसाठी २०२५-२७ च्या डब्ल्यूटीसी सायकलमधील असणार आहे. सीडब्ल्यूआयने स्पष्ट केले की, चेसची निवड ही त्याच्या नेतृत्व शैली, वर्तन आणि भूमिका पाहूण करण्यात आली आहे.रोस्टन चेसने दोन वर्षांपूर्वी जोहान्सबर्ग येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्ध आपला ४९ वा कसोटी सामना खेळला होता. तेव्हापासून वेस्ट इंडिज संघाने १३ कसोटी सामने खेळले आहेत. २०१६ मध्ये पदार्पण करणाऱ्या रोस्टन चेसने २६.३३ च्या सरासरीने २२६५ धावा केल्या आहेत, ज्यामध्ये ५ शतकांचा समावेश आहे. त्याने ८५ विकेट्सही घेतल्या आहेत. चेसने यापूर्वी एका एकदिवसीय आणि एका टी-२० सामन्यात वेस्ट इंडिजचे नेतृत्व केले आहे. कसोटी संघाचे कर्णधारपद स्वीकारताच चेसला ऑस्ट्रेलियाकडून कठीण आव्हानाचा सामना करावा लागेल. डावखुरा फिरकी गोलंदाज जोमेल वॉरिकन ऑस्ट्रेलियाविरुद्ध उपकर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारेल.चेसच्या निवडीवर वेस्ट इंडिजचे मुख्य प्रशिक्षक डॅरेन सॅमी म्हणाले, 'मी या नियुक्तीचे पूर्णपणे समर्थन करतो. आमच्या नवीन कर्णधाराने त्याच्या समवयस्कांचा आदर मिळवला आहे, या भूमिकेसोबत येणारी जबाबदारी समजून घेतली आहे आणि या संघाला पुढे नेण्यासाठी आवश्यक असलेले नेतृत्वगुण त्याने दाखवले.' यावेळी निवड समितीने जॉन कॅम्पबेल, टेविन इमलाच, जोशुआ दा सिल्वा, जस्टिन ग्रीव्हज आणि वॉरिकन यांची देखील चाचणी केली होती.३३ वर्षीय चेसने क्रेग ब्रेथवेट यांच्याकडून पदभार स्वीकारला आहे. ज्यानी मार्चमध्ये कसोटी संघाचे नेतृत्व करताना ३९ सामने खेळल्यानंतर राजीनामा दिला होता. वेस्ट इंडिजने त्यापैकी १० कसोटी जिंकल्या आहेत. त्याचबरोबर २२ कसोटी गमावल्या आहेत. तसेच सात कसोटी अनिर्णित राहिल्या आहेत.

## स्पेनमध्ये चाहत्याने कहरच केला; चक्क विद्यापीठात रोहितची जर्सी दाखवून दिला ट्रिब्यूट

नवी दिल्ली : दि. १८ प्रतिनिधी




भारताचा स्टार आणि कर्णधार रोहित शर्मा याने कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. त्याने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करून कसोटी क्रिकेटला रामराम केला आहे. यानंतर सोशल मीडियावर त्याचे चाहत्यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या. आता रोहित शर्मा फक्त एक दिवसीय क्रिकेटमध्ये खेळताना पाहायला मिळणार आहे त्याचबरोबर तो आयपीएल देखील खेळत आहे. आता रोहित शर्माच्या एका चाहत्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर वाऱ्यासारखा व्हायरल होत आहे.या व्हिडीओमध्ये चक्क रोहित शर्माचे चाहता हा रोहित शर्माची जर्सी घेऊन युनिवर्सिटीमध्ये त्याची डिग्री घेण्यासाठी गेला. व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये एक रोहित शर्माचा चाहता हा त्याच्या युनिव्हर्सिटी कोर्टमध्ये डिग्री घेताना दिसत आहे. तो लाईनीत उभा असतो आणि जेव्हा त्याचा नंबर येतो तेव्हा तो स्टेजवर जाऊन सर्वांसमोर ४५ नंबरची जर्सी ही दाखवतो. या जर्सीवर ४५ नंबर आणि रोहित असे नावही आहे. या घटनेचा व्हिडिओ हा सोशल मीडियावर सध्या प्रचंड वायरल होत आहे.रोहित शर्माने ७ मे रोजी सोशल मीडियावर त्याच्या त्याचा फोटो काढून कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे.

त्यानंतर सर्वांनाच धक्का बसला त्यानंतर काल म्हणजेच १६ मे रोजी वानखेडे मैदानावर रोहित शर्मासाठी अभिमानाची बाब म्हणजे त्याच्या नावाचे ऐतिहासिक मैदानावर उभारण्यात आलेले स्टॅन्ड. वानखेडेच्या मैदानावर रोहित शर्माच्या नावाचे स्टॅन्ड उभारण्यात आले आहे त्याचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शरद पवार यांच्या उपस्थितीत या स्टॅंडचे उद्घाटन करण्यात आले.या उद्घाटन समारंभाच्या वेळी रोहित शर्माचे आई-वडील, भाऊ वहिनी आणि त्याचबरोबर त्याची पत्नी रितिका देखील ते उपस्थित होते. काल रोहित शर्मोने भाषण केले यामध्ये त्यांनी त्याच्या कुटुंबाचे आभार मानले. त्याचबरोबर बीसीसीआयने मुंबई क्रिकेट बोर्डाचे देखील आभार मानले. रोहित शर्माचे नेतृत्वात भारताचे संघाने मागील वर्षात २०२४ मध्ये टी ट्वेंटी विश्वचषक नावावर केला. त्याचबरोबर २०२५ मध्ये भारताच्या संघाने चॅम्पियन ट्रॉफी देखील नावावर केली आहे. भारताचे संघाने रोहित शर्माचे नेतृत्वात मागील काही वर्षांमध्ये खूप चांगले कामगिरी केले आहे त्याचबरोबर मागील बारा महिन्यांमध्ये त्याने दोन आयसीसी ट्रॉफी जिंकल्या आहेत.

## इलेक्ट्रिक वाहनांचा दीर्घकालीन आर्थिक फायदा




मुंबई भारतात इलेक्ट्रिक वाहनांचा () अवलंब वाढत आहे, कारण पारंपरिक इंधन वाहनांपेक्षा () यांचे दीर्घकालीन आर्थिक फायदे स्पष्ट आहेत. प्रारंभिक खरेदी किंमत जास्त असली, तरी कमी चालवण्याचा आणि देखभालीचा खर्च ला शाश्वत आणि किफायतशीर पर्याय बनवतो. ., ६०% बाजारहिस्स्यासह, . सारख्या मॉडेल्सद्वारे मूल्य समानता साधत आहे. च्या आकडेवारीनुसार, २०२४ मध्ये इलेक्ट्रिक प्रवासी वाहनांच्या विक्रीत २२% वाढ होऊन ८९,००० युनिट्सवर पोहोचली, तर एकूण विक्री १९ लाख युनिट्सवर गेली, जी २७% वाढ दर्शवते.. ची खरेदी किंमत १२.४९ लाख रुपये असून, समकक्ष पेट्रोल (११.६९ लाख), डिझेल (१३.०९ लाख), हायब्रिड (१८.४३ लाख) आणि (१२.०९ लाख) वाहनांपेक्षा स्पर्धात्मक आहे. मध्ये चार्जिंगचा खर्च (प्रति किमी ०.८७ रु.) पेट्रोल (६.०६ रु.) आणि डिझेल (३.८२ रु.) पेक्षा खूपच कमी आहे. . चा वार्षिक इंधन खर्च १५,७०३ रुपये आहे, तर पेट्रोल वाहनासाठी १,०९,१८४ रुपये आणि डिझेलसाठी ६८,८८३ रुपये आहे. कमी हालचाल करणारे भाग असल्याने देखभाल खर्चही कमी (४,००० रु.) आहे. रूफटॉप सोलर सिस्टमद्वारे शून्य-खर्च मोबिलिटी शक्य आहे.

पाच वर्षांत . चा संचालन खर्च १.७७ लाख रुपये आहे, तर पेट्रोल (६.५० लाख), डिझेल (४.५६ लाख), हायब्रिड (४.७३ लाख) आणि (३.७८ लाख) वाहनांपेक्षा खूपच कमी आहे. . च्या ., ., ., . आणि . (किंमत ७.९९-२२ लाख) यांनी बाजारात वर्चस्व राखले आहे. सरकारी प्रोत्साहन आणि नाविन्य यामुळे भारताचे भविष्य बनत आहेत.

# भारताने पाकिस्तानसाठी सर्व व्यापारी मार्ग केले बंद

## आखाती देशांमधून येणाऱ्या शिपमेंटचीही कसून तपासणी

नवी दिल्ली : दि. १८ प्रतिनिधी



भारत युएई, इराण आणि इतर आखाती देशांमधून येणाऱ्या सर्व शिपमेंटची कसून तपासणी करत आहे. याद्वारे सरकार पाकिस्तानमधून येणारा कोणताही माल कोणत्याही मार्गाने भारतात पोहोचू नये याची खात्री करू इच्छिते. सरकार ट्रान्सशिपमेंट हबमधून येणाऱ्या वस्तूंची देखील तपासणी करत आहे.याशिवाय, पाकिस्तानी वस्तू कोणत्याही तिसऱ्या देशातून भारतात पोहोचतात का यावरही अधिकारी लक्ष ठेवून आहेत. २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर दोन्ही देशांमधील सर्व व्यापार बंद आहे.सरकारी अधिकाऱ्यांनी सांगितले की, युएई आणि आखाती देशांमधून आयात केलेल्या वस्तूंचे लेबल आणि मूळ देश, म्हणजेच जिथे ते उत्पादित केले गेले होते, त्यांची काटेकोरपणे तपासणी केली जात आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने एका अधिसूचनेत म्हटले होते की, 'ही बंदी राष्ट्रीय सुरक्षेअंतर्गत लादण्यात आली आहे.'पाकिस्तानशी व्यापारी संबंध संपल्यानंतरही, पाकिस्तानी खजूर यूएईमार्गे देशात येत होते. भारताने याबद्दल यूएईकडे चिंता व्यक्त केली होती. एका सरकारी अधिकाऱ्याने सांगितले की, हा भारत-यूएई व्यापक आर्थिक भागीदारी कराराचा गैरवापर आहे.२०१९ मध्ये पुलवामा दहशतवादी हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तान व्यापारी संबंध बिघडले होते. त्यानंतर भारताने शेजारील देशातून आयात होणाऱ्या सर्व वस्तूंवरील आयात शुल्क २००% पर्यंत वाढवले. यामध्ये ताजी फळे, सिमेंट, पेट्रोलियम उत्पादने आणि खनिज धातूंचा समावेश आहे.

२०१७-१८ च्या सुरुवातीला, पाकिस्तानची भारताला होणारी निर्यात ४८८.५ दशलक्ष डॉलर्स होती. त्यावेळी पाकिस्तानमधून आयात होणाऱ्या दोन मुख्य वस्तू म्हणजे फळे आणि सिमेंट. २०० टक्के आयात शुल्क लादणे म्हणजे आयातीवर अक्षरशः बंदी घालणे. पहलगाम हल्ल्याच्या १५ दिवसांनंतर, ७ मे रोजी पहाटे १ वाजता भारताने पाकिस्तानच्या ७ शहरांमधील ९ दहशतवादी तळांवर हवाई हल्ले केले. यामध्ये १०० हून अधिक दहशतवादी मारले गेले. तिन्ही सैन्यांनी संयुक्तपणे केलेल्या पाकिस्तानवरील या हल्ल्याला 'ऑपरेशन सिंदूर' असे नाव देण्यात आले. भारताच्या या कृतीमुळे पाकिस्तानने सर्व प्रकारचे व्यापार थांबवण्याची घोषणा केली होती.

## रिलायन्समध्ये गुंतवणूक करणारे झाले मालामाल, ५ दिवसात कमावले १ लाख कोटी रुपये

नवी दिल्ली : दि. १८ प्रतिनिधी

सर्व जागतिक आव्हानांमध्येही गेल्या आठवड्यात शेअर बाजारासाठी उत्तम कामगिरी झाली आणि भारतीय बाजाराने आपली ताकद दाखवली. सेन्सेक्स-निफ्टीमधील तेजीच्या व्यापारात, बाजार मूल्याच्या बाबतीत सेन्सेक्सच्या टॉप १० पैकी ९ कंपन्यांनी गुंतवणूकदारांच्या संपत्तीत प्रचंड वाढ केली.

दरम्यान, या कंपन्यांच्या एकत्रित बाजार भांडवलात ३.३५ लाख कोटी रुपयांची वाढ झाली. मुकेश अंबानी यांच्या नेतृत्वाखालील रिलायन्समध्ये गुंतवणूकदारांनी अवघ्या पाच दिवसांत १ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक केली आहे, तर टाटा ग्रुपच्या टीसीएस आणि एचडीएफसी बँकेने मोठा नफा कमावला आहे.गेल्या आठवड्यात, जेव्हा जेव्हा शेअर बाजारात तेजी आली, तेव्हा मुकेश अंबानी यांची कंपनी असलेल्या रिलायन्स इंडस्ट्रीजचा शेअर ( स्टॉक) रॉकेटसारखा वाढत असल्याचे दिसून आले. याचा परिणाम असा झाला की रिलायन्सचे बाजार भांडवल १९.७२ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढले आणि त्यानुसार, रिलायन्सच्या गुंतवणूकदारांनी फक्त पाच दिवसांत १.०६ लाख कोटी रुपयांचा मोठा नफा कमावला.रिलायन्स व्यतिरिक्त, ज्या आठ कंपन्यांचे बाजारमूल्य वाढले त्यात आयसीआयसीआय बँक दुसऱ्या स्थानावर होती. आयसीआयसीआय बँकेचे एमकॅप ४६,३०६.९९ कोटी रुपयांनी वाढून १०.३६ लाख कोटी रुपयांवर पोहोचले. याशिवाय, टाटा ग्रुपच्या आयटी कंपनीचे मार्केट कॅप ( मार्केट कॅप) ४३,६८८.४ कोटी रुपयांनी वाढून १२.८९ लाख कोटी रुपये झाले. दरम्यान, इन्फोसिसने आपल्या बाजारमूल्यात ३४,२८१.७९ कोटी रुपयांची भर घातली आणि ती ६.६० लाख कोटी रुपयांपर्यंत वाढली.

## कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण

नवी दिल्ली : दि. १८ प्रतिनिधी



ट्रम्पच्या शुल्क आणि भू-राजकीय तणावाचा जागतिक अर्थव्यवस्थेवर कोणत्या ना कोणत्या प्रकारे परिणाम दिसून येत आहे. अशा परिस्थितीत, एक प्रश्न वारंवार उपस्थित होत आहे की जग आर्थिक मंदीकडे जात आहे का? जागतिक संपत्ती व्यवस्थापन कंपनी एमके वेल्थ मॅनेजमेंटने त्यांच्या ताज्या अहवालात म्हटले आहे की ब्रेंट क्रूड तेलाच्या किमतीत लक्षणीय घट झाली आहे.

सध्या ते प्रति बॅरल ६३-६४ च्या श्रेणीत व्यवहार करत आहे. ब्रेंट क्रूडमध्ये ही घसरण विशेषतः जागतिक आर्थिक मंदीच्या वाढत्या भीतीमुळे दिसून येत आहे, असे संपत्ती व्यवस्थापन कंपनीचे मत आहे. अमेरिकेत ट्रम्प प्रशासनाने अलिकडेच लादलेल्या प्रत्युत्तरात्मक शुल्कामुळे जागतिक वाढ आणि मागणीच्या स्थिरतेसमोर आव्हाने निर्माण झाली आहेत.एमके वेल्थ मॅनेजमेंटच्या अहवालानुसार, मागणीबाबतचा दृष्टिकोन दबावाखाली आहे. प्रमुख आंतरराष्ट्रीय संस्थांनी असा अंदाज वर्तवला होता की जागतिक तेल पुरवठा एकतर स्थिर राहील किंवा किरकोळ वाढेल, तर मागणी कमी होऊ शकते. या अंदाजांचा आणि आर्थिक घडामोडींमध्ये मंदीच्या लक्षणांचा किमतींवर नकारात्मक परिणाम होत आहे. आम्ही तुम्हाला सांगतो की, एमके वेल्थ मॅनेजमेंट लिमिटेड ही एमके ग्लोबल फायनान्शियल सर्व्हिसेसची संपत्ती व्यवस्थापन युनिट आहे.अहवालानुसार, पारंपारिकपणे तेल बाजारपेठेत मोठा खरेदीदार राहिलेला चीनही मोठ्या प्रमाणात तेल खरेदीतून माघार घेऊ लागला आहे. यामागे अनेक घटक आहेत. चीनचा जीडीपी विकास दर ५ टक्क्यांपेक्षा कमी झाला आहे, उपभोगाची मागणी कमकुवत झाली आहे आणि इलेक्ट्रिक वाहनांकडे स्पष्टपणे वळले आहे. विशेष म्हणजे एनर्जी इन्फॉर्मेशन ॲडमिनिस्ट्रेशन () ने नोंदवलेल्या तेलाच्या साठ्यात घट झाली असली तरी, किमतींवर दबाव कायम आहे. ही असमानता बाजाराच्या चिंता आणखी वाढवत आहे.केडिया कमोडिटीजचे संचालक अजय केडिया म्हणतात की, पुरवठा वाढण्याची शक्यता असल्याने कच्च्या तेलाच्या किमती कमी होत आहेत. याचा अर्थ असा की वाढत्या पुरवठ्यामुळे आणि मागणीतील संभाव्य अस्थिरतेमुळे तेल बाजार नकारात्मक ट्रेंडमध्ये आहे.

# मिस्टर, मिसेस, मिस, किड्स, टीन महाराष्ट्र सिझन २ फॅशन शोने आणली रंगत!

## तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी, के.पी. इव्हेन्ट मॅनेजमेंट क्रू द्वारा आयोजन

## कॅट वॉक, आकर्षक वेशभूषांनी वेधले लक्ष

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला : दि. १८ :** कलाकारांच्या विविध गुणांना वाव देऊन त्यांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे कार्य तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटीच्यावतीने सातत्याने केले जात आहे. त्या अनुषंगाने दरवर्षी महिला, बालक आणि कलाकारांना एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विविध सांस्कृतिक, बौद्धिक, सामाजिक जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. या मालिकेअंतर्गत अकोला महानगरात भव्य स्वरुपात मिस्टर, मिसेस, मिस, किडस, टीन महाराष्ट्र सिझन २ स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला उदंड प्रतिसाद मिळाला. पोलीस लॉन येथे शनिवारी सायंकाळी संपन्न अंतिम स्पर्धेत विविध स्पर्धकांनी आपली कला सादर केली.

पंचांनी दिलेल्या निर्णयानुसार विजेते ठरले. त्यामध्ये मिस गटात मानसी शहापूरकर, मास्टर गटात प्रणव येवले अमरावती हे विजेते ठरले आहेत. या सोहळ्यासाठी स्पेशल गेस्ट म्हणून अंजना बार्लेकर, प्रिया सरकटे, संजना चव्हाण उपस्थित होते तर शो ओपनर अंजली म्हाला, शो टॉपर वैष्णवी कोठे, शो टॉपर आर्या ढोमणे, शो टॉपर पृथ्वीराज आदींची उपस्थिती होती. या सोहळ्याचे ग्रोमिंग जज म्हणून आयेशा पोटे तर ज्युरी म्हणून धनश्री भगत, गौरव राऊत हे उपस्थित होते. या सोहळ्याला दास सेल्स अँड सर्व्हिस, अंकित बनकर, बाबा जान बिर्याणी हाऊस, प्रिया बुटीक अँड रेंटल, इलावेट डान्स स्टुडिओ, अनुराग सिरसाट फोटोग्राफी, ब्युटी हाऊस, एम. एच. थर्टी फॅन्सी लक्झरी, ब्रॅण्ड्स, ग्रुप बूस्ट यांचे सहकार्य लाभले.

दोन दशकांपासून महिला, बालक आणि उद्योगाच्या क्षेत्रात प्रसिद्ध उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते डॉ. सुगत वाघमारे यांच्या नेतृत्वात यशस्वीपणे कार्यरत असलेल्या तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी आणि के. पी. इव्हेन्ट मॅनेजमेंट क्रू द्वारा आयोजित तसेच सुपर्ब कन्स्ट्रक्शन आणि मीडिया पार्टनर दैनिक अजिंक्य भारत यांच्या सहकार्याने आयोजित मिस्टर, मिसेस, मिस, किडस, टीन महाराष्ट्र-२ ग्रँड फिनाले फॅशन शो मधील विजेते स्पर्धकांची निवड करण्यात आली.

या स्पर्धेला स्पर्धकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. या सोहळ्याला तिक्ष्णगत संस्थेचे सचिव विष्णुदास मोंडोकार, अॅड.संजय सेंगर, अॅड. दिनेश कवडे, प्रा.प्रदीप अवचार, संदीप पळसपगार, श्रीकांत पिंजरकर, सचिन पाटील, अभिषेक गेडाम, अनुराग शिरसाट, अश्विन शिरसाट, श्रीकांत पिंजरकर, अनिल चव्हाण, विनीत खंडारे, मोहन कोरपे, बाबा रिझवान, शोभना ठाकरे यांच्यासह अनेकांची व्यासपीठावर उपस्थिती होती तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी शो मॅनेजमेंट डायरेक्टर करण पळसपगार आणि तिक्ष्णगत संस्थेचे जिल्हा समन्वयक सचिन पाटील, विशाल शिंदे, अंकुश सिरसाट, बॉबी पळसपगार, उमेश शिरसाट, श्वेता शिरसाट, सुचिता घोगरे, सपना म्हात्रे, यश साळवे, रश्मी घुगे, सुनिता बेलखेडे, भीमराज शिरसाट, गजानन तायडे आदींनी परिश्रम घेतले.

































* सर्व छाया : संजय ताथुरकर * सजावट व मांडणी : अक्षय जायले * संकलन : सिद्धार्थ तायडे




अजिंक्य भारत
# आपलं अकोला
अकोला, सोमवार, दि. १९ मे २०२५




# शहरातील घनकचरा आता थेट चालला भोडला

## बायोगॅस व बायोमायनिंग प्रकल्प कार्यान्वित

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १८ :** शहर स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन संदर्भात आयुक्त यांनी सक्त पाऊल उचलले असून नायगाव डम्पिंग ग्राउंड व भोड येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित केले आहेत. नायगाव डम्पिंग ग्राउंड वरील कचऱ्याची भीषण समस्या पाहता शहरातील कचरा आता थेट भोड येथे नेला जात आहे.

शहरातून संकलित केलेला घनकचरा नायगाव येथील डम्पिंग ग्राउंडवर टाकला जात होता मात्र, बायोमायनिंग बंद असल्याने येथे कचऱ्याची ढीग तयार झाले होते. भोड येथेही पूर्ण क्षमतेने घनकचऱ्यावरील प्रक्रिया होत नसल्याने शहरातील कचरा नायगाव येथे मोठ्या प्रमाणात साचत असल्याची परिस्थिती निर्माण झाली होती. ही बाब ध्यानात घेता आयुक्त यांनी दोन्ही प्रकल्प कार्यान्वित केले असून शहरातील दैनंदिन संकलित होणारा घनकचरा थेट भोड येथे नेला जात आहे.

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी नायगाव व भोड येथे प्रकल्प उभारण्यात आले आहेत. मात्र, नायगाव डम्पिंग ग्राउंडवर बायोमायनिंग प्रकल्प बंद असल्याने कचरा साचण्याचे प्रमाण वाढले होते. हा प्रकल्प आता कार्यान्वित करण्यात



आला असून भोड येथील बायोगॅस प्रकल्पही पूर्ण क्षमतेने सुरू झाला आहे. त्यामुळे शहरातून गोळा करण्यात येत असलेला कचरा थेट भोड येथे नेला जात आहे.

### कामकाजावर वॉच

शहरातील स्वच्छतेसंदर्भात आयुक्त यांनी ठोस पावले उचलली असून शहर स्वच्छतेसाठी कार्यवाही सुरू केली आहे. त्या अनुषंगाने स्वच्छता विभागाला निर्देश दिले असून कामकाजावर वॉच ठेवला जात आहे.

### हयगय खपवून घेतली जाणार नाही

शहरात उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर आता प्रशासनाद्वारे कारवाई करण्यात येणार असून प्लास्टिक पिशव्या संदर्भात दैनंदिन कारवाया सुरू करण्यात आल्या आहेत. आयुक्त यांनी स्वच्छते संदर्भात अधिकाऱ्यांची कान उघाडणी केल्याची माहिती आहे. शहर स्वच्छते संदर्भात कुणाचीही गय केली जाणार नसल्याच्या सूचना आयुक्त यांनी प्रशासनाला दिल्याचे समजते.

# दोन लाखांहून अधिक किंमतीचा गांजा जप्त, आरोपी फरार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १८ :** अंमली पदार्थांच्या विरोधात कारवाईसाठी कार्यरत असलेल्या उपविभागीय पोलीस अधिकारी (अकोला शहर) यांच्या विशेष पथकाने आज दिनांक १७ मे २०२५ रोजी अकोट फाईल पोलीस स्टेशनच्या हद्दीत मोठी कारवाई केली. या कारवाईत २ लाख ७ हजार ७२० रुपये किंमतीचा गांजा, १ लाख रुपयांची दुचाकी आणि २० हजार रुपयांचे दोन मोबाईल असा एकूण ३ लाख २७ हजार ७२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

विशेष पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, अकोट फाईल परिसरात काही इसम गांजाची खरेदी-विक्री करण्याच्या तयारीत असल्याचे समजले. माहिती खात्रीलायक असल्याने उपविभागीय पोलीस अधिकारी अकोला शहर यांच्या परवानगीने



पथकाने सापळा रचून जुने रेल्वे क्वॉर्टर परिसरात छापा टाकला.

या कारवाईत आवेश खान आसीफ खान ( २१), रा. हमजा प्लॉट, जुने शहर, अकोला) आणि त्याच्या एका साथीदारास ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून १० किलो ३८८ ग्रॅम वजनाचा गांजा, ३०९८६८ क्रमांकाची पल्सर मोटारसायकल आणि दोन मोबाईल जप्त करण्यात आले.

या प्रकरणात समीर शाह (३०) रा. खडकीपूरा, अकोला हा आरोपी घटनास्थळावरून पळून गेला असून, त्याचा शोध सुरू आहे. अकोट फाईल पोलीस स्टेशनमध्ये या प्रकरणी एनडीपीएस कायदा ८(), २०(), २०()() अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सतिष कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली परिमंडळ पोलीस उपअधीक्षक किरण भोंगवे, पो.उप.नि. रत्नदिप पळसपगार तसेच पोलीस कर्मचारी अनिल खडेकार, रवि घिवे, विनय जाधव, राज चंदेल, प्रफुल्ल बांगर यांनी केली.या कारवाईमुळे अकोला शहरात अंमली पदार्थ तस्करी करणाऱ्यांवर पोलिसांचे कसून लक्ष असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

# जुन्या शहरात सहा- सहा तास अंधाराचे साम्राज्य

## आमदारांच्या निर्देशालाही महावितरणची केराची टोपली

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १८ :** थोडासा वारा आला, एखादी पावसाची सर आली की अकोल्याच्या जुन्या शहरात अंधारच अंधार पसरतो! गेल्या आठ दिवसांपासून दररोज संध्याकाळी ७ वाजता वीज गायब होते आणि थेट मध्यरात्री १२ पर्यंत पुन्हा दर्शन देत नाही. कधी कधी काही मिनिटांसाठी लपंडाव, या सततच्या वीज खंडितीमुळे लहान मुले, वृद्ध, आजारी नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. नवीन शहरात वीज जात नाही, मग जुन्या शहरातच




का? आम्ही काय महावितरणचे ग्राहक नाही का? आम्ही बिल भरत नाही का?अशा संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. विशेष म्हणजे, नवीन शहरातील काही भागात कितीही वादळ वा पाऊस झाला, तरी वीज जात नाही, या प्रश्नाची दखल घेत आमदार रणधीर सावरकर यांनी थेट महावितरणला जाब विचारला आहे.पावसाळ्याआधीच नियोजन करायला हवे, नागरिकांना त्रास होणार नाही याची काळजी घ्या. अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल, असा थेट इशारा त्यांनी अधिकाऱ्यांना दिला होता, मात्र, सावरकरांच्या इशाऱ्यालाही महावितरणने केराची टोपली दाखवली आहे, असेच चित्र आहे. त्यामुळे आमदार सावरकर आता कठोर कारवाईच्या तयारीत असल्याचे बोलले जात आहे. नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत पाहणाऱ्या महावितरणला चोख धडा शिकवण्याची वेळ आली असून, पुढील काही दिवसांत या प्रकरणात खळबळजनक घडामोडी घडण्याची शक्यता आहे.

# नाकाबंदी दरम्यान ६१३ वाहनांवर ३.५५ लाखांची दंडात्मक कारवाई



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १८ :** अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंग यांच्या आदेशानुसार दिनांक १७ मे २०२५ रोजी संध्याकाळी ५ ते रात्री ९ या वेळेत अकोला शहर व जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन हद्दीत झिगझॅग बॅरिकेडिंग करून अचानक नाकाबंदी करण्यात आली. या कारवाईत एकूण १ हजार५७९ वाहनांची तपासणी करण्यात आली.

यामध्ये दोनचाकी १ हजार२०१ व चारचाकी ३६८ अशा एकूण १ हजार ५७९ वाहनांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ६१३ वाहनांवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करत ३ कोटी ५५ हजार ४००रूपयांचा दंड आकारण्यात आला. त्यामध्ये ट्रिपल सिटिंग, विना नंबर प्लेट, सिग्नल जंपिंग, वाहन चालविताना मोबाईल वापरणे, फॅन्सी नंबर प्लेट, विना सीट बेल्ट, काळ्या काचा लावलेली वाहने, लायसन्सशिवाय वाहन चालविणे आदी नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली.या मोहिमेदरम्यान २५ हजार ५०० रूपये दंड वसूल करण्यात आले असून उर्वरित रकमेची वसूली प्रक्रियेत आहे.यासोबतच १८ मे २०२५ पासून २७ मे २०२५ पर्यंत जिल्हाभरात फॅन्सी नंबर प्लेट आणि काळ्या काचा लावलेल्या वाहनांवर विशेष मोहीम राबवण्यात येणार असल्याची माहिती पोलीस अधीक्षक बच्चन सिंग यांनी दिली आहे.

अकोला जिल्ह्यातील नागरिकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे व वाहतुकीचे नियम तंतोतंत पाळावेत, असे आवाहनही त्यांनी केले आहे. वाहन चालवताना सर्व आवश्यक कागदपत्रे जवळ बाळगावीत आणि वाहनावर कोणताही प्रलंबित दंड असल्यास तातडीने भरावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# मनपातील पदोन्नती स्तुत्य

## कर्मचाऱ्यांचे स्थलांतर टाळण्याची परंपरा कायमच!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १८ : महापालिकेत पदोन्नतीचे वारे सुटले असले तरी काही अधिकारी-कर्मचाऱ्यांचे वर्षानुवर्षे एकाच खुर्चीवर ठाण मांडून बसण्याचे प्रकार अजूनही थांबलेले नाहीत. आयुक्त प्रशासन यांनी सुरळीत व गतिमान कामकाजासाठी उचललेले पाऊल कौतुकास्पद असले तरी, त्याच जुन्या जागेवर स्थिरावलेल्या कर्मचाऱ्यांमुळे प्रशासकीय पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता आयुक्तांचे लक्ष या स्थैर्यावर जाते का, याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.**

शासनाने अलीकडेच सेवा प्रवेश नियम व आकृतीबंधास मंजुरी दिल्यानंतर आयुक्त प्रशासन यांनी कामकाज सुरळीत व जलद गतीने पार पडावे यासाठी काही पात्र कर्मचाऱ्यांना वरिष्ठ पदांवर पदोन्नती दिली. ही बाब निश्चितच स्वागतार्ह असून प्रशासनाच्या सकारात्मक दृष्टिकोनाचे द्योतक आहे. मात्र, काही कर्मचाऱ्यांची




गेल्या १० ते १५ वर्षांपासून एकाच जागी कायम तैनाती असल्याने त्यावर आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

महापालिकेतील काही विभागांमध्ये अशा कर्मचाऱ्यांनी आपलेच वर्चस्व निर्माण केले असून तेथील कामकाजात पारदर्शकतेचा अभाव जाणवतो. विशेष म्हणजे काही वरिष्ठ कर्मचाऱ्यांकडे दोन ते तीन विभागांचा अतिरिक्त प्रभार दिला जात असताना, काही कर्मचारी मात्र केवळ एकाच कामकाजात गुंतलेले दिसून येतात. यामुळे कर्मचाऱ्यांचे कार्य विभाजन असमतोल झाल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे. महापालिकेच्या काही विभागांमध्ये कर्मचारी संख्येची कमतरता आहे, तर काही ठिकाणी कर्मचारी संख्या आवश्यकतेपेक्षा अधिक आहे. या असमतोलामुळे कामकाजात गती कमी होत असून, नागरिकांच्या सेवेत अडथळे येत आहेत. उपायुक्त प्रशासन या गंभीर बाबीकडे डोळेझाक करत असल्याचा आरोपही आता होऊ लागला आहे.

आयुक्त प्रशासन यांनी पदोन्नतीसारखा स्तुत्य निर्णय घेतला असला, तरी कर्मचाऱ्यांचे विभागीय स्थलांतर, कार्यबांधणी, आणि जबाबदारीचे समतोल वाटप हे प्रशासनाच्या यशासाठी तितकेच महत्त्वाचे आहेत. त्यामुळे आता आयुक्तांनी याकडे लक्ष देऊन दीर्घकाळापासून एकाच जागी थांबलेल्या कर्मचाऱ्यांचे स्थानांतर करणे, तसेच विभागांमध्ये योग्य प्रमाणात कर्मचारी वितरण करणे, हीच काळाची गरज आहे. नागरिक आणि कर्मचाऱ्यांचे हित लक्षात घेता, या विषयाकडे गांभीर्याने पाहण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.







# ७७ अनोळखी मृतांचे मानवी वारसदार ठरले पराग गवई!

## जात-धर्म न पाहता माणुसकीच्या नात्याने शेवटचा सन्मान; मोहोता मिलमध्ये मानवतेची ज्योत पेटवली

। शरद शेगोकार।

**अकोला, दि. १६ :कधी अर्भक, कधी वृद्ध, कधी तरुण... नावही नसे, चेहरा ओळखू येणार नाही असा. कुणी विचारलं नाही, कुणी थांबलं नाही. पण एका माणसाने, पराग गवई यांनी, माणुसकीच्या नात्याने त्या ७७ अनोळखी मृतदेहांना आपल्या माणसासारखा सन्मान दिला. जात-धर्म न पाहता त्यांनी पेटवलेली शेवटची ज्योत ही आजच्या समाजासाठी मानवतेचा उज्वल संदेश ठरली आहे.**

कुणालाही ओळख नसलेले, नाव माहित नसलेले, काहींचे शरीर सडलेले, काही अपघातात,



तर काही उपेक्षित अवस्थेत मृत्यू पावलेले अशा तब्बल ७७ अनोळखी मृतदेहांना माणुसकीच्या नात्याने वारसा मिळाला आणि तो ठरला पराग गवई.वंचित बहुजन आघाडीचे सामाजिक कार्यकर्ता पराग गवई यांनी ही सामाजिक जबाबदारी आपली मानून गेल्या काही महिन्यांत सिव्हिल लाईन, जुना बसस्थानक, जीएमसी, रेल्वे स्थानक, अपघातस्थळे, पोलिस ठाणे अशा विविध ठिकाणी सापडलेल्या अर्भक, वृद्ध, युवक व महिलांचे शव अंत्यसंस्कारासाठी उचलले. अनेक प्रयत्न करूनही जेव्हा मृतांचे नातेवाईक सापडले नाहीत, तेव्हा पराग गवई पुढे सरसावले.मोहोता मिल परिसरात त्यांनी या ७७ मृतदेहांचे विधीवत अंत्यसंस्कार केले. जात, धर्म, वय, लिंग काहीही न पाहता ''माणूस म्हणून शेवटचा सन्मान मिळालाच पाहिजे'' या तत्त्वावर त्यांनी हे कार्य पार पाडले.या अंत्यसंस्कार सोहळ्यात डॉक्टर, प्राध्यापक, कवी, वकील, पोलिस अधिकारी आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. त्यांच्या कार्याला साथ देण्यासाठी प्रा. प्रसन्नजीत गवई, प्रा. संजय खडसे, कवी अनंत राऊत, डॉ. धैर्यवर्धन पुंडकर, वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### माणुसकीची मशाल

आज जेव्हा माणूस माणसाला विसरत चालला आहे, तेव्हा पराग गवई माणुसकीची मशाल घेऊन समाजात प्रकाश टाकत आहेत. त्यांचं कार्य केवळ अंत्यसंस्कारापुरतं मर्यादित नसून, ते जगण्याला उमेद देणारं एक सशक्त उदाहरण ठरत आहे.अनोळखी मृत आत्म्यांना कोणीतरी आपलं मानलं, त्यांचं अंतिम दर्शन घेतलं, त्यांच्या नावाचा उल्लेख केला हीच खरी मानवतेची शिकवण आहे.



जाहिरात संकलन देवानंद खिरकर अकोट तालुका प्रतिनिधी

# थोडक्यात

## विद्यापीठाची शिक्षण आणि परीक्षा योजना





**अमरावती :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने पी.एच.डी. अभ्यासक्रमासाठीच्या शिक्षण आणि परीक्षा योजनेची घोषणा केली आहे. विद्यापीठाने याबाबत दि. ७ मे, २०२५ रोजी निदेश क्रमांक ३५/२०२५ जारी केला आहे. विद्यापीठ अनुदान आयोग (एम. फिल./पी.एच.डी. पदवी प्रदान करण्यासाठी किमान मानके आणि प्रक्रिया) नियम, २०१६ नुसार ही योजना तयार करण्यात आली आहे. अध्यादेश क्रमांक १/२०१६ च्या तरतुदीनुसार, पीएचडीच्या विद्यार्थ्यांसाठीचा अभ्यासक्रम विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील संशोधन केंद्रांद्वारे चालवला जाईल. मात्र, पेपर-१ म्हणजेच संशोधन पद्धती (रिसर्च मेथॉडॉलॉजी) ची परीक्षा विद्यापीठाद्वारे घेतली जाईल. अभ्यासक्रमासाठीचा अभ्यासक्रम विद्या परिषदेने यापूर्वीच मंजूर केला असून तो विद्यापीठाद्वारे अधिसूचित करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाच्या यशस्वी पूर्णतेनंतर विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे मूल्यांकन श्रेणी पद्धतीने केले जाईल. प्रत्येक विषयातील थेरपी आणि प्रॅक्टीकल परीक्षेतील गुणानुसार विद्यार्थ्यांना श्रेणी प्रदान केली जाईल. यासाठी विद्यापीठाने गुण आणि श्रेणी दर्शविणारी सारणी देखील प्रसिध्द केलेली आहे. संपूर्ण अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या एकत्रित कामगिरीचे मूल्यांकन सेमिस्टर परफॉर्मन्स इंडेक्स (एस.पी.आय.) द्वारे केले जाईल. एस.पी.आय. हा अभ्यासक्रमातील सर्व विषयांमध्ये प्राप्त केलेल्या श्रेणी गुणांचे भारित सरासरी असेल. या परीक्षेसाठी विद्यापीठाच्या इतर लागू असलेल्या नियमांचे पालन केले जाईल, असेही अधिसूचनेत स्पष्ट करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी आचार्य कक्षाच्या उपकुलसचिव सौ. मीनल मालधुरे यांचेशी संपर्क साधावा.

## समस्या घेवून सर्वसामान्य नागरिक पोहोचले जनता दरबारात

**अमरावती :** प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे वारंवार अर्ज विनंत्या, तक्रारी करून तसेच शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवूनसुद्धा न्यायाच्या प्रतिक्षेत असलेल्या शेकडो नागरिकांनी काँग्रेसच्यावतीने आयोजित जनता दरबारात आपली कैफियत , समस्या मांडल्यात, खासदार बळवंतराव वानखडे, माजी मंत्री ॲड. यशोमतीताई ठाकूर, कँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप, शहराध्यक्ष बबलू शेखावत आदींनी नागरिकांच्या समस्या ऐकून त्या सोडविण्याबाबत संबंधित विभागाकडे पाठपुरावा सुरू केला. सर्वसामान्य, गरीब नागरिक, बेरोजगार युवक, शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी तसेच महिला वर्गाने या जनता दरबारात उपस्थित राहून आपल्या समस्या मांडल्याा. खासदार बळवंतराव वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली यशोमतीताई ठाकूर यांच्या गणेडीवाल लेआउट स्थित निवासस्थानी सोमवारी सकाळी ९ पासून जनता दरबार सुरू झाला. यावेळी वीज वितरणकंपनी, कृषी विभाग, महसूल विभाग, आरोग्य विभागाशी संबंधित अनेक गाऱ्हाणी नागरिकांनी मांडल्यात.विशेष म्हणजे अनेक सुशिक्षीत बेरोजगार सुद्धा रोजगाराची मागणी घेवून त्याठिकाणी आले होते. सरकारकडून देण्यात आलेली आश्वासने फोल ठरत असल्याने निराश झालेल्या नागरिकांनी आपल्या व्यथा खासदार बळवंत वानखडे, ॲड,यशोमतीताई ठाकूर यांच्या समोर मांडल्यात. शिवाय तलाठी पदाची पदभरती व इतर विभागातील भरती होत नसल्याने अनेकांच्या पदरी निराशा आली होती. मात्र खासदार श्री. वानखडे, यशोमतीताई ठाकूर यांनी त्या ऐकून घेत संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन देत त्यांच्या वेदनांवर फुंकर घातली. माजी मंत्री ॲड.यशोमतीताई ठाकूर यांच्या निवासस्थानी आयोजित जनता दरबाराला प्रचंड प्रतिसाद मिळाला. त्यानंतर दुपारी १२ पासून स्थानिक काँग्रेस भवन येथे खासदार बळवंत वानखडे, यशोमतीताई ठाकूर, बबलू देशमुख, प्रा. वीरेंद्र जगताप आदींच्या उपस्थितीत नागरिकांनी आपल्या समस्या मांडल्यात.

## धनश्री जाधवचे दहावीत नेत्रदीपक यश



**अंजनगाव बारी :** अमरावती येथील स्थानिक ओईस्टार इंग्लिश स्कूल अमरावती ची विद्यार्थिनी धनश्री संजय जाधव हिने दहावीत ९९% टक्के गुण प्राप्त करून घवघवीत यश प्राप्त केले, धनश्री वडील सर्वसामान्यांना कुटुंबातील असून कंपनीत जॉब करतात आई गृहिणी तिने आपल्या यशाचे श्रेय मुख्याध्यापक कुलकर्णी सर आणि सर्व शिक्षक वृंद व आई वडील भाऊ यांना दिले.

# सदस्य संख्या निश्चितीसाठी शासनाने मागितला अहवाल

## जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकांची तयारी, २०११ च्या जनगणनेनुसार १८ लाख ४ हजार ४९३ लोकसंख्या

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**अमरावती, दि. १८ :** न्यायालयाच्या आदेशावरून आता शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांची तयारी सुरू केली आहे. अशाच शुक्रवारी शासनाकडून जिल्हा प्रशासनाला जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य संख्या निश्चिती करिता अहवाल मागितला आहे. त्यानुसार जिल्हा प्रशासनाने २०११ च्या जनगणनेचा अहवाल शासनाकडे शनिवारी पाठविला आहे. परंतु या अहवालानुसार जिल्हा परिषद जुनी संख्या कायम होणार असून नवीन लोकसंख्येच्या प्रमाणात मात्र ६६ सदस्य संख्या अपेक्षित आहे. त्यामुळे यावर आता प्रशासन कोणता निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

गेल्या तीन वर्षापासून राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका रखडल्या आहेत. ओबीसी आरक्षण आणि वाढीव सदस्य संख्या यावर आतापर्यंत न्यायालयात शासनाचा संघर्ष सुरू असताना सर्वोच्च न्यायालयाने येत्या चार महिन्यात निवडणुका घेण्याचे आदेश शासनाला दिले आहे. त्यामुळे शासन आता ॲक्शन मोडवर आहे. मात्र सदस्य संख्या आणि ओबीसी आरक्षणाचा मुद्द्यावर सध्या तरी संभ्रम कायम आहे.

न्यायालयाने ओबीसी आरक्षण २७% घेण्यात देखील आदेश दिला आहे. त्यामुळे आता या दोन मुद्द्यावर शासनाकडे गाव पुढाऱ्यांचे लक्ष लागले आहे. अशातच शुक्रवारी सदस्य संख्या निश्चित करण्याकरिता जिल्हा प्रशासनाकडून त्या संदर्भात अहवाल मागितला आहे. २०११ च्या जनगणने नंतर किती लोकसंख्या वाढली, शहरी भाग किती झालेत,, पुनर्रचनेत काय बदल झाले आधीची माहिती शासनाने मागितली आहे. जिल्ह्यातील २०११ च्या जनगणनेचा विचार केल्यास १८ लाख ४९२ लोकसंख्या आहे. यामध्ये एस सी प्रवर्गातील तीन लाख ३८ हजार ८८३ तर एसटी प्रवर्गातील तीन लाख ६० हजार ३९० लोकसंख्या आहे. तसेच दिवसा भातपुरी धारणे आणि नांदगाव खंडेश्वर नगरपरिषद वाढली आहे. तर पुनर्रचनेत अतलपूर दर्यापूर नगरपालिकेत ग्रामीण भागातील काही गावे समाविष्ट झाल्याने शहरी भागातील लोकसंख्या वाढली आहे. याशिवाय आजच्या लोकसंख्येचा विचार केल्यास ग्रामीण भागात देखील लोकसंख्या वाढल्याने वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात ६६ जिल्हा परिषद सदस्य व १३२ पंचायत समिती सदस्य असणे गरजेचे आहे. त्यामुळे आता प्रशासनावर शासन काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका चार महिन्याच्या आत घेण्याचे निर्देश राज्य शासनाला दिले आहे. चार आठवड्यात निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना सुद्धा न्यायालयाच्या वतीने देण्यात आले आहे. परंतु राज्य शासनाकडून या आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याचे सध्यातरी घेऊन येत आहे. राज्य शासन न्यायालयाच्या आदेशाचे पालन करणार की पावसाळा तोंडावर असल्याचे सोंग करणार असेही ग्रामीण भागात तीन नागरिक बोलत आहे. गेल्या तीन वर्षापासून जिल्ह्यात प्रशासनात सुरू आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपरिषद या ठिकाणी प्रशासक्रात असून अधिकारी कर्मचारी मात्र सर्वसामान्य नागरिकांना त्रास देत असून कुठलीही काम करण्यास तयार नाही. सत्ताधारी आमदारांच्या चिठ्ठ्या किंवा फोन आल्यावर ती कामे त्वरित केली जातात असे प्रकार गेल्या दोन वर्षापासून पाहायला मिळत आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या आदेश हे योग्य असल्याचे नागरिक बोलत आहे.

## महर्षि वाल्मिकी मठाला निधि मंजूर करण्यासंबंधाने प्रस्ताव सादर

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**दर्यापुर, दि. १८ :** तालुक्यातील सामदा काशीपूर येथील महर्षी वाल्मिकी मठ हा प्राचीन हजारो वर्षाचा मठ आहे. त्याला महाराष्ट्र शासनाने ब वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा दिला आहे. या मठा साठी निधी मिळावा या हेतूने महाराष्ट्र राज्य कृती समितीचे महासचिव व कोळी महादेव जमातीचे नेते उमेश ढोणे हे सातत्याने राज्य शासनाला पत्रव्यवहार करून आमदार, माजी खासदार, मंत्री पालकमंत्री यांचे भेटी घेत आहे याची दखल घेत आमदार रवी राणा माजी खासदार नवनीत राणा यांच्या पत्रावर पालकमंत्री तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे यांना पत्र पाठवून जि. प. अमरावती यांनी यापूर्वीच निधी मागणीचा पाठविलेल्या पत्राचा संदर्भ घेत १६ कोटी मंजूर करावे या संबंधाने प्रस्ताव सादर करावा असे आदेश ना.गोरे यांनी शासनाचे ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव यांना १४ मे २०२५ रोजी दिले आहे. त्यांनी त्यांचे प्रयत्नाला यश येण्यासाठी मंत्रालयात वरील निधीचे पत्र सादर करतेवेळी महर्षि वाल्मिकी यांचे स्मरण करत प्रार्थना केली आहे.व ना. गोरे यांचे त्यांनी या कामी प्राधान्य दिले बद्दल पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

## लेहगाव येथे गुरांच्या बाजाराचा शुभारंभ

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**शिरखेड, दि. १८ :** मोर्शी कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत उपबाजार लेहेगाव येथे दि. १७ मे २०२५ रोजी सकाळी ११ वाजता गुरांचा बाजाराचा शुभारंभ मोर्शी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सभापती सचिन ठोके, उपसभापती संजयराव तट्टे, सचिव भावेश लिखितकर व संचालक मंडळ यांच्या उपस्थितीत मोठ्या थाटात पार पडला. शुभारंभ दिनी ६० ते ७० शेतकऱ्यांनी गुरे विक्रीस आणली. पहिल्याच दिवशी शेतकऱ्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. यामध्ये श्रीधर तट्टे शेतकरी लेह्गाव यांची एक म्हैस ३८००० रु ला विक्री झाली त्यांचा सत्कार सभापती सचिन ठोके यांच्या हस्ते करण्यात आला. हाजी महम्मद अकबर रा चांदूर बाजार यांचा एक गोर्हा २२००० ला विक्री झाला. त्यांचा सत्कार उपसभापती संजय तट्टे यांच्या हस्ते करण्यात आला होता. नारायण सुखदेव हिरडे रा विचोरी यांचे २ गोऱ्हे ३०००० रु ला विक्री झाले. त्यांचा सत्कार अब्दुल रहीम कुरेशी, संचालक यांच्या हस्ते करण्यात आला. प्रफुल्ल मधुकर केचे रा कवठाळ यांची बैल जोडी ८२००० रु ला प्रमोद चोंढे काटपूर यांनी विकत घेतली. यांचा सत्कार प्रकाश विघे, संचालक यांच्यातर्फे करण्यात आला. वरील सर्व शेतकरी बांधवांचा सत्कार शाल व श्रीफळ देऊन करण्यात आला. याप्रसंगी सचिन ठोके, सभापती, संजय तट्टे, उपसभापती, सचिव भावेश लिखित कर, संदीप रोडे, अरुण कोहळे, बाबूलाल ठवळी, अब्दुल रहीम कुरेशी, प्रकाश विघे, बंडू जिचकार, प्रवीण काळमेघ, संजय टेकाडे, सर्व संचालक आणि शेतकरी बांधवांच्या उपस्थितीत पार पडला.

## सैनिकांच्या शौर्याच्या सन्मानासाठी भाजपची तिरंगा रॅली

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अमरावती, दि. १८ :** जम्मू कश्मीर येथील पहलगाम येथे निर्दोष भारतीय लोकांचे धर्म विचारून त्यांची हत्या पाकिस्तानी दहशतवाद्यांकडून करण्यात सीमेवर देशाचे सैनिक आपल्या सुरक्षेच्यासाठी अहोरात्र लढत लढले, त्यांचे प्रोत्साहन वाढवण्यासाठी व त्यांच्या या अतुलनीय शौर्याचा सन्मान करण्यासाठी व त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी रविवार, दिनांक १८ मे रोजी अमरावती शहरात भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले भारत मातेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली यावेळी अमरावती लोकसभेच्या माजी खासदार सौ नवनीत राणा यांनी आपला धडाकेबाज शैलीतून देश सेवेसाठी कार्यरत असणाऱ्या आणि पाकिस्तान मध्ये घुसून दहशतवादी अड्डे उध्वस्त करणाऱ्या सैनिकांना धन्यवाद दिला, देशसेवेसाठी आपल्या देशातील सैन्यदलाचे सर्व सैनिक आहोत रात्र डोळ्यांमध्ये तेल घालून आपली रक्षा करतात, त्यामुळे आज आपला देश जशास तसे उत्तर देतो असे वक्तव्य यावेळी प्रामुख्याने माजी खासदार नवनीत राणा, भाजपा ज्येष्ठ नेते प्रा.रवींद्र खांडेकर, किरण पातुरकर, माजी महापौर संजय नरवणे,अमरावती मनपा माजी पक्षनेता सुनील काळे,स्थायी समिती सभापती सचिन रासने, सौ राधा कुरील, युवा मोर्चा प्रदेश महामंत्री बादल कुळकर्णी, किसान मोर्चा प्रदेश महामंत्री ललित समदूरकर, युवा मोर्चा शहर अध्यक्ष कौशिक अग्रवाल, महिला मोर्चा अध्यक्ष गंगा ताई खारकर,माजी उपमहापौर कुसुम साहू, स्थायी समिती माजी सभापती विवेक कलोती, माजी नगरसेवक बलदेव बजाज, श्रीचंद तेजवानी, नूतन भुजाडे, पद्मजा कौंडण्य, अजय सारसकर, वंदना मडगे, चंदू बोमरे,राजेश साहू, माधुरी ठाकरे, नीता राऊत, लवीना हर्ष, स्वाती कुलकर्णी, आशिष अतकरे, सुनंदा खरड, वंदनाताई हरणे, इंदुताई सावरकर, गंगाताई अंभोरे,चेतन पवार, सतीश करेसीया, गजाननराव देशमुख, विनोद गुहे,प्रणित सोनी,मंगेश खोंडे, सुरेंद्र बुरंगे, भाजपा मंडळ अध्यक्ष मनीष चौबे, प्रफुल बोके, कावरे, छोटू वानखडे, सचिन नाईक, शैलेंद्र मिश्रा, कुणाल टिकले, विशाल डहाके, श्रीकांत फणसे, आकाश पाटील,अमोल थोरात, विकी शर्मा,पंचफुला चव्हाण, राजू कुरील,विवेक चुटके, राजू मेटे, श्रीकांत धानोरकर, किशोर जाधव, प्रदीप सोळंके, राहुल वागरे, श्याम उपाध्ये, जगदीश कांबे, निलेश काजे, सुधीर वाघ, तुषार चौधरी, श्याम साहू, सविता भागवत, शितल वाघमारे, तृप्ती वाट, सतनाम हुडा, किरण गुप्ता, रोशनी वाकडे, कार्तिक समदेकर, अखिलेश खेडेकर,अलका सरदार, धनराज चक्रे, सुधीर बोपुलकर, विशाल तराळ, मिलिंद बांबल, विशाल कुलकर्णी, शेखर कुलकर्णी,तुषार वानखडे, मुकेश वासे वाय, अमृत यादव, तुषार अंभोरे, अंकेश गुजर, मनीष देशपांडे, दिनकर वैद्य, सुरज मिश्रा, सुधीर थोरात, किरण भागवत, ज्योती सयरीसे, सुमती ढोके, हरीश चरपे, अवि काळे, अर्चना तालन, पराग चीमोटे, भूषण पाटणे, तसेच या रॅलीत अमरावतीतील सर्व राष्ट्रप्रेमी नागरिक, युवक, महिला, विद्यार्थी, सामाजिक संस्था, औद्योगिक संघटना, तसेच विविध क्षेत्रातील संख्येने सहभागी झाले.

अंजनगाव बारी परिसर विविध वृत्त



साहेबराव राऊत

## अंजनगाव बारी प्राथमिक आरोग्य केंद्राचा भोंगळ कारभार; रुग्ण कल्याण समिती झोपेत







**अंजनगाव बारी, दि. १८ :** येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे आरोग्य केंद्रातील कारभार पुर्णतः बिघडला असुन आरोग्य केंद्राचे वेळापत्रकही बदलले आहे. नियमानुसार आरोग्य केंद्राची वेळ ही सकाळी ८:३० असुन येथील कर्मचारी ९:३० तर वैद्यकीयदृष्ट्या अधिकारी १० च्या. नंतर हजर होतात. येथील रुग्णना तासनतास बसुन त्रास सहन करावा लागतो. याठिकाणी पुरेसा कर्मचारी वर्ग असुन दोन वैद्यकीय अधिकारी आहे. येथिल ग्रामप्रशासनाच्या रुग्ण कल्याण समितीचे याकडे पूर्णतः दुर्लक्ष आहे. याबाबबत संबंधित प्रशासनाकडे तक्रार केली असता, खाजगी दवाखान्यात जा असा सल्ला मिळतो. या आरोग्य केंद्राच्या अंतर्गत २१ गावे येत असुन याठिकाणच्या वैद्यकीय कारभारात मोलाची दक्षता रहायला पाहिजे होती. सकाठी ८ वाजता पासून याठिकाणी रुग्णास उपचाराकरिता हजर राहत असुन मात्र कर्मचारी याची दखल घेत नाही तर वैद्यकीय अधिकाऱ्याकडून रुग्णाना उलट उत्तरे ऐकावी लागते. त्यामुळें याप्रकाराला नागरिक त्रासले असुन शासनाने याची दखल घेणे महत्वाचे ठरते.

“ मी आरोग्य केंद्रामध्ये गेलो असता याठिकाणी वैद्यकीयदृष्ट्या अधिकारी हजर नव्हते. सकाळचे ९ वाजून ३० मिनिटे झाली होती. माला लुजमोशनचा त्रास होत असल्या कारणाने डॉक्टरांना बोलविण्या करीता त्याच्या का , कॉर्टवर गोलो असतो. माझे डोके खाऊ नका व माझा दिवस खराब करु नका. असे उत्तम उत्तर ऐकायला मिळाले. यावरून येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांना सरकारी सेवेची गरज नाही हे लक्षात येते.

**गोपाल गुर्जर,** संबंधीत रुग्णास, अंजनगाव बारी

“ येथील आरोग्य केंद्रात विद्यार्थी जात असताना येथे एकही कर्मचारी आढळत नसल्याचे विद्यार्थीकडून सांगण्यात येते.शाळेकडून आरोग्य केंद्रात जाण्यास विद्यार्थांना आवश्यक तेवढाच वेळ दिल्या जातो.त्यातही कर्मचारी तथा वैद्यकीय अधिकारी वेळेवर हजर राहत नसल्याने विद्यार्थांची गैरसोय होते.

**चंद्रकांत खडसे,** शिपाई, जनता विद्यालय, अंजनगाव बारी

## धम्म प्रदीप बौद्ध विहारात भारतरत्न डॉ.बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण



**अंजनगाव बारी :** १५ मे रोजी अंजनगाव बारी बरी येथे बुद्ध जयंती साजरी करण्यात आली. बुद जयंती निमित्य (दि.१२) मे रोजी विश्वभुषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पूर्णाकृती पुतळयाचे अनावरण पुज्य भन्ते शिलरत्न व भन्ते निरीजानंद यांनी उद्घाटन करून अंजनगाव बारी येथील उपासक तसेच उपसिकेला धम्मदेशना (प्रवचन) दिले. त्याकरीता बुध्द अनुयायांनी आचरण करण्याची आवश्यकता आहे. बुद्ध धम्म हा भारतातील असताना देखील जगातील जास्तीत जास्त देश अनुकरण/पालन करतात त्यांचा विकास झालेला आहे. परंतू भारतामध्ये आचरण करणारे प्रचारक कमी असल्याने धम्माचा प्रसार कमी प्रमाणात आहे. याप्रसंगी अंजनगांव बारी येथिल सरपंच शोभा खडसे, दिपक गरुड, नामदेवराव खडसे दिपक खडसे, राजू गरुड यांचे हस्ते पंचशिल ध्वजारोहन करण्यात आले. ध्वजाला सलामी समता सैनिक दलाचे प्रमुख कार्यकारी सुनिल इंदुरकर व राहुल कारकोन व त्यांचा संघ यांनी सलामी दिली. तसेच राहुल कारकोन यांनी २२ प्रतिज्ञा व सविधान उद्देशिकेचे वाचन केले. त्याच प्रमाणे जावे सर यांनी मार्गदर्शन केले. सुत्रसंचालन इंजि. सुरज गरुड यांनी केले तर आभार प्रदर्शन उमेश खडसे यांनी केले. त्यानंतर दुसरे सत्र बुद्ध , कबीर, फुले, शाहु, आंबेडकर यांचे विचारावर मार्गदर्शन प्रमुख वक्ते इंजिनिअर तुषार उमाळे (वर्धा) यांनी प्रखर मार्गदर्शन केले. मनुवादी व्यवस्था हाणून पाडण्याचे कार्य महापुरुषांनी केले. बुध्द, फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जागतिक किर्तीचे महापुरुष होते. पंतप्रधान हे परदेशांत आवर्जून सांगतात आम्ही भारतवासी हे सर्व बुध्द भुमीतीक आहोत. परंतु भारतात मनुवादी व्यवस्थेचे पालन करतात. या कार्यक्रमाचे अध्यात राहुल कांबळे, प्रमुख उपस्थीती प्रकाश गरुड, दिपक भार गरुड (निवृत्त बिडीओ), नामदेवराव खडसे (निवृत्त अधिकारी) इंजि. दिपक खडसे, सुदामजी खडसे, बंडू खडसे ,
विनायक सवई, कैलास सवाई, योगिराज भगत, धनराज भगत, युवराज खडसे, विजय गरुड, शोकराव गरुड, सिद्धार्थ गरुड ,अनिल खडसे मनोहर खडसे, लक्ष्मण खडसे, बबलु खडसे, नितीन गरुड, सारंधर खडसे, रोशन कारकोन, प्रदिप कारकोन , दादासाहेब लोहकरे, श्रीपाल लोहकरे, धिरज ढोकणे, निलेश खडसे, राहुल खडसे, धम्मपाल खडसे, शंकरराव गरूड, रविराज भगत , पृथ्वीराज अटवर्धन तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुमेधा खडसे, आभार उमेश खडसे संपूर्ण कार्यक्रमाला ॲड विलास गावंडे, राजू गरुड, राजू लोहकरे, राहुल कारकोण, नवयुवक सिद्धार्भ मंडळाचे सर्व कार्यकर्ते, सुजाता महिला मंडळ तसेच उमेश डकरे, जगदिश अंबडकार, अरविंद निबर्ते, वसंतराव सोनार, विजय इंगोले, राजेंद्र भिवगडे, अरविंद टिंगणे, शंकर ठाकुर, अतुल कदम , संदिप कदम, सुनिल इंदुरकर, सैय्यद दिक्षाभुमी नागपुर, कार्यकारी प्रमुख चादवे सर, जावेद सर, लताबाई पाटील समता सैनिक दल , प्रकाश गरुड, भाग्यश्री जवंजाळ, सचिन गरुड, सूरज शेवतकर, मेघराज भगत, शरद इंगोले आदी व बहुसंख्येने गावातील नागरिक उपस्थित होते.

## घटना-घडामोडी







### वसंतराव नाईक कलगाव येथील उर्दू हायस्कूलचा निकाल उत्कृष्ट

**दिग्रस :** दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला. त्यात कलगाव येथील वसंतराव नाईक उर्दू हायस्कूल येथील पहिल्या पाच क्रमांकावर मुलीच राहिल्या आहेत. शाळेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. डी.व्ही.एस.पी.एम.विद्यालय कलगावमध्येही प्रथम तिने क्रमांकावर मुलीच राहिल्या आहेत. शाळेचा निकाल ८२.५०टक्के लागला आहे. यावर्षी ५१विद्यार्थ्यानी सहभाग घेतला होता. वसंतराव नाईक उर्दू हायस्कूलमधील मधील प्रथम क्रमांक खनसा मरीयम एजासोद्दीन शेख हिला ९०टक्के, दुसऱ्या क्रमांकावर इफरा माहिन जावेद इक्बाल हिला ८५टक्के, तर तिसऱ्या क्रमांकावर तायबा उरूज मो. शराफत ८२टक्के, तर चौथ्या क्रमांकावर अनशीरा सना मो.तोफीक ८१टक्के व महेक अफशा आरीफोद्दीन ७९टक्के गुण मिळाले आहे. उर्दु शाळेच्या पहिल्या पाच क्रमांकावर मुलींनी बाजी मारली आहे. यामुळेसगळीकडे आनंद व्यक्त केला जात आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय मुख्याध्यापक सय्यद हबीब व शिक्षकासह आईवडिलांना दिले आहे. तर डी. व्ही. एस. पी. एम. विद्यालयामध्ये प्रथम क्रमांक नंदिनी नीलेश बागेश्वर ८३.८०टक्के व द्वितीय क्रमांक साधना प्रदीप मनवर ८२.२०टक्के, तर तिसऱ्या क्रमांकावर राजनंदिनी भाऊराव चव्हाण ८०.६०टक्के मिळाले आहे.







### दहावीतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे कौतुक

**घाटंजी :** येथील शिक्षण प्रसारक मंडळाद्वारे संचालित उच्च माध्यमिक विद्यालयाने नुकत्याच जाहीर झालेल्या दहावीच्या (मार्च २०२५) परीक्षेत ९२.७३ टक्के निकालासह आपली उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयातून परीक्षेला बसलेल्या १७९ विद्यार्थ्यांपैकी १६६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातून अंकित संजय जाधव याने सर्वाधिक ९६.६० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. धनुष लक्ष्मण कोंगलवार याने ९३.६० टक्क्यांसहद्वितीय, तर किंजल यशवंत मेहता हिने ९२ टक्के गुणांसहतृतीय स्थान मिळविले. मेहेर विशाल भोयर (९१.४०टक्के) व अक्सा मुस्तफा शेख (९१.२०टक्के) यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले. एकूण ६१ विद्यार्थी विशेष प्रावीण्यासह, तर ४३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. या यशाबद्दल शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अल्ताफ जिलानी, सचिव ॲड. अनिरुद्ध लोणकर, शाळेचे मुख्याध्यापक एफ. आय. पठाण, पर्यवेक्षक मनोज बुरांडे व शिक्षकवृंदांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### श्री समर्थ विद्यालयाचा निकाल उत्कृष्ट

**घाटंजी :** नुकताच दहावीचा निकाल जाहीर झालेला आहे. त्यामध्ये श्री समर्थ विद्यालयाने आपली उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. शाळेतून प्रथम विभा अशोक धनाडे ९५टक्के, द्वितीय श्लोक संजय अग्रहरी ९४.४०टक्के, तर तिसऱ्या स्थानावर तीन विद्यार्थिनी आहेत. त्यात वैभवी अविनाश गोंदे (९३.६०टक्के), अनुष्का रूपेश बिलोनी (९३.६०टक्के) व श्रुती प्रमोद तुपे (९३.६०टक्के) आदींचा समावेश आहे. वर्ग दहावीच्या परीक्षेमध्ये एकूण १७५ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १७४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शाळेचा निकाल ९९.४२टक्के लागलेला आहे. यामध्ये ९०टक्क्यांच्यावर ९ विद्यार्थी, ९० ते ८० दरम्यान २७ विद्यार्थी, ८० ते ७५ या दरम्यान १८ विद्यार्थी व ७५ ते ६० च्या दरम्यान ६० विद्यार्थ्यांनी गुण मिळवीत प्रावीण्य प्राप्त केले. या यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष मधुसूदन चोपडे, उपाध्यक्ष निळकंठराव डंभारे, सचिव नरेश वैद्य व तसेच मुख्याध्यापक देवदत्त जकाते, उपमुख्याध्यापक अमोल वैद्य, पर्यवेक्षक अरविंद मडावी, ज्येष्ठ शिक्षक राजेश मदने यांनी कौतुक केले आहे.

### 'रघुवंशम्' लेखमालिकेची 'लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये नोंद

**वणी :** लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी येथील संस्कृत विभागप्रमुख तथा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या संस्कृत अभ्यासक्रम मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष विद्यावाचस्पती प्रा. स्वानंद गजानन पुंड यांच्या 'रघुवंशम्' या महाकाव्यावरील लेखमालिकेने 'लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये स्थान मिळवले आहे. १७ डिसेंबर २०२३ पासून सुरू असलेल्या या लेखमालिकेचा ५०० वा सलग भाग १७ मे २०२५ रोजी प्रसारित झाल्याबद्दल हा विक्रम नोंदवला गेला. या विक्रमी लेखमालिकेतील आजवर प्रकाशित सहा सर्गांवरील विवेचनांचे सहा ग्रंथ जळगाव येथील अविरत प्रकाशनाने प्रकाशित केले असून, एकूण १९ ग्रंथांतून १४०० हून अधिक श्लोकांचे निरूपण या योजनेत आहे. यापूर्वीही प्रा. पुंड यांच्या 'श्री गणेशोपासना', 'श्री शांकर स्तोत्र रसावली' आदी लेख/ग्रंथमालिका व 'गीर्वाण वाणी' या युट्यूब चॅनलची विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विक्रमांमध्ये नोंद झाली आहे. त्यांच्या या ताज्या कामगिरीबद्दल संस्कृत आणि संस्कृतीप्रेमींकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### एकास मारहाण

**पुसद :** जुन्या भांडणातुन वाद केल्याची घटना घडली. याप्रकरणी जुन्या भांडणाच्या वादातुन शिविगाळ करून काचेच्या बॉटलने डोक्यावर मारून जखमी केले तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी अतीष सुधाकर राठोड यांच्या तक्रारीवरून प्रविण सुदाम राठोड विरूध्द गुन्हा नोंद केला.

### दुचाकीला अपघात

**उमरखेड :** अपघातात इसम जखमी झाल्याची घटना घडली. याप्रकरणी दुचाकी क्र. एम.एच. २९ बि.एक्स. ८०६३ ने महागान रोडने नंदी हॉटेल समोरून जात असतांना वाहन क्र. एम.एच. ०४ डी. वाय. ५४३८ च्या चालकाने वाहन भरधाव वेगाने व निष्काजीपणे चालवुन दुचाकीला धडक दिल्याने फिर्यादी गंभिर जखमी झाले. याप्रकरणी सुनिल जनार्धन कऱ्हाळे यांच्या तक्रारीवरून अभिषेक विभीसन राठोड विरूध्द गुन्हा नोंद केला.

# पीककर्ज वेळेत वाटप करा

## वंचितच्या पाठपुराव्याला यश; लीड बँकेकडून सर्व बँकांना स्पष्ट आदेश

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १८:** यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी वेळेवर आणि योग्य प्रकारे पीककर्ज वाटप करण्यात यावे, असे आदेश लीड बँकेने जिल्ह्यातील सर्व बँकांना दिले आहेत. वंचित बहुजन आघाडीने ही मागणी रेटून धरली असून त्यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.

वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष डॉ. नीरज वाघमारे यांनी सेंट्रल बँक ऑफ इंडिया (लीड बँक, यवतमाळ) यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली होती. या पत्रामध्ये त्यांनी पीककर्ज वाटप प्रक्रियेत होणाऱ्या विलंबामुळे शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी मांडून तत्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली होती. या मागणीची तत्काळ दखल घेत सेंट्रल बँक ऑफ इंडिया (लीड बँक) यवतमाळ यांनी १५ मे २०२५ रोजी जिल्ह्यातील सर्व सहभागी बँकांसाठी एक महत्त्वाचे परिपत्रक जारी केले आहे. त्यात २०२५ च्या खरीप हंगामासाठी पीककर्ज वाटपाचे निर्धारित उद्दिष्ट वेळेत पूर्ण करणे सर्व बँकांना बंधनकारक असेल.

पीककर्जासाठी अर्ज करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना बँकांनी योग्य वेळेत आर्थिक मदत देण्यासाठी तत्पर रहावे. शेतकऱ्यांच्या हितासाठी बँकांनी कोणताही विलंब न करता यावर तातडीने कार्यवाही करावी. या आदेशाची प्रत जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा उपनिबंधक कार्यालय आणि डॉ. नीरज वाघमारे यांनाही पाठवण्यात आली आहे, यावरून या प्रकरणाला जिल्हा प्रशासनाने गांभीर्याने घेतल्याचे दिसून येते. वंचित बहुजन आघाडीने स्पष्ट केले की, ते नेहमी शेतकऱ्यांच्या न्याय हक्कांसाठी लढत राहतील आणि जर बँकांनी या आदेशांची अंमलबजावणी केली नाही तर तीव्र आंदोलन करण्यात येईल.



### 'मुक्काम पोस्ट' आंदोलनाचा इशारा

वंचित बहुजन आघाडीने गुरुवार दि. १५ मे रोजी शेतकऱ्यांना खरीप हंगामात वेळेवर कर्ज वाटप न केल्यास 'मुक्काम पोस्ट' आंदोलन करण्याचा इशारा अग्रणी बँक व्यवस्थापकांना दिला होता. त्यात त्यांनी कर्जवाटपातील उदासीनतेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच जिल्हाध्यक्ष डॉ. नीरज वाघमारे यांच्या नेतृत्वात आंदोलनाचाही इशारा दिला होता.

> 'खरीप हंगाम तोंडावर असताना पीककर्ज वाटपास विलंब होत आहे. जिल्ह्यातील हजारो शेतकरी अजूनही पीककर्जासाठी बँकांच्या फेऱ्या मारत आहेत. हा शेतकऱ्यांच्या भविष्याशी खेळ आहे. आमच्या पाठपुराव्याला यश मिळणे हा शेतकऱ्यांच्या लढ्याचा विजय आहे.
>
> -डॉ. नीरज वाघमारे, जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी, यवतमाळ.

# वनहक्क दावेधारकांना पट्ट्यांचे वाटप



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १८ :** वनहक्क कायदा २००६ च्या अंमलबजावणीअंतर्गत जिल्हास्तरीय वनहक्क समितीने मंजुरी दिलेल्या केळापूर उपविभागामधील केळापूर, घाटंजी व झरी जामणी या तालुक्यातील १४वैयक्तिक वनहक्क दावे धारकांना आदिवासी विकासमंत्री प्राचार्य डॉ. अशोक उईके यांच्याहस्ते वनहक्क पट्टे वाटप करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे आयोजित या वितरण कार्यक्रमप्रसंगी आमदार राजू तोडसाम, आमदार किसन वानखेडे, जिल्हाधिकारी विकास मीना, सहाय्यक जिल्हाधिकारी तथा पांढरकवडा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी अमित रंजन, उपवनसंरक्षक धनंजय वायभासे, पुसदचे प्रकल्प अधिकारी अमोल मेतकर, उपविभागीय अधिकारी गोपाळ देशपांडे उपस्थित होते. यावेळी केळापूर, घाटंजी, झरी जामणी तालुक्यातील लाभार्थ्यांना डॉ. अशोक उईके यांच्याहस्ते पट्टे वाटप करण्यात आले. त्यात कमलाकर कनाके, धर्मा पेंदोर, नागोराव आडे, महादेव पेंदोर, नागोराव चिकराम, जनाबाई कुळसंगे, पुरुषोत्तम तोडसाम, ज्ञानेश्वर सिडाम, समदुराबाई कनाके, गजानन मेश्राम, माधव मेश्राम, धर्मा सोयाम, मारोती मरस्कोल्हे, लखमा आशाम या लाभार्थ्यांना वनहक्क पट्टे वितरण करण्यात आले.

# शेतजमिनीच्या वादातून महिला शेतकऱ्यांची पिळवणूक

## पोलिस अधीक्षकांकडे न्यायाची मागणी; ट्रॅक्टरने पिके केली नष्ट

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**बाभूळगाव, दि. १८:** शेतजमिनीची वहिती आपल्याकडेच राहावी, या अट्टहासातून एका व्यक्तीने दोन शेतकरी भगिनींची शेतजमीन खराब करून त्यांना त्रास देण्याचा सपाटा लावल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. स्थानिक पोलिसांकडून प्रतिसाद न मिळाल्याने पीडित महिलांनी ५ मे रोजी यवतमाळ जिल्हा पोलिस अधीक्षकांकडे धाव घेत न्यायाची मागणी केली आहे.

वाटखेड खुर्द (ता. बाभूळगाव) शिवारातील गट क्रमांक ५३ व ५४ येथील शेतजमीन हर्षदा संजय तायवाडे व ज्योती तानाजी थोरात या भगिनींच्या मालकीची आहे. त्यांनी ही जमीन यवतमाळ येथील सीमा सुरेश देशभ्रतार यांना यावर्षी वहितीसाठी दिली. मात्र, पूर्वी ही शेती कसणारा नांदेसावंगी येथील भीमराव सदाशिव पचकटे नामक व्यक्ती यामुळे संतप्त झाला. त्याने स्वतःचा ट्रॅक्टर शेतात फिरवून पिके नष्ट केली, तसेच सीमा देशभ्रतार व त्यांच्या कुटुंबीयांना धमकावून शेती न करण्यासाठी दबाव आणण्यास सुरुवात केली. पचकटे हा वारंवार वाद उकरून काढून या भगिनींना मानसिक व आर्थिक नुकसान पोहेचवत असल्याचा आरोप आहे. या त्रासाला कंटाळून दोन्ही भगिनींनी बाभूळगाव पोलिस ठाण्यात तक्रारी दिल्या आहेत. मात्र, पोलिसांच्या निष्क्रियतेमुळे त्यांना न्याय मिळाला नाही. उलट, २८ एप्रिल रोजी रात्री आठ वाजेपर्यंत पोलिस ठाण्यात बसवून ठेवल्यानंतर रिपोर्ट घेतल्याचाही त्यांचा आरोप आहे. भीमराव पचकटे याच्या दबावामुळेच स्थानिक पोलिस कारवाई करत नसल्याची खात्री झाल्याने त्यांनी थेट पोलिस अधीक्षकांना तक्रार दिली. यातील एक महिला शेतकरी विधवा असून, दुसरीचे पती दिव्यांग आहेत. त्या बाहेरगावी राहत असल्याने पचकटे त्यांच्या शेतीचे वारंवार नुकसान करत आहेत. पोलिस अधीक्षकांनी यात लक्ष घालून बाभूळगाव पोलिसांना समज देत न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# डुमणी-कुऱ्हा रस्ता १५ दिवसांत पूर्ण करा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**आर्णी, दि.१८:** आर्णी-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गापासून सावळी, सदोबा, डुमणी, कुऱ्हा, अंतरगाव, केळझरा या गावांना जोडणाऱ्या रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असून, तो १५ दिवसांत दुरुस्त न केल्यास प्रहार जनशक्ती पक्षातर्फे तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा तालुकाप्रमुख रवी जाधव यांनी दिला आहे. यासंदर्भात त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (विशेष प्रकल्प) कार्यकारी अभियंत्यांना निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले की, रस्त्यावर मोठमोठे खड्डे आहेत. गिट्टी उखडल्याने प्रवाशांना जीवघेणी कसरत करावी लागत आहे. अनेक अपघात झाले असून, मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. डुमणी-कुऱ्हा ते सावळी रस्त्याचे काम झाले असले, तरी आर्णी राष्ट्रीय महामार्गापासून डुमणी-कुऱ्हापर्यंतचा मंजूर रस्ता अपूर्ण का, याची चौकशी करून संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी व रस्त्याचे काम तातडीने सुरू करावे, अन्यथा परिसरातील गावकऱ्यांना सोबत घेऊन आंदोलन केले जाईल, असे जाधव यांनी म्हटले आहे.

### आर्णीचे युनूस शेख जिल्हाध्यक्षपदी

**आर्णी, दि. १८:** राजकारण व समाजकारणात नेहमी अग्रेसर असलेले आर्णी शहरातील व्यक्तिमत्त्व युनूस शेख यांची मुस्लिम वेल्फेअर असोसिएशनच्या यवतमाळ जिल्हाध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सलीम सारंग यांनी नवी मुंबई येथे ही नियुक्ती केली.



या निवडीबद्दल बोलताना युनूस शेख यांनी सामाजिक बांधिलकी जपत गोरगरीब लोकांच्या समस्यांना वाचा फोडण्याचे आणि मुस्लिम समाजाच्या उन्नतीसाठी समर्पितपणे काम करण्याचे मनोगत व्यक्त केले. त्यांनी आपल्या निवडीचे श्रेय राष्ट्रीय अध्यक्ष सलीम सारंग यांना दिले.

# जिजामाता कन्या विद्यालयाचे नेत्रदीपक यश

## जागृती राठोड हिला ९१ टक्के, गौरी मांडूळकरला ८९टक्के

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**नेर (परसोपंत), दि.१८ :** दी एनलायटेन युथ एज्युकेशन सोसायटी नेर द्वारा संचालित जिजामाता कन्या विद्यालय नेर च्या विद्यार्थिनींनी माध्यमिक शालान्त परीक्षा २०२५ मध्ये नेत्रदीपक कामगिरी करून विद्यालयाचा सन्मान वाढविला. जिजामाता विद्यालयाची विद्यार्थिनी जागृती किसन राठोड हिने ९१ टक्के गुण संपादन करून विद्यालयातून प्रथम क्रमांक प्राप्त केला.

सोबतच गौरी ज्ञानेश्वर मांडूळकर ८९टक्के, रिद्धी प्रवीण काळे ८८टक्के, दीक्षा सिद्धार्थ जाधव ८८टक्के, सानिका माधव मिसळे टक्के%, धनश्री नंदकिशोर तिखे टक्के%, सायली रुपेश कोळकर ८३.४०टक्के, स्वाती सुरेश राऊत ८२.४०टक्के, वेदांती नीलेश नगराळे ८२.४०टक्के, अमोली विनोद आडे ८२टक्के, अश्विनी प्रमोद पाटेकर ८१.४०टक्के, अमृता विनायक चव्हाण ८१.२०टक्के, अनुष्का शामसुंदर घावडे ८१टक्के, शर्वरी सुकेश गावंडे ८१टक्के, भाविका रामेश्वर पवार ८१टक्के, शिवानी रवींद्र भांडाबुचे ८०.२०टक्के, प्रतीक्षा रवी पवार ८०.२०टक्के गुण संपादन करून विद्यालयाचा नावलौकिक वाढवला. विद्यालयातील एकूण २१ विद्यार्थिनी प्राविण्यश्रेणीत उत्तीर्ण झालेले आहेत. विद्यालयाचा निकाल ९६टक्के लागलेला आहे. विद्यालयामध्ये वर्ग दहावीच्या विद्यार्थिनींकरिता दरवर्षी नियमित तासिकांसोबतच अतिरिक्त तासिका, तज्ज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन, पेपरचा सराव, समुपदेशन याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. ज्यामुळे विद्यार्थिनी केवळ परीक्षेत परीक्षेत प्रावीण्यच प्राप्त करत नाहीत तर नवीन कौशल्य सुद्धा आत्मसात करतात. दरवर्षी विद्यालयातील प्राविण्यप्राप्त विद्यार्थिनींना संस्थेच्या व शाळेच्या वतीने पारितोषिक देऊन सन्मानित केल्या जाते. या सर्व विद्यार्थिनींचे संस्थेचे अध्यक्ष भय्यासाहेब जगताप, उपाध्यक्ष रामभाऊ धोटे, सचिव किरण काळे, व्यवस्थापक पंजाबराव खोडके, कोषाध्यक्ष सईद बेग मिर्झा, सदस्य प्रशांत काळे, सदस्य नवेद खान, मुख्याध्यापिका दीपा फाटे, शिक्षक वैभव जगताप शेखर जाधव, अमजद बेग मिर्झा, लता सिरसाट, वर्षा कोरडे, सोनल दांडगे, कल्पना उके, निकिता खोब्रागडे, कुणीका परमार, पूजा ठाकरे, शिक्षकेतर कर्मचारी आशीष धोटे, सुभाष बगमारे, दीपा महिंद्रकर, सुनीता राऊत यांनी अभिनंदन केलेले आहे.

# जयप्रकाश डोंगरे यांना 'समाजरत्न पुरस्कार' प्रदान

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.१८:** आर्णी तालुक्यातील उमरी (पठार) येथील संत दोला महाराज वृद्धाश्रमाचे संचालक तथा कार्यवाहक जयप्रकाश शेषराव डोंगरे यांना त्यांच्या निःस्वार्थ समाजसेवेबद्दल 'समाजरत्न पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. यवतमाळ येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय सांस्कृतिक लोककला महोत्सवात राष्ट्रशक्ती फिल्म्सद्वारे हा सन्मान करण्यात आला.

प्रसिद्ध साहित्यिक बाबाराव मडावी यांच्या हस्ते, डॉ. अंजली गव्हार्ले, रवी भोंगाडे, प्रकाश डब्बावार, स्वाती रोंघे, चित्रपट दिग्दर्शक अतुल कुडवे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत जयप्रकाश डोंगरे यांना सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले.



वडिलांनी, वृद्धाश्रमाचे संस्थापक शेषराव डोंगरे यांनी सुरू केलेले ध्येय पूर्ण करण्यासाठी जयप्रकाश डोंगरे हे निराधार वृद्धांची अहोरात्र सेवा करत आहेत. वृद्धांची काळजी घेणे, त्यांच्यावर मलमपट्टी करणे इतकेच नव्हे, तर प्रसंगी मृतदेहांना खांदा देऊन अंत्यविधीही ते करतात. त्यांच्या या समर्पित सेवेमुळे व त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

# शिक्षकाचे प्रेरणादायी पाऊल, विद्यार्थ्यांचा सन्मान

## माजी विद्यार्थ्यांचे अभिनंदन; पाच वर्षांनंतरही गुरुजींनी जपली आठवण

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ फारूक अहमद



**दिग्रस, दि.१८:** शिक्षण हे केवळ ज्ञान देण्याचे माध्यम नसून, ते माणूस घडवण्याचा एक प्रवास असतो, याची प्रचिती दिग्रस तालुक्यातील एका उपक्रमशील शिक्षकाने दिली. जिल्हा परिषद परिषद उर्दू शाळा, कलगाव येथील प्राथमिक शिक्षक आमीन नवरंगाबादे यांनी हा आदर्श निर्माण केला आहे.

आमीन नवरंगाबादे यांनी पाच वर्षांपूर्वी ज्या विद्यार्थ्यांना इयत्ता पाचवीमध्ये शिकवले होते, ते विद्यार्थी यावर्षी दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले. या विद्यार्थ्यांच्या यशाचा कौतुक सोहळा साजरा करत आमीन नवरंगाबादे यांनी प्रत्येकाच्या घरी जाऊन, त्यांच्या आई-वडिलांसमवेत, अभिनंदन पत्र, पुष्पहार, पुष्पगुच्छ, भेटवस्तू आणि एक रोपटे देऊन त्यांचा गौरव केला. खंसा मरियम एजाजाजोद्दीन, इफ्रा माहीन मोहम्मद जावेद इक्बाल, अंशीरा सना मोहम्मद तौफिक, राबिया तबस्सूम मोहम्मद हाफीज, मसीरा माहीन निजामुद्दीन, रुहूल अमीन अब्दुल मोबीन या मुलांचा गौरव केला. यावेळी जिल्हा परिषद उर्दू शाळेचे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष इमरान कुरेशी, माजी अध्यक्ष नासीर अहेमद, मोहम्मद इजाजुद्दीन, अलीमुद्दीन शेख, अख्तर कुरेशी, मोहम्मद इरफान उर्फ बब्बू भाई, कारी निजामुद्दीन, मोहम्मद जावेद इक्बाल, फारुक अहेमद, मुख्याध्यापक सुरैयाबी मोहम्मद फारूक, अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष मोहम्मद परसुवाले, डॉ. कलाम फोरमचे आमीन चौहान, फारूक चव्हाण, असिफोद्दीन काजी गुणवंतांच्या घरपोच गौरवात सहभागी झाले होते. विद्यार्थिप्रिय शिक्षक म्हणून अमिन नवरंगाबादे यांचे हे पाऊल सर्वत्र कौतुकाचा विषय ठरले आहे. याप्रसंगी विद्यार्थीही भावुक झाले होते.

### विद्यार्थ्यांचे यश, हाच खरा शिक्षकधर्म!

'विद्यार्थ्यांचे यश हेच एका शिक्षकांसाठी खऱ्या अर्थाने सर्वांत मोठे यश आणि समाधान असते. मी पाच वर्षांपूर्वी ज्या लहान रोपट्यांना ज्ञानाचे पाणी घातले होते, ती आज दहावीच्या मोठ्या टप्प्यावर यशस्वी झालेली पाहून मनस्वी आनंद होत आहे. त्यांच्यातील गुणवत्ता आणि जिद्द पाहून ऊर भरून येतो. हे यश त्यांनी बालवयात घेतलेल्या शिक्षणाचा आणि संस्कारांचा पाया आहे,' अशी भावना शिक्षक अमिन नवरंगाबादे यांनी व्यक्त केली.

### बाजारातून महागडा मोबाईल लंपास

**राळेगाव, दि. १८ :** येथील आठवडी बाजारात भाजीपाला खरेदी करत असलेल्या एका व्यक्तीच्या शर्टच्या खिशातून ८५ हजार रुपये किमतीचा ॲपल कंपनीचा आयफोन अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना नुकतीच घडली. याप्रकरणी राळेगाव पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी अक्रमखान हैदरखान पठाण हे आठवडी बाजारात भाजीपाला घेत असताना, त्यांच्या शर्टच्या वरच्या खिशात ठेवलेला ॲपल कंपनीचा आयफोन मॉडेल १५ प्रो. मॅक्स (किंमत ८५,००० रुपये) कोणीतरी अज्ञात चोरट्याने हातचलाखीने चोरून नेला. अक्रमखान पठाण यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदवून चोरट्याचा शोध सुरू केला आहे. बाजारात होणाऱ्या अशा चोऱ्यांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

## थोडक्यात

### श्रद्धा राठी हिला एस.एस.सी परीक्षेत ९५.८० टक्के गुण



**लाखपुरी :** ता .१४ मुर्तिजापूर तालुक्यातील लाखपुरी येथील कन्हैयालाल राठी व सध्या स्थितीत मूर्तिजापूर येथील रहिवासी त्यांची मुलगी कु. श्रद्धा कन्हैयालाल राठी एस.एस. सी परिक्षेत -९५.८० गुण प्राप्त केले आहे. तिने या यशाचे श्रेय श्रीमती. सरला राम काकाणी एजुकेशन अकॅडमी मूर्तिजापुर च्या अध्यक्ष डॉ.सौ सरिता सिकची व मुख्यअध्यापिका सौ. वैशाली खडतडकर आणि सर्व शिक्षक वृंद व आई वडिलांना दिले आहे. श्रद्धा च्या यशामुळे सर्व स्तरावरून तिचे कौतुक होत आहे.

### अकोटात निघाली तिरंगा रॅली



**अकोट:** ऑपरेशन सिंदुरच्या यशस्वी कारवाई नंतरच्या जनजागरण मोहिमे अंतर्गत शनिवार दि.१७ मे रोजी आकोट शहरात मोटर सायकल तिरंगा रैली काढण्यात आली.या रॅलीमध्ये खासदार अनुप धोत्रे, आमदार प्रकाश भारसाकळे,तसेच आकोट शहर व तालुक्यातील नागरीक मोठ्या संख्येन सहभागी झाले होते.

### एकलव्य अकादमीच्यावतीने ह.भ.प. वासुदेव महाराज यांचा गौरव



**अकोट:** एकलव्य धनुर्विद्या अकादमीच्या वतीने आयोजित उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचा समारोप सोहळा नांदगाव खंडेश्वर येथे उत्साहात पार पडला. शिबिरात सहभागी झालेल्या विद्यार्थी आणि पालकांसह अनेकांच्या उपस्थितीत सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडाविषयक समन्वयातुन ह.भ.प. वासुदेव महल्ले पाटील यांचा सत्कार गौरव करण्यात आला. श्रीसंत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्थेचे अध्यक्ष आणि समाज प्रबोधनासाठी अखंड झटणारे हे सत्पुरुष धनुर्विद्येच्या मंचावर सन्मानित झाले. धनुर्विद्येच्या पारंपरिक शैलीत, विशिष्ट देखावा सादर करताना वासुदेव पाटील यांना धनुष्यबाणातून हारार्पण करण्यात आला . उपस्थितांनी या अनोख्या आणि श्रद्धास्पद क्षणाला भरभरून प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांनी सादर केलेली धनुर्विद्येची प्रात्यक्षिके, योगासने, व आत्मरक्षण कौशल्ये याने प्रेक्षकांची मने जिंकली.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. अनिल सावरकर,,डॉ. दिलीप काळे ,, वारकरी महामंडळ अमरावती महानगर अध्यक्ष बाळकृष्ण आमले यांची उपस्थिती लाभली.कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या खेळाडूंना ह.भ.प. वासुदेव पाटील महल्ले यांच्या हस्ते गौरवण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. वासुदेव महल्ले पाटील यांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. ही संस्था गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामीण भागात धार्मिक व समाजउपयोगी कार्ये मोठ्या निष्ठेने पार पाडत आहे. त्या त्यांच्या कार्याची दखल एकलव्य संस्थेने घेऊन गौरव करण्यात आला.कार्यक्रमाचे संयोजन अत्यंत शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी ठरले. अकादमीचे प्रशिक्षक, कार्यकर्ते व आयोजकांनी या सोहळ्याचे नियोजन यशस्वीपणे पार पाडले. धनुर्विद्येसारख्या प्राचीन भारतीय शौर्यपरंपरेला नव्या पिढीत पुनर्जीवित करण्याचे कार्य एकलव्य अकादमीने केले आहे.

### अकोल्यात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान



**अकोला:** शहरात आज दुपारी अचानक आलेल्या वादळं आणि पावसामुळे जठारपेठ चौका येथील व्यापाऱ्यांना कोणत्याही प्रकारची सुरक्षा घेण्याची संधी मिळाली नसल्याने कांदा, आलू आणि लसूण विकण्यासाठी आलेल्या शेतकऱ्याला अवकाळी पावसाचा फटका बसला आहे .निलेश भिलारे, हे ग्रामीण भागातील शेतकरी आहेत, जे आपल्या व्यवसायाच्या माध्यमातून आपल्या उत्पादनांची विक्री करतात. परंतु, आज शहरात अचानकपणे आलेल्या अवकाळी पावसामुळे त्यांचा संपूर्ण माल भिजला..रस्त्यावर पाणी साचल्यामुळे त्यांनी खाली ठेवलेला माल पूर्णपणे भिजला आहे आणि यामुळे त्यांना मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शेतमालाला बाजारात अपेक्षित भाव मिळत नसल्यामुळे त्यांना या संकटाला सामोरे जाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे.

# तेल्हाऱ्यात बेताल वाहतुकीला शिस्त कोण लावणार?

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**तेल्हारा, दि. १८ :** शहरातील अरुंद रस्ते, वाहन तळांचा अभाव, फळ विक्रेत्यांचे अतिक्रमण, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणारे बेशिस्त वाहनचालक, रिक्षा चालकांचे कुठेही असणारे थांबे,यामुळे शहरामध्ये वाहतुकीचा खेळखंडोबा झाला आहे. सातत्याने कुठे-ना-कुठे लहान-मोठे अपघात होतच आहेत.

शाळकरी मुले व पादचाऱ्यांना तर जीव मुठीत धरुन मार्गक्रमण करावे लागत आहे त्यामुळे या बेताल वाहतुकीला शिस्त लावणार कोण? असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे.

गेल्या काही वर्षात वाहनांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढली आहे. पण रस्त्यांची लांबी-रुंदी वाढलेली नाही. नगरपालिका प्रशासनाची कोणतीही मदत वाहतूक सुरळीत व्हावी यासाठी मिळत नाही. त्यामुळे वाहतुककोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर रुप घेत आहे. शहरात वाहतूक कोंडीची समस्या सध्या तेल्हारकरांना भेडसावत आहे.

काही वर्षापूर्वी मुख्य रस्त्यावर दुभाजक बसविले होते. त्या दुभाजकांची ऊँची आता कमी झाल्याने दुभाजक अपघताना निमंत्रित देत असल्याचे दिसून येत आहे. सणासुदीला बाजारपेठेत होणारी मोठी गर्दी लक्षात घेता नगरपालिका प्रशासनाकडून वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले जात नाहीत.

### शहराच्या मध्यभागी फळ विक्रेत्यांमुळे विद्यार्थ्यांची होते दमछाक

शहराच्या मध्यभागी असलेल्या सेठ बंसीधर विद्यालय, श्री शिवाजी विद्यालय, स्वामी विवेकानंद ज्ञानपीठ या ह्या तीनही शाळेचा सुटण्याचा व् भरन्याचा टाइम सारखाच असून या शाळेचा समोर शहरातील फळ विक्रेते आपले ठान मांडून बसल्याने विद्यार्थी शाळेत जातांना व येतांना तोबा गर्दी होत असून या फळ विक्रेत्यामुळे विद्यार्थ्यांचे लहान मोठे अपघात होने नित्याचेच झाले आहे. तसेच विद्यार्थ्यांना घरी जान्याकरीता दमछाक करावी लगते.

### बेशिस्त मोटरसायकल चालकांची स्पर्धा

शहरातील मोटर सायकल चालक सुसाट वेगाने वाहने चालवित असून त्यांच्या शहरात स्पर्धा सुरु आहेत. महाविद्यालय, शाला सुटन्याच्या वेळेवर कही हीरो आपली मोटर सायकल सुसाट वेगाने आपले वाहने चालवून हिरोगिरी करीत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांसह सामान्य नागरिकांचा जिव धोक्यात येवू शकतो, याला आळा घालण्यासाठी पोलिस प्रशासन व नगर पालिका प्रशासनाला कठोर पाउले उचलण्याची गरज निर्माण झाली आहे.

### मन:शांती निशुल्क योग शिबीर उद्यापासून

**अकोला:** स्थानिक नेहरू पार्क अकोला येथे मन:शांती निशुल्क योग शिबीराचे आयोजन पार्कचे संचालक बी एस देशमुख यांनी उद्या दि.२० मे पासून ३१ मे २५ दरम्यान सकाळी ५.३० ते ७.वा पर्यंत आयोजीत केले आहे. शिबीरात योगगुरू मनोहर इंगळे हे मन: शक्ती कशी वाढवावी व मन शांतीसाठी नाथांच्या योगावर मार्गदर्शन करून श्रीमद भागवत ग्रंथातील प्रत्येक अध्यायवर प्रवचन करून, साधकांकडून आसन, प्राणायाम , ध्यानधारणा व सूक्ष्म व्यायाम करून घेतील. तसेच योगनृत्यावर अनुराधा इंगळे सराव करून घेतील. महिलांची आसन व्यवस्था वेगळी राहील. मानसीक विकार,बुध्दीची स्थिरता, शुगर, रक्तदाब, गुडघेदुखी,कंबर दुखी, वातविकार, वाढलेले वजन, आम्लपीत्त आदीं त्रस्तांनी सदर शिबिराचा लाभ घ्यावा असे शिवतेज प्रतिष्ठानचे रामप्रकाश मिश्रा, जसवंतसिंग मल्ली, ॲड. वामन चौधरी, बाळासाहेब काळे, पुरुषोत्तम गुप्ता, अतूल पळसपगार,शिवतेज इंगळे, संजय मनतकार तसेच अनुराधा इंगळे, अरूणा धुमाळ, विनोद भसीन, सरला कागलीवाल,लता वाघेला यांनी केले आहे.

## मुख्यमंत्री कृती आराखड्यात अकोट नगरपरिषद जिल्हयातून प्रथम

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

### अमरावती विभागातून तिसरा क्रमांक

अकोट नगरपालिकेची सुसज्ज अशी तीन मजली भव्य इमारत असून या इमारतीमध्ये नेहमीच स्वच्छता राखण्यात येते. पालिकेत मुख्याधिकाऱ्यांनी जनतेसाठी शुध्द पाण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तीन मजली असलेल्या पालिकेच्या इमारतीमध्ये लवकरच नागरिकांच्या सुविधेसाठी लिफ्टची आणि प्रशस्त प्राकींगचीसुध्दा व्यवस्था करण्यात येणार आहे. आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी सुसज्ज अशी जिप्सी पालिकेला प्राप्त झाली असून दोन बुलेट वाहने उपलब्ध आहेत. येत्या काही दिवसातच अग्नीशमन दलाचे मोठे वाहने दाखल होणार असून नागरिकांना आणखी सुविधा उपलब्ध करून देणार असल्याची माहिती मुख्याधिकारी डॉ. नरेंद्र बेंबरे यांनी दिली.

**अकोट , दि. १८ :** महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील शासकीय, निमशासकीय कार्यालयांचा कारभार अधिक पारदर्शी होण्याच्या उद्देशाने १०० दिवसांच्या दिलेल्या कृती आराखडा उपक्रमात अकोट नगरपरिषदेने अकोला जिल्ह्यातून तालुकास्तरावर प्रथम तर अमरावती विभागातून तृतीय क्रमांक पटकावला आहे.

मुख्यमंत्री १०० दिवसांच्या कृती आराखड्यात कार्यालयाच्या वेबसाईट, ई ऑफीस प्रणाली, नागरिकांच्या तक्रारींचे निवारण, नाविण्यपूर्ण उपक्रम, कार्यालयांमध्ये नागरिकांसाठी सोयी सुविधा व स्वच्छता असे विविध उपक्रम ठेवण्यात आले होते.या उपक्रमात १० मुद्यांचा समावेश होता आणि १०० गुण ठेवण्यात आले होते.

यामध्ये अकोट नगरपालिकेने उत्तम गुण प्राप्त करीत अकोला जिल्ह्यातून तालुकास्तरावर प्रथम आणि अमरावती विभागातून तिसरा क्रमांक प्राप्त केला आहे.अकोट नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. नरेंद्र बेंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली पालिकेचे सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेवून हे यश प्राप्त केले आहे.

## अन्यायाविरुद्ध बजरंग दलाचे आमरण उपोषण सुरु



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**तेल्हारा, दि. १८ :** केंद्रात व राज्यात भाजपची सत्ता आहे व दोन्ही ठिकाणी गृह विभाग भाजप जवळ आहे त्याच गृह विभागाच्या पोलिसांकडून बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांवर सातत्याने अन्याय केला जात आहे. धाक दपटशाही करून खोटे गुन्हे दाखल करण्यात येत आहेत. याविरुद्ध बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे.त्यामुळे भाजप नेत्यांकडून बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांच्या सुरक्षेसाठी योग्य ती भूमिका घेतली जाणार आहे काय ? असा प्रश्न हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांकडून उपस्थित केल्या जात आहे.

तेल्हारा तालुक्यातिल ग्राम वाडी अदमपूर, माळेगाव, इसापूर, जाफरापूर, शेरी येथील गोमांस विक्री, पशुधन चोऱ्या संदर्भात विश्व हिंदू परिषद, बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी या अगोदर दिलेल्या अनेक निवेदनावरून कार्यकर्त्यांवर सक्तीने गुन्हे दाखल केल्याच्या निषेधार्थ तेल्हारा येथील अग्रेसन महाराज टॉवर चौकात १७ मे पासून विहिंप-बजरंग दलाचे ५ कार्यकर्ते आमरण उपोषणास बसली आहेत.उपोषणाला बसण्या अगोदर गुरुवारी दिनांक १५ मे२०२५ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. तालुक्यात खुली गोवंश विक्री व गोवंश चोऱ्या होत असून पोलीस प्रशासनाने आतापर्यंत कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यामुळे पशुधन चोऱ्या, गोवंश मास विक्रीचे प्रकार वाढले असल्याचा स्पष्ट आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. विहिंप-बजरंग दल कार्यकर्ते, गोरक्षक यांनी प्रशासनाला मदत करूनही सातत्याने कार्यकर्त्यांना मिळणारी अपमानास्पद वागणूक जसे की, विश्व हिंदू परिषद, बजरंग दलाने हिंदू धर्माचा ठेका घेतला आहे काय? असे बोल गोवंश पकडल्यावर गोरक्षकांना पोलिसांकडून विचारल्या जात आहेत. हेच पोलीस अधिकारी व कर्मचारी शासनाच्या गृह विभागाच्या अखत्यारीत काम करीत आहेत त्यामुळे शासनाच्या गृह विभागाने अशा अन्याय करणाऱ्या पोलिसांवर कारवाई करावी.अशी मागणी होत आहे त्यामुळे आता भाजपचे नेते बजरंग दलाच्या कार्यकर्त्यावर जो अन्याय होत आहे त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल केल्या गेले आहे ते मागे घेतल्या जातील काय? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.गोवंश चोरीचे तसेच गोवंश मास विक्री राजरोसपणे खुलामपणे चालू आहे. गोवंश हत्या बंदी असतानाही कत्तलखाने कसे काय सुरू आहेत? याबाबत शासनाने पोलीस विभागाला विचारणे आवश्यक आहे. कारण गोवंश हत्या बंदीचे उल्लंघन करून पोलीस विभाग कत्तलखान्यांवाल्यांना आश्रय देत असल्याचा आरोप उपोषणकर्त्यांकडून होत आहे.

### गुन्हे मागे न घेतल्यास हिंदुत्ववादी कार्यकर्ते आक्रमक पवित्रा घेतील

बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांच्या मागण्या रास्तआहेत त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल होत आहेत याबाबत शासनाने ताबडतोब गुन्हे मागे घेण्या बाबत निर्णय न केल्यास हिंदुत्ववादी कार्यकर्ते आक्रमक होतील मग ते शासन कोणाचेही असो त्याविरुद्ध आक्रमक पवित्रा हिंदुत्ववादी कार्यकर्ते घेतील

**ॲड. पवन शर्मा,** गोरक्षक

## वादळी वाऱ्यामुळे भिंत अंगावर पडल्याने बैल ठार

### शेतकऱ्याचे एक लक्ष १० हजार रुपयांचे आर्थिक नुकसान

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोट, दि. १८ :** तालुक्यातील मंचनपूर येथे १७ मे रोजी सायंकाळी ५ वाजता झालेल्या वादळी वाऱ्यामुळे गावातील विश्वास चौधरी यांच्या गायवाड्याची पक्की सिमेंटची भिंत गायवाड्यात बांधून ठेवलेल्या बैलाच्या अंगावर पडल्याने जखमी झाला होता. मध्यरात्री १२ वाजताच्या सुमारास बैल मृत्यूमुखी पडला असून जीवित हानी झाली आहे.

ह्या बैलाची अंदाजे किंमत ६० हजार रुपये, तसेच विटांची भिंत कोसळून तीन पत्रे उडून गेली यांची अंदाजित किंमत ५० हजार रुपये असे एकूण एक लक्ष दहा हजार रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. हीच स्थिती सावरा येथील पुंडलिक बुधाजी तायडे यांच्या घराची पडझड झाल्यामुळे त्यांचेसुद्धा २० हजार रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. वादळी वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई नुकसानग्रस्तांना तात्काळ मदत द्यावी अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांच्या वतीने केली आहे. या घटनांचा पंचनामा ग्रामविकास अधिकारी सविता पाटील यांनी केला आहे. यावेळी शंकर अघडते, बाळकृष्ण काळे, राजेंद्र उगले, एकनाथ चौधरी, निर्मला चौधरी, रवींद्र चौधरी आदि उपस्थित होते.

### हरवलेले मंगळसूत्र परत मिळाल्याने महिलेच्या चेहऱ्यावर हास्य

**अकोला:** शहरातील खाणीत राहणाऱ्या एका महिलेचे मंगळसूत्र हरवले होते. मात्र, सिटी कोतवाली पोलिसांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे काही तासांतच मंगळसूत्र परत मिळाल्याने महिला आणि तिच्या पतीच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य उमटले.महिलेला पैशाची तातडीची गरज भासल्याने तिने आपले मंगळसूत्र गहाण ठेवले होते. त्यानंतर पैसे जमवून तिने ते मंगळसूत्र परत सोडवले. गांधी रोडवरून घरी जात असताना तिच्या हातातून मंगळसूत्र हरवले. हे लक्षात येताच तिने त्वरित सिटी कोतवाली पोलिसांशी संपर्क साधला.प्रकरणाची गंभीरता ओळखून पोलिस निरीक्षक सुनील किंनगे यांनी लगेचच शोधमोहीम सुरू करण्याचे आदेश दिले. पोलिस कर्मचाऱ्यांनी सीसीटीव्ही फुटेज तपासले आणि संशयित परिसरात कसून शोध घेतला.

## सुभाष चांडक लायन्स इंटरनॅशनल बहुप्रांतीय सुपरस्टार सर्वोच्च ॲवार्डने सन्मानित

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला , दि. १८ :** जगातील सर्वात मोठी सामाजिक संस्था असल्याचा मान प्राप्त असलेली संस्था लायन्स इंटरनेशनल ज्यामध्ये २१२ देशाचा समावेश आहे. अंतर्गत डिस्ट्रिक्ट ३२३४ चे ८ वे बहुप्रांतीय कल्पवृक्ष अधिवेशन नाशिक येथे दिनांक १७ व १८ मे २०२५ रोजी पार पडले.या अधिवेशनात विदर्भ, मराठवाडा, खान्देश,पुणे, कोल्हापूर,सांगली, सातारा मधील ५८० क्लब व १६०७९ सदस्या मधून १३०० पदाधिकाऱ्या ची उपस्थिती लाभली. या अधिवेशनात उल्लेखनीय काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले.यामध्ये लायन्स क्लब अकोला मिडटाऊनचे संस्थापक अध्यक्ष व डिस्ट्रिक्ट ३२३४ एच २चे डिस्ट्रिक्ट चेअरमन लायन्स इंटरनॅशनल कन्वेंशन व मिट लायन्स सुभाष चांडक यांनी २९ वर्षात मोफत हार्ट सर्जरी कॅम्प आयोजित करून २१९६ रुग्णांना नवीन जीवन दिल्याबद्दल मल्टिपल कौन्सिल चेअरमन सुनील देसर्डा यांनी अत्यंत प्रतिष्ठेचा लायन्स इंटरनेशनल बहुप्रांतीय सुपर स्टार सर्वोच्च अवार्ड देऊन सन्मानित केले.तसेच २९ वर्षात ५० देशांमध्ये जाऊन डिस्ट्रिक्ट ३२३४ एच २ ची आगळी वेगळी ओळख निर्माण केल्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी सुभाष चांडक यांचे अभिनंदन केले.या कार्यक्रमात मल्टिपल कौन्सिल चेअरमन सुनील देसर्डा, उद्घाटक लायन्स इंटरनॅशनलचे ३ रे व्हाईस प्रेसिडेंट मनोज शाह,विशेष अतिथी जितेंद्रसिंग ठाकूर,माजी लायन्स इंटरनॅशनल डायरेक्टर डॉ नवल मालू, प्रेमचंद बाफना, लायन्स डिस्टिक ३२३४ एच २ चे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर गिरीश सिसोदिया, डिस्ट्रिक्ट गव्हर्नर इलेक्ट अश्विन कुमार बाजेरिया, डिस्ट्रिक्ट ३२३४ चे अवॉर्ड चेअरमन राजेश राऊत, एरिया लीडर विनोद वर्मा,एलसी आयएफ टी. व्ही.श्रवण कुमार यांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमात पुण्याचे माजी एमसीसी चेअरमन द्वारका जालान,अकोल्याचे माजी पीडिजी रमाकांत खेतान, झोन चेअरमन सत्यपाल बाशानी, लायन्स क्लब ऑफ अकोला मिडटाऊनचे माजी अध्यक्ष सुनील जेसवाणी,चेतन जैन, दिनेश अग्रवाल,राजेश डोंगरकर, दिव्यानी जैन,राजश्री अग्रवाल, छाया डोंगरकर, शोभा राठी,तारा माहेश्वरी यांची उपस्थिती लाभली.

या अगोदर सुद्धा सुभाष चांडक यांना अनेक वेळा महाराष्ट्र शासनाकडून राज्यपालांच्या हस्ते १० हजार रोख व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले,तसेच अनेक वेळा लायन्स इंटरनॅशनल, मल्टिपल, डिस्ट्रिक्ट,रिजन लाईफटाईम अचीवमेंट अवार्ड,३ वेळा माहेश्वरी समाज ट्रस्ट अकोला, इंडियन असोसिएशन ऑफ बॅंकॉक, थायलंड, इंडियन रेडक्रॉस सोसायटी अकोला, विश्व सिंधी सेवा संघ मुंबई, राष्ट्रीय केमिकल अँड फर्टिलायझर मुंबई, भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया अकोला, स्व वसंतराव नाईक प्रतिष्ठान पुसद,नारायण सेवा समिती उदयपूर यांनी सुद्धा सन्मानित केले आहे.

अजिंक्य भारत
# आपलं बुलडाणा
१
बुलडाणा, सोमवार १९ मे २०२५ www.ajinkyabharat.com

## थोडक्यात

### वीज कोसळून एक व्यक्ती तर दोन जनावरांचा मृत्यू

**सिंदखेड राजा :** विजेच्या गडगडाटासह झालेल्या जोरदार पाऊसात शेतकऱ्यांच्या पीकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. यातच सिंदखेड राजा येथील मौजे दत्तपूर शिवारात विजांसह अवकाळी पावसात शेतकरी नारायण पवार रा. दत्तापूर यांचे मालकीचे गट नंबर ५७मधे गोठ्यात एक बैल विज पडुन मृत्यू मुखी पडला आहे. तसेच मौजे राहुरी बुद्रुक येथे गोविंद पुंडलिक देशमुख यांची १ गाय वीज पडून मृत झाली आहे. तसेच तालुका लोणार येथील मौजे हिवरखेड येथील शंकर खंड (वय १७) हे शेतात काम करण्याकरिता गेले असताना सायंकाळी वीजांसह पाऊस सुरु झाला. त्यावेळीच त्यांच्यावर विज कोसळून त्यांचा मृत्यू झाला.

### युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**मोताळा :** डिडोळा शिवारातील गट क्रमांक ६८ मध्ये लिंबाच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन एका युवकाने आत्महत्या केल्याची घटना १७ मे रोजी सायंकाळी साडेपाच वाजता उघडकीस आली. मृत युवकाचे नाव प्रशांत बळीराम किरोचे (रा. डिडोळा) असे आहे. प्रशांत याने आत्महत्या केल्याची माहिती गावातील अभिजीत गाडे यांनी त्याच्या चुलत भावाला ज्ञानेश्वर किरोचे यांना दिली. त्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता प्रशांत याचा मृतदेह झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळून आला. या प्रकरणी बोराखेडी पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास नापोका अमोल खराडे आणि पोलीस कर्मचारी प्रमोद साळोक करीत आहेत.

### क्षुल्लक कारणावरून तरुणावर हल्ला

**मोताळा :** भाडगणी येथे १६ मे रोजी दुपारी दोनच्या सुमारास क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादात एकाला लोखंडी रॉडने डोक्यात वार करून जखमी करण्यात आले. याप्रकरणी दोन जणांविरुद्ध बोराखेडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सज्जाद खान इरफान खान (रा. जावई नगर, मलकापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, भाडगणी येथे मतीन पटेल व नाजीम मन्सूर यांच्यासोबत किरकोळ वाद झाला. वादाच्या दरम्यान आरोपींनी फिर्यादीला शिवी-गाळ केली व लोटपाट करत मतीन पटेलने त्यांच्या डोक्यात लोखंडी रॉडने वार करून जखमी केले. तसेच जीवे मारण्याची धमकीही दिली. याप्रकरणी तक्रारिवारून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १८०० –२२२५ |
| गहू | २३०० – २५०० |
| तुर | ६००० – ७१०० |
| हरभरा | ४१५० – ५६०० |
| सोयाबीन | ३५२५ – ४३५० |
| भुईमुग | ३९०० – ५४२५ |
| उडीद | ५२०० – ५२०० |
| मक्का | १७१० – १९५० |
| मूंग | ७२०० – ७६७५ |

### केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या विशेष प्रयत्नातून

# विद्यार्थ्यर्थ्यांना स्कुल बॅग व स्टडी टेबल वाटप

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा , दि.१८

**शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करतांना भौतिक सुविधा आणि गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांच्या आरोग्याची देखील काळजी घेणे तितकेच आवश्यक असून त्यादृष्टीने हिंदस्थान पेट्रोलियम व अवंत फाऊंडेशनने दिलेले स्टडी टेबल व स्कुलबॅग उपयुक्त ठरतील असा विश्वास केंद्रीय आयुष राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केला.**

ग्रामीण भागातील शाळकरी विद्यार्थ्यांनाही दर्जेदार शैक्षणिक साहित्य मिळावे या दृष्टिकोनातून केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या विशेष प्रयत्नांतून एच पी सी एल च्या सीएसआर. निधीतून अवंत फाऊंडेशनच्या समन्वयाने बुलढाणा जिल्हयातील १६६६७ विद्यार्थ्यांना मोफत स्कुल बॅग व स्टडी टेबल वाटप करण्यात येत आहे शैक्षणिक साहित्य वाटपाचा शुभारंभ नुकताच बुलढाणा येथील जिल्हा परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात संपन्न झाला. त्यावेळी ते प्रमुख



अतिथी म्हणून केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव बोलत होते. यावेळी बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी बाळासाहेब मोहन, शिक्षणाधिकारी (प्राथ) बी-आर. खरात, शिक्षणाधिकारी योजना वैशाली ठग प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच एचपीसीएलचे उपमहाप्रबंधक विशाल शर्मा आणि भारत सरकारच्या कोळसा व खाण मंत्रालयाचे प्रमुख तांत्रिक सल्लागार अवनीश त्रिपाठी यांची विशेष उपस्थिती लाभली. प्रातिनिधीक स्वरुपात पन्नास विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते स्कुल बॅग वाटप करून या कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी उपस्थित विद्यार्थी आणि पालकांच्या चेहऱ्यावर हास्य उमलले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अरविंद शिंगाडे यांनी तर आभारप्रदर्शन उपशिक्षणाधिकारी अनिल देवकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अवंत फाऊंडेशनचे आकाश विश्वकर्मा, उपशिक्षणाधिकारी उमेश जैन, इश्वर वाघ आदींनी परिश्रम घेतले.

**मिशन 'झेड' चे कौतुक** -जिल्हा परिषदेत शिकणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या संकल्पनेतून मिशन झेड उपक्रम सुरु करण्यात आला असून, त्याद्वारे गुणवंत विद्यार्थ्यांना नीट व जेईई परीक्षांच्या नामवंत क्लासमध्ये मोफत मार्गदर्शन प्राप्त होणार आहे. या उपक्रमात विशेष योगदानासाठी शिक्षणाधिकारी (प्राथ) बी. आर. खरात व शिक्षणाधिकारी (योजना) वैशाली ठग यांना प्रमाणपत्र देवून गौरवण्यात आले.

* आय आय टी कानपुर यांनी या स्कुल बॅग व स्टडी टेबलचे डिझाईन केले आहे.
* यामुळे विद्यार्थ्यांच्या पाठीच्या कण्याचा त्रास कमी होईल.
* विद्यार्थ्यांचे डोळे व रक्ताभिसरण यांचे आरोग्य चांगले राहील.
* विद्यार्थ्यांना जास्त वेळ वाचन आणि लेखनकाम करता येईल.
* डोक्यावरील ताण, मानदुखी, पाठदुखी इ. त्रास कमी होईल.

**युपीएससी तील यशाबद्दल मोहिनी खंदारे यांचा सत्कार**
बुलढाणा पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी कु.मोहिनी खंदारे यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत मिळवलेल्या यशाबद्दल त्यांचा मंत्रीमहोदयांच्या हस्ते शाल-पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

## अवकाळी पाऊस व वाऱ्याने सौर प्लेटचे नुकसान

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
किनगाव दि.१८

किनगांव राजा येथुन जवळ असलेले उमरद गांवातील शेतकरी सदाशिव विठोबा केकान यांच्या गट नंबर ४९१ व सौ.नंदा अशोक डोईफोडे यांच्या गट नंबर १५५ मध्ये असलेल्या विहिरीवर लावण्यात सौर प्लेटचे दि.१७ मे रोजी दुपारी झालेल्या अवकाळी पावसाने व वादळी वाऱ्याने नुकसान झाले आहे.

तालुक्यामध्ये दि.१७ मे रोजी अवकाळी पाऊस पडला आहे. अचानक आलेला वादळी वारा, अवकाळी पाऊसामुळे नुकसान होत असून, शेतात लावलेल्या सौर उर्जा पॅनललाही मोठा तडाखा बसत आहे.तालुक्यातील



किनगांव राजा,पांग्री उगले, विझोरा, शेळगांव राऊत,पिंपळगाव लेंडी,पळसखेड चक्का, सावखेड तेजन,हनवतखेड,महारखेड,उमरद, हिवरखेड पूर्णा,उगला,वाघजाई,आडगांव राजा यासह इतर गांवातील शेतकऱ्यांच्या शेतातील वादळी वारा, गारपीटी मुळे शेतातील विहिरीवर असलेल्या सौर प्लटेचे नुकसान झाले आहे.

## शिवसेना पदाधिकाऱ्यांनी केला ना.संजय शिरसाट यांचा सत्कार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
खामगाव दि.१८

खामगाव येथे सामूहिक बौद्धधर्मीय विवाह सोहळा आगमन प्रसंगी शासकीय विश्राम गृह खामगाव येथे शिवसेनेच्या वतीने ना.संजय सिरसाट यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र बघे व शिवसेनेच्या वतीने ना.संजय शिरसाट यांच्यासोबत अनेक विषयावर चर्चा करत करत निवेदन सादर केले.

दिलेल्या निवेदनामध्ये नमूद करण्यात आले की, एकाच गावाला वारंवार निधी मिळतो काही गाव असे आहेत की वारंवार प्रस्ताव सादर करून सुद्धा पाच वर्षांमध्ये एक रुपया



सुद्धा निधी मिळाला नाही व काही ठराविक गावांना वारंवार निधी मिळतो. त्या गावाचा निधी शिल्लक असून सुद्धा त्या गावाला निधी मिळत नाही म्हणून या गावांवर एका प्रकारे खूप मोठा अन्याय आहे. करिता याबाबीकडे आपण लक्ष देऊन संबंधित अधिकारी यांना सांगून उर्वरित राहिलेल्या गावांना निधी वितरित करावा अशाप्रकारे चर्चा करत निवेदन देण्यात आले. याप्रसंगी मंत्री महोदयांनी समाधानकारक उत्तर देत आपण याबाबीकडे गंभीरे पूर्वक लक्ष देऊन ज्या गावांना अध्याप पर्यंत निधी मिळाली अशा गावांना प्राधान्य देऊन त्या गावांना लवकर लवकर निधी उपलब्ध करून देऊ असा शब्द दिला.

तसेच कार्यकर्त्यांची जाण असणारे शिवसेनेचे मंत्री संजय शिरसाट यांनी किसान सेना तालुकाप्रमुख सुभाष पाटील वाकुळकर यांना वाढदिवसानिमित्त सत्कार करत शुभेच्छा सुद्धा दिल्या. यावेळी शिवसेना शिवसेना विधानसभा संपर्कप्रमुख सुरेश वावगे, तालुकाप्रमुख राजेंद्र बघे, महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख कावेरी वाघमारे, महिला आघाडी तालुकाप्रमुख जयश्री देशमुख, उपतालुका प्रमुख ज्योती बुजाडे, प्रकाश हिवराळे, गोपाल बिडकर, मंगेश काळे,महादेव टिकार, प्रविण पाटील, मयूर खंडारे, आकाश भाऊ माने,चेतन शेलकर, प्रविण पोरे, वैभव ठाकरे,गोपाल चव्हाण, गोपाल शेळके, मारुती जगताप, जीवन साळुंके, चेतन पाटील वाकुळकर,रुपेश तायडे,राजू गोळे आदींसह शिवसेना पदाधिकारी तथा कार्यकर्ते उपस्थित होते.

## वादळीवाऱ्यासह अवकाळी पाऊस; शेतातून पाणी वाहिल्याने बांध फुटले

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
साखरखेर्डा दि.१८

गेल्या तीन मे पासून सिंदखेडराजा तालुक्यात वादळीवाऱ्यासह अवकाळी पाऊस पडत असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. अनेक शेतकऱ्यांनी उन्हाळ्यात शेतात बांध टाकले असता या अवकाळी मुसळधार पावसाने बांध फुटले आहे.
आजही दुसरबीड, किनगाव राजा, जांभोरा, जऊळका, चांगेफळ या भागात विजेच्या गडगडाटासह दुपारी पावसाला सुरुवात झाली. तब्बल एक तास पावसाने हजेरी लावली. वीजेच्या कडकडाटाने थैमान घातले असता जनमानसात भितीचे वा-



तावरण निर्माण झाले होते. १३ मे नंतर अधून मधून पावसाची रिपरिप सुरूच होती. त्यामुळे शेतातील धुऱ्यावर टाकलेले मातीचे बांध १३ मे रोजीच्या पावसाने फुटले होते. परंतू अधूनमधून पावसाने हजेरी लावल्याने दुरुस्ती कामाला विलंब लागत असे. आज काही शेतकऱ्यांनी शेतात जाऊन बांध दुरुस्ती सुरु केली, बांधावर असताना पुन्हा आकाशात आभाळ दाटून आले. सुसाट वेगाने वारा सुटला आणि वीजेच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली. नागाटी केलेल्या शेतातून पाणी वाहू लागले. नाले, ओढे खळाखळा वाहू लागली. हवामान तज्ञ पंजाबराव डंख यांनी १५ मे रोजी सोशल मीडियावर व्हीडिओ टाकून ३० मे पर्यंत पाऊस असल्याचे सांगितले. त्यामुळे मे महिन्यात उन्हाळा एवजी पावसाळा अनुभवायला मिळत आहे. दुपारी दोन वाजेपर्यंत प्रचंड उकाडा जाणवत असताना दोन नंतर ठरलेल्या वेळेप्रमाणे पावसाचे आगमन होते. या अवकाळी पावसाने शेतीची मशागतीची कामे करणे सोपे झाले आहे. नागाटीची ढेकळे विरघळली आहे. ओलही दोन फुटांपर्यंत गेली आहे. जांभोरा, जऊळका, चांगेफळ, वर्दडी बु ., रुम्हणा, किनगावराजा, दुसरबीड या भागातील शेतकऱ्यांनी सरकी टोचणीला सुरुवात केली आहे. या भागातील शेतकरी दरवर्षी मे महिन्यात १५ नंतर सरकी लावतो, यावर्षी मात्र अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने त्यांचे काम सुरळीत झाले आहे.

## विश्व हिंदु परिषदेचे आ.संचेती यांना निवेदन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
मलकापूर दि.१८

शहरात विकास कामे सुरू असून नाल्या रस्ते बांधकाम सुरू आहे. या खोदलेल्या नाल्यांमध्ये गोवंश पडून त्यांना इजा होत आहे. त्यामुळे गोवंश रक्षणासाठी योग्य त्या उपाययोजना करण्यासाठी विश्व हिंदु परिषदेच्या वतिने विविध मागण्याचे निवेदन आ.चैनसुख संचेती यांना देण्यात आले आहे.

दिलेल्या निवेदनात नमुद आहे की, शहरात मोकाट गोवंश शहरातील मोठ मोठ्या नाली मध्ये अपूर्ण बांधकाम असलेल्या विहिरीमध्ये पडतात. उकिरड्यावर प्लास्टिक पिशवी मधील अन्न



प्लास्टिक पिशवी सह खातात. त्याने त्यांचा मृत्यू होतो, तसेच मोकाट शहरातील मुख्य रस्त्यावर दिवस-रात्र आपले पोट भरण्या करिता भटकत असतात त्यामुळे नागरिकांचे अपघात होतात त्यामुळे त्यांच्या जीवा सोबत गावातील नागरिकांचे ही जीव धोक्यात येत आहे. यांचे उपाय योजना करिता मलकापुर शहराती हिंदुत्ववादी लोकसेवक, मलकापूर मतदार संघाचे आ. चैनसुखजी संचेती यांना नांदुरा रोड वरील रस्त्याच्या दोन्हीकडे वरील नाली वर ढापे बनवीने , मोकाट जनावरे यांन करिता कोंडवाडा सुरू करणे तसेच महाराष्ट्र राज्यात प्लास्टिक बंदी कायद्या कडे होत असलेले अधिकारी यांचे दुर्लक्ष टाळन्या करता सूचित करावे या करिता आज विश्व हिंदू परिषद बजरंग दल च्या वतीने निवेदन देण्यात आले.

## तब्बल १६ वर्षानंतर बुलडाण्याला शासनाचा कामगार पुरस्कार प्राप्त

### कामगारांच्या व्यथा, व्यवस्थेवर बुलडाण्यात चर्चासत्र, विविध संघटनांच्यावतीने सचिन पिंगळेंचा सत्कार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.१८

महाराष्ट्र शासनाच्या कामगार मंडळाचा प्रतिष्ठेचा विश्वकर्मा गुणवंत पुरस्कार २०२३ बुलढाण्यातील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे कर्मचारी सचिन लक्ष्मणराव पिंगळे यांना नुकताच प्राप्त झाला. राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजितदादा पवार, कामगार मंत्री आकाश फुंडकर, कामगार विकास आयुक्त तुकाराम मुंढे, कामगार प्रधान सचिव श्रीमती आय.ए.कुंदन यांच्या प्रमुख उपस्थितीत गिरणी कामगार भवन मुंबईमध्ये १३ मे ला प्रदान करण्यात आला. तब्बल सोळा वर्षानंतर मानाचा प्रतिष्ठेचा समजला जाणारा महाराष्ट्र कामगार मंडळाचा विश्वकर्मा गुणवंत पुरस्कार बुलढाणा जिल्ह्याला प्राप्त झाला आहे. त्यामुळे बुलढाण्यात विविध सामाजिक संघटनांच्या वतीने १७ में ला सायंकाळी कामगार नेते शशिकांत इंगळे यांच्या अध्यक्षतेत महाराष्ट्र शासनाचे आभार तथा कामगारांच्या व्यथा, व्यवस्था आणि वास्तविकतेवर



चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

चर्चासत्राला प्रमुख उपस्थिती. कामगार नेते शशिकांत इंगळे,विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन १०२९ चे मंडळ सचिव संतोष पाटील, महावितरण कर्मचारी वर्ग दोन चे पदाधिकारी विलास मानवतकर, महापारेषण चे कर्मचारी दीपक जाधव, अक्षरदेह नाट्यकलावंत मंडळाच्या रेखा इंगळे, आझाद हिंद कामगार संघटनेचे अ‍ॅड.सतीशचंद्र रोठे पाटील, रमाई ब्रिगेडच्या सुरेखाताई निकाळजे आदींची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी कामगारांच्या गरजा, व्यथा आणि व्यवस्था यासह शासनाचा विश्वकर्मा पुरस्कार प्राप्त पिंगळे यांचा सत्कार करीत त्यांच्या जीवन कार्यावर अभ्यासपूर्ण मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक उमेश कायस्थ, श्रीवास्तव, संचालन अतुल सोनुने यांनी तर आभार प्रदर्शन शाहीर सिंधुताई अहेर यांनी केले. कामगार चळवळीतील विठ्ठल वाघ, विशाल राणे, आकाश सुरडकर, पंचफुलाबाई गवई, सतीश हिवरकर यांच्यासह आयोजक अक्षरदेह नाट्य मंडळ, आझाद हिंद कामगार संघटना, रमाई ब्रिगेडच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी यशस्वीतेसाठी अथक परिश्रम घेतले.

**सचिन पिंगळे मुळे जिल्ह्याला गौरव प्राप्त झाला.**
कामगारांमध्ये सन्मानाची भावना निर्माण व्हावी. त्यांना मूलभूत सुविधा मिळाव्या. त्यांच्या गरजा आणि अत्यावश्यकतेवर शासन प्रशासनाचा कटाक्ष असावा. संस्था,मंडळ आणि शासन प्रशासनामध्ये आपुलकी, प्रेम, जिव्हाळा निर्माण व्हावा. जेणेकरून सर्वसामान्यांना चांगली सुविधा सेवा मिळेल. कामगारांमध्ये जिद्द चिकाटी वाढावी. कामगारांमध्ये सन्मानाची आणि स्वाभिमानाची भावना जागृत व्हावी. यासाठी दिला जाणारा पुरस्कार निश्चितच बुलडाणा जिल्ह्यासाठी गौरवाची अभिमानाची बाब आहे. त्यामुळे सर्व कामगार संघटनांच्या वतीने महाराष्ट्र शासनाचे आभार व्यक्त करण्याचा ठराव सुद्धा सर्वांमते पारित करण्यात आला.

सचिन पिंगळे यांचे सामाजिक, सांस्कृतिक तथा कामगार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यामुळे त्यांना शासनाचा विश्वकर्मा कामगार पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यामुळे निश्चितच बुलढाणा जिल्ह्याला गौरव प्राप्त झाला आहे. ज्यामुळे बुलढाणा जिल्ह्याच्या शिरपेच्यात मानाचा तुरा रोवल्या गेला आहे. सोळा वर्षांपूर्वी सदर पुरस्कार महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील साहित्यिक, विचारवंत सुरेश साबळे यांना प्राप्त झाला होता.असे शशिकांत इंगळे म्हणाले.यासह कामगारांचा व्यथा व्यवस्था आणि वास्तविकता या पैलूवर चर्चासत्रातून प्रकाश टाकण्यात आला.

अजिंक्य भारत
आपलं अमरावती
सोमवार, दि. १९ मे २०२५

# थोडक्यात

## कर्जमाफीसह शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी काँग्रेसचा २१ मे रोजी ट्रॅक्टर मोर्चा



**अमरावती :** शेतकऱ्यांना सहसकट कर्जमाफी द्या या मागणीसह शेतकऱ्यांच्या इतर प्रलंबित मागण्यांसाठी जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने गुरुवारी २१ मे रोजी १० वाजता सुरू होऊन जिल्हा कचेरीवर ट्रॅक्टर मोर्चा धडकणार आहे, शासनाने आश्वासन देऊनही शेतकऱ्यांना अद्यापही कर्जमाफी दिलेली नाही, निवडणुकीपूर्वी दिलेल्या एकही आश्वासनाची पूर्तता या शासनाने केली नाही, शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव नाही, नुकसान भरपाई ची मदत अद्याप शेतकऱ्यांना मिळाली नाही, आधी विविध शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकरिता जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जयस्तंभ चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय यादरम्यान ट्रॅक्टर मोर्चा काढला जाणार आहे, या मोर्चाचे नेतृत्व जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्यासह खासदार बळवंत वानखडे ,माजी मंत्री यशोमती ठाकूर ,वीरेंद्र जगताप करणार आहे ,या मोर्चात शेतकऱ्यांसह काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येत सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी केले,

## आ.रवि राणा विधानसभा आश्वासन समिती अध्यक्ष म्हणून आज स्वीकारणार पदभार



**अमरावती :** सोमवार १९ मे २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता मध्यवर्ती सभागृह चौथा मजला येथे शासनाने घोषीत केलेल्या सर्व समित्याचे एकत्रीत उद्घाटनाचा कार्यक्रम माननिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस, विधानसभा अध्यक्ष अँड राहुल नार्वेकर, विधान परीषद सभापती प्रा.राम शिंदे, यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होईल. या कार्यक्रमाला उपसभापती व उपाध्यक्ष व विधान परीषद व विधानसभेचे सर्व सचिव उपस्थित असणार. त्यानंतर आ.रवि राणा हे माननिय मुख्यमंत्री व पिठासिन अधिकारी यांच्या उपस्थितीत आश्वासन समिती अध्यक्ष पदाचा पदभार स्विकारणार आहे. त्यानंतर लगेच समितीची बैठक आयोजित केली असून या बैठकीच्या सदस्य आ.राजेश पवार, आ.समिर मेघे, आ.अनुपभैय्या अग्रवाल, आ.विनोद अग्रवाल, आ.विक्रम पाचपुते, आ.सचिन कल्याण शैट्टी, आ.पराग शहा, आ.रमेश कराड, आ.किशोर पाटील, आ.अमोल पाटील, आ.प्रदिप जयस्वाल, आ.किरण सामंत, आ.हिरामण थोसकर, आ.संजय बनसोडे, आ.दौलत दरोडा, आ.वरुण सरदेसाई, आ.अमित झनक, आ.राजु खरे आदी सन्माननिय विधानसभा सदस्याचा उपस्थितीत इतीवृत्तामध्ये आयोजीत असलेल्या कामकाजाची बैठक आ.रवि राणा घेणार. पहिल्याच दिवशी विविध प्रश्नाविषयी व दिलेल्या आश्वासनाविषयी सर्व सामान्य नागरीकांचे हित बघता कामकाज करणार असा मनोदय आ.रवि राणा यांनी व्यक्त केला आहे. अशी अधिकृत माहिती आ.रवि राणा यांचे स्वियससचिव उमेश ढोणे यांनी त्यांना प्राप्त विधानभवन रोजीचे पत्रान्वये दिली आहे.

## कुंभारगावात युवा शेतकऱ्याची आत्महत्या

अंजनगावसूर्जी : रहीमापुर पोलिस स्टेशन हद्दीत कुंभारगाव येथे युवा शेतकरी दिपक उर्फ बंडू लक्ष्मणराव गावंडे वय ४५ हा शेतकरी गेल्या दोन दिवसा पासुन घरून निघुन गेला होता. गावकर्यांनी शोध घेला असता दि . १७/५ / २००२५ ला सायंकाळी लगतच शेतशिवारत कडूनिंबाच्या झाडाला गळफास घेतल्याचे दिसुन आले ही वार्ता वाऱ्यासारखी गावात पसरताच पोलिस पाटील यांनी रहीमापुर पोलिस स्टेशनला माहीती दिली आत्महत्येचे कारण कळले नसले तरी त्याने कर्जा पायी आत्महत्या केल्याची चर्चा गावकर्यांन मध्ये बोल्या जात आहे. मृतकाला पत्नी एक मुलगा एक मुलगी आहे . पोस्टमार्टन करीता प्रेत अंजनगाव ग्रामिण रुग्णालयात पाठवण्यात आले पुढील तपास रहीमापुर पोलिस्टेशनचे पोलिस करीत आहे.

## ग्रामीणमध्ये ड्रोन वापरास मनाई

**अमरावती :** पहलगाम येथील हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेचा उपाय म्हणून जिल्ह्यात ड्रोन आणि या प्रकारचे हवाई साधने वापरण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे. हे प्रतिबंध दि. ३१ मे पर्यंत लागू राहणार आहेत. भारतीय लष्कराने पाकिस्तानी दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मद, लष्कर-ए-तैयबा आणि हिजबुल मुजाहिद्दीन यांच्या ठिकाणांवर केलेल्या कारवाईनंतर, अमरावती ग्रामीण पोलिसांनी सतर्कतेचा इशारा दिला आहे. १० मे रोजी भारताने शस्त्रसंधीची घोषणा केली आणि ऑपरेशन सिंदूर स्थगित करण्यात आले. मात्र, दहशतवादी संघटनांनी त्यांचे भारतात असलेले गुप्त समर्थक आणि स्लीपर सेल्स सक्रिय करून सूड घेण्यासाठी घातपात घडवण्याची शक्यता आहे. यासाठी ड्रोन, रिमोट नियंत्रित मायक्रो लाईट एअरक्राफ्ट, पॅरा मोटर, पॅरा ग्लायडर, हँग ग्लायडर, हॉट एअर बलून यांसारख्या साधनांचा वापर केला जाऊ शकतो, अशी शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर, अमरावती ग्रामीण भागात सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था जतन करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आली आहे. त्यानुसार दि. ३१ मे पर्यंत अमरावती ग्रामीण हद्दीत सार्वजनिक ठिकाणी ड्रोन, रिमोट नियंत्रित मायक्रो लाईट एअरक्राफ्ट, पॅरा मोटर, पॅरा ग्लायडर, हँग ग्लायडर, हॉट एअर बलून यांसारखी साधने जवळ बाळगण्यास व वापरण्यास मनाई करण्यात आली आहे. हा मनाई आदेश भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ (१) (३) अन्वये जारी करण्यात आला आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर भारतीय न्याय संहिता कलम २२३ नुसार कारवाई केली जाईल.

# शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या चारित्र्याची होणार पडताळणी!

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शालेय शिक्षण विभागाचा मोठा निर्णय

अजिंक्य भारत । सुधीर केने

### कर्मचाऱ्यांचा फोटो व माहिती जाणार पोलीस ठाण्यात

**अमरावती, दि. १८ :** राज्यातील शाळांमध्ये अलीकडेच वेगवेगळ्या घडलेल्या घटनांमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे याची दखल शालेय शिक्षण विभागाने घेतली आहे . त्या अनुषंगाने राज्यातील शाळांमध्ये आता नव्या नियुक्त शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियुक्ती देताना त्यांचा चारित्र्य पडताळणी अहवाल सादर करावा लागणार आहे. एवढेच नव्हे तर नव्या शिक्षकाचा फोटो व त्याची माहिती स्थानिक पोलीस ठाण्यात जमा केली जाणार आहे.

गेल्या काही दिवसांपासून राज्यातील विविध माध्यमांच्या शाळांमध्ये अघटित घटना घडल्या आहेत .त्यामुळे विद्यार्थ्यांची सुरक्षा संकटात आली आहे .यावर तोडगा म्हणून राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने सर्व माध्यमांच्या व व्यवस्थापनांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने करावयाच्या उपायोजना संदर्भात निर्देश जारी केले आहे. प्रत्येक शिक्षक किंवा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करताना त्याची पार्श्वभूमी, पूर्वीची सेवा, त्याची कौटुंबिक पार्श्वभूमी याची पडताळणी करण्यात येणार आहे. त्या कर्मचाऱ्याला नेमणुकीपूर्वी चारित्र्य पडताळणी अहवाल पोलीस यंत्रणेमार्फत प्राप्त करून घेणे अनिवार्य झाले आहे. एवढेच नव्हे तर सदर कर्मचाऱ्याच्या नेमणुकीनंतर संबंधित व्यक्तीच्या छायाचित्रासह त्याची सर्व तपशीलवार माहिती स्थानिक पोलीस यंत्रणे कडे द्यावी लागणार आहे .कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणीकरिता क्राईम अँड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क सिस्टिम सारख्या तंत्रज्ञानावर आधारित उपाययोजनांचा वापर करण्याचा यावा असे निर्देशही देण्यात आले आहे. नेमणुकीनंतर एखाद्या कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी ही फौजदारी गुन्ह्याशी संबंधित असल्याचे निदर्शनास आल्या त्या तात्काळ सेवेतून कमी करण्यात यावे असेही निर्देश देण्यात आले आहे.

शाळेतील वाहतूक सुरक्षा गृह व्यवस्थापन तसेच उपाहारगृह यासाठी नेमण्यात येणारा कर्मचारी वर्ग मान्यता प्राप्त संस्थेकडून नेमण्यात येणार आहे. सदर कर्मचाऱ्यांची पोलीस यंत्रणे कडून चारित्र्य पडताळणी करून प्रमाणपत्र घेण्यात यावे असे स्पष्ट निर्देश शालेय शिक्षण विभागाने दिले आहेत .विशेष म्हणजे हा नियम नियमित, बाह्य स्त्रोतांद्वारे अथवा कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या सर्वच कर्मचाऱ्यांना लागू राहणार आहे.

मुलांवरील हिंसाचार किंवा गैरवर्तनाचा समावेश असलेल्या कोणत्याही घटनेबाबत वेळेवर दखल घेण्यासाठी मुलांशी संबंधित शासकीय आणि बिगर शासकीय संस्थांच्या प्रमुखांवर ही जबाबदारी टाकण्यात आली आहे .या प्रमुखांनी पर्यवेक्षक म्हणून काम करावे असे निर्देश देण्यात आले आहेत. सध्या शाळांमध्ये बायस्रोताद्वारे अथवा कंत्राटी पद्धतीने कार्यरत कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी पोलीस यंत्रणेमार्फत करून घेतलेली नसल्यास अशी पडताळणी तात्काळ करून घेण्यात यावी याची सर्वस्वी जबाबदारी शाळा व्यवस्थापनावर टाकण्यात आली आहे.

### प्राथमिकसाठी महिला कर्मचारीच!

शाळांमध्ये बायस्रोताद्वारे अथवा कंत्राटी पद्धतीने शिक्षकेतर कर्मचारी नियुक्त करताना पूर्व प्राथमिक तसेच इयत्ता पहिली ते सहावी या वर्गासाठी शक्यतो महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी असे स्पष्ट निर्देश शालेय शिक्षण विभागाने दिले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची जिल्हा (शहर) जम्बो कार्यकारिणी गठीत

## ३३ उपाध्यक्ष, ५७ सचिव, ३८ संघटक सचिन, ६२ सरचिटणीस, तर १० कार्यकारणी सदस्यांचा समावेश

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**अमरावती, दि. १८ :** सहा महिन्यापूर्वी झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला मिळालेल्या अभूतपूर्व यशानंतर राज्यातील तमाम जनतेने पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार याच्या नेतृत्वावर विश्वास दर्शविला आहे. राज्यातच नव्हे तर विदर्भात सुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची मोठी ताकद वाढत असून प्रचंड जनाधार वाढला आहे. राष्ट्रीय नेते अजितदादा पवार याच्या कुशल नेतृत्वात पक्षाची पुर्नवापणी होत असताना पक्षात अनेक नवीन फेरबदल करण्यात आले असून सदस्यता दृश्यता नोंदणी करून नवीन कार्यकारणी सुद्धा गठीत करण्यात आल्या आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका लक्षात घेता नवीन मोर्चेबांधणी व कार्यकत्यांनी कामाला लागण्यासाठी नवीन कार्यकारणी जाहीर करण्याला घेऊन आज रविवार दिनाक १८ मे २०२५ रोजी दुपारी ३ वाजता संत गाडगे बाबा समाधी मंदिर प्रांगण समोरील मैदातातील नवीन सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा अमरावती शहर मेळावा आयोजित करण्यात आला होता. सा मेळाव्याला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य आ.संजय खोडके व अमरावती विधानसभा मतदार संघाच्या आ. सुलभा खोडके याचे मागर्दर्शन लाभले. तसेच राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी अमरावती शहरची नवीन कार्यकारणी जाहीर करून त्यांना नियुक्तीपत्राचे वाटप करण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात तसेच महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष खा. सुनीलजी तटकरे यांच्या आदेशाने व मान्यतेने त्याचवरोवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष आ.संजय खोडके यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी अमरावती शहर कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये प्रशांत डवरे शहराध्यक्ष यांच्यासह ३३ उपाध्यक्ष, ५७ सचिव, ३८ संघटक सचिव, ६२ सरचिटणीस, तर १० कार्यकारणी सदस्यांचा समावेश ग्रांचा समावेश आहे. पक्ष कार्यकारणीत किरकोळ बदल करून काही नवीन चेहऱ्याऱ्यांना देखील पक्षात काम करण्याची संधी देण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस चे शहराध्यक्ष प्रशांत डवरे यांच्या टीम मध्ये उपाध्यक्ष म्हणून भोजराज काळे, जितेंद्रसिंह ठाकूर, रतन डेडुले, भूषण बनसोड, सपना ठाकूर, मनीष बजाज, जयश्री मोरे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. तर शहर प्रवक्ता म्हणून अविनाश मार्डीकर, ऍड. किशोर शेळके, प्रा. सनाउल्ला खान यांना नियुक्ती देण्यात आली.

# पोलीस आयुक्त अरविंद चावरिया मंगळवारी स्वीकारणार पदभार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अमरावती, दि. १८ :** पुणे येथे अप्पर पोलीस आयुक्त म्हणून कार्यरत असलेले पोलीस उप महानिरीक्षक अरविंद चावरिया यांची अमरावती पोलीस आयुक्त म्हणून बदली झाली आहे तसे आदेश शुक्रवारी धडकले आहे. दरम्यान येथे आठवड्यात मंगळवारी ते अमरावती पोलीस आयुक्तालाचा पदभार स्वीकारणार आहेत. मावळ ते पोलीस आयुक्त नवीन चंद्र रेड्डी यांची नागपूर सह पोलीस आयुक्त म्हणून बदली झाली आहे. दरम्यान त्यांच्या बदलीनंतर तीन दिवस नवीन पोलीस आयुक्तांच्या नावाची घोषणा झाली नव्हती. त्यामुळे नवे आयुक्त कोण ही उत्सुकता पोलीस दलात होती. मात्र शुक्रवारी गृह विभागाने बियाजी दर्जाच्या १२ अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश काढले त्यामध्ये नवे पोलीस आयुक्त म्हणून अरविंद चावरिया यांचा नावाची घोषणा झाली अरविंद चावरे हे मूळचे जळगाव जिल्ह्यातील आहेत. ते १९९६ च्या तुकडीचे थेट डीवायएसपी आहेत. २००९ मध्ये त्यांना आयपीएस मिळाले. यापूर्वी त्यांनी विदर्भात बुलढाणा येथे पोलीस अधीक्षक म्हणून तसेच विदर्भाच्या सीमेवरील हिंगोली येथेही सेवा दिली आहे पोलीस खात्यात शक्यतोवर घटक प्रमुख नवीन आल्यानंतर काही दिवसातच ते काही फेरबदल निश्चितच करतात ते करणे सुद्धा त्या घटक प्रमुखांच्या दृष्टीने आवश्यक असतात दरम्यान आता नवे पोलीस आयुक्त आल्यानंतर ते फेरबदल करणार काय या त्यामध्ये कोणाचा नंबर लागणार आहे अशी चर्चा आता पोलीस वर्तुळा सुरू आहे.

> “ पुढील आठवड्यात शक्यतोवर मंगळवार किंवा बुधवारी अमरावतीत येऊन पदभार स्वीकारणार आहे. यापूर्वी बुलढाणा पोलीस अधीक्षक म्हणून सेवा दिली आहे. विदर्भात काम करण्याचा अंदाज आहे.
>
> **अरविंद सावरिया,**
> नवनियुक्त पोलीस आयुक्त.

# गांजा विक्री करणाऱ्या दोघांना अटक; गुन्हेशाखेची कारवाई

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. १८ :** नांदगाव पेठ पोलिस ठाण्यांतर्गत येत असलेल्या वाडकी गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर दोन इसम अवैध रित्या गाजांची विक्री करीत असल्याची महिती मिळाली. त्यावरून सापळा रचून ८ किलो गांजा व इतर साहित्य असा एकूण २ लाख ६० हजाराचा मुद्देमाल जप्तत केला आहे.

नांदगाव पेठ हद्दीत पोलिसांचे पथक पेट्रोलिंग करीत असताना त्यांना वाडकी रोडवर राठी यांच्या फॉर्म हाऊसजवळ दोन इसम गाजांची विक्री करीत असल्याची माहिती मिळाली होती. त्यावरून गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सापळा रचून आरोपी अब्धुल शफील अब्दुल रफीक ६२ रा. बीसीमील्लानगर लालखडी, सुलतानबेग जमीलबेग ६२ रा. गुलीस्तानगर यांना ताब्यात घेतले. दोघांची झडती घेतली असता एका कोपऱ्यात गांजा आढळून आला. पोलिसांनी गांजासह दोघांनाही ताब्यात घेतले आरोपीविरुद्ध कारवाई करून नांदगाव पेठ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई पोलिस आयुक्त नवीनचंद रेड्डी, पोलिस निरीक्षक बाबाराव अवचार, सहाय्यक पोलिस निरीक्षक महेश इंगोले, योगेश इंगळे, अनिकेत कासार, पोलिस उपनिरीक्षक संजय वानखडे, दीपक सुंदरकर, अजय मिश्रा, मनोज ठोसर, मंगेश शिंदे, संग्राम भोजने, चेतन कराळे, राजीक रायलीवाले, योगेश थोरात, सागर ठाकरे, चेतन शर्मा, अनिकेत वानखडे, सुषमा आठवले यांनी केली आहे.



तर दुसऱ्या कारवाईत राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका पानठेल्यात आरोपी सलीम उर्फ विक्रम किशोरसिंग ठाकूर, ३५ रा. जुना सातूर्णा हा पानठेल्याम ध्ये गांजा बाळगून लोकांना विक्री करीत होता. पोलिस निरीक्षक सीमा दाताळकर यांच्या पथकाला याबाबत माहिती मिळाली होती.

त्यावरून आरोपीचा पानठेल्याची झडती घेतली असता एका प्लास्टिकच्या पिशवीमध्ये एक किलो ८५ ग्रॅम गांजा मिळून आला. पोलिसांनी तो जप्त केला असून एक मोबाईल सुद्धा ताब्यात घेतला आहे. ही कारवाई पोलिस निरीक्षक सीमा दाताळकर, सहाय्यक योगेश इंगळे, युसूफ सौदाकर, विनय मोहोड, छोटेलाल यादव, अजय मिश्रा, सुधीर गुडधे, विजय बोराडे, संजय भारसाकळे, नवीन बेग, आशिष डबले, निवृत्ती काकड, चेतन कराळे, वर्षा घोंगडे यांनी केली आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस मनपा निवडणूक स्वबळावर लढणार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. १८ :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजितदादा गट घड्याळ चिन्हावर स्वबळावर मनपा निवडणूक जिंकणार असून महापौर हा राष्ट्रवादीचाच राहिल, असे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उपाध्यक्ष, विधान परिषद सदस्य आ. संजय खोडके यांनी आज पत्रकार परिषदेत स्पष्ट केले आहे. अजितदादा यांनी पुण्याच्या एका सभेत राष्ट्रवादी स्वबळावर निवडणुका लढणार असल्याचे घोषित केल्यानंतर आ. संजय खोडके यांनी आज ही घोषणा केली.

यावेळी त्यांनी मनपा निवडणुका ह्या विकासाच्या मुद्यावर लढण्यात येतील. शहरातील नागरिकांचे आरोग्य, शहर स्वच्छता व शहरातील नागरिकांच्या मुलभूत विकासावर जास्तीत जास्त भर दिल्या जाणार असल्याचे म्हटले आहे. यापूर्वी महानगरपालिकेच्या निवडणुकीत जेव्हा जेव्हा राष्ट्रवादीने उमेदवार उभे केले त्यावेळी पक्षाला स्थानिक नागरिकांनी विकासाच्या कामावर भरभरून अभूतपूर्व यश दिले होते.

राष्ट्रवादीने महापौर, उपमहापौर अनेक स्थायी समिती सभापती यासह अन्य समित्यांवर सुद्धा राष्ट्रवादीच्या नगरसेवकांना संधी दिली होती. सध्याच्या परिस्थितीत आ. सुलभा खोडके यांच्या रुपाने गत विधानसभा निवडणुकीत शहरात काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या अमरावती मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मोठा जनाधार मिळाला आहे. प्रत्येक समाज घटनाकांना न्याया देण्यासाठी मनपा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अग्रेसर असेल असा विश्वास आ. संजय खोडके यांनी पत्रकार परिषदेत व्यक्तत केला. एका प्रश्नाच्या उत्तरात धर्मावर टीका करणाऱ्यांसोबत युवा स्वाभीमानचे नाव न घेता महायुतीच्या घटक पक्षासोबत हा पक्ष असल्यामुळे मनपा निवडणुकीत आम्ही मनपा निवडणुका स्वबळावरच लढणार असल्याचे ठासून सांगितले.




जनतेच्या दृष्टीकोनातून अमरावतीत होत निर्माण होत असलेले मेडिकल कॉलेज हे शहराच्या जवळपास असावे हा आपला मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल जवळ श्री शिवाजी शिक्षण संस्थेची आठ एकर जागा असून ती जागा शासकीय मेडिकल कॉलेजसाठी उपयुक्तत ठरेल.

या जागेच्या मोबदल्यात शिवाजी शिक्षण संस्थेला दुसरी जागा देता येईल किंवा मोबदला सुद्धा देता येईल असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. जनेकरून सर्वसामान्यांना त्याचा फायदा होईल यासाठी वेळप्रसंगी लढा देण्याचे काम पडल्यास लढा उभारू. पत्रकार परिषदेला आ. संजय खोडकेसह, आ. सुलभा खोडके, माजी महापौर किशोर शेळके, शहर अध्यक्ष प्रशांत डवरे, मंगेश मनोहरे, माजी स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, भूषण बनसोड आदी उपस्थित होते.

# सदस्य संख्या निश्चितीसाठी शासनाने मागितला अहवाल

## जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकांची तयारी, २०११ च्या जनगणनेनुसार १८ लाख ४ हजार ४९३ लोकसंख्या

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. १८ :** न्यायालयाच्या आदेशावरून आता शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांची तयारी सुरू केली आहे. अशाच शुक्रवारी शासनाकडून जिल्हा प्रशासनाला जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य संख्या निश्चिती करिता अहवाल मागितला आहे. त्यानुसार जिल्हा प्रशासनाने २०११ च्या जनगणनेचा अहवाल शासनाकडे शनिवारी पाठविला आहे. परंतु या अहवालानुसार जिल्हा परिषद जुनी संख्या कायम होणार असून नवीन लोकसंख्येच्या प्रमाणात मात्र ६६ सदस्य संख्या अपेक्षित आहे. त्यामुळे यावर आता प्रशासन कोणता निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

गेल्या तीन वर्षापासून राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका रखडल्या आहेत. ओबीसी आरक्षण आणि वाढीव सदस्य संख्या यावर आतापर्यंत न्यायालयात शासनाचा संघर्ष सुरू असताना सर्वोच्च न्यायालयाने येत्या चार महिन्यात निवडणुका घेण्याचे आदेश शासनाला दिले आहे.



त्यामुळे शासन आता ॲक्शन मोडवर आहे. मात्र सदस्य संख्या आणि ओबीसी आरक्षणाचा मुद्द्यावर सध्या तरी संभ्रम कायम आहे.

न्यायालयाने ओबीसी आरक्षण २७% घेण्यात देखील आदेश दिला आहे. त्यामुळे आता या दोन मुद्द्यावर शासनाकडे गाव पुढाऱ्यांचे लक्ष लागले आहे. अशातच शुक्रवारी सदस्य संख्या निश्चित करण्याकरिता जिल्हा प्रशासनाकडून त्या संदर्भात अहवाल मागितला आहे. २०११ च्या जनगणने नंतर किती लोकसंख्या वाढली, शहरी भाग किती झालेत,, पुनर्रचनेत काय बदल झाले आधीची माहिती शासनाने मागितली आहे. जिल्ह्यातील २०११ च्या जनगणनेचा विचार केल्यास १८ लाख ४९२ लोकसंख्या आहे. यामध्ये एस सी प्रवर्गातील तीन लाख ३८ हजार ८८३ तर एसटी प्रवर्गातील तीन लाख ६० हजार ३९० लोकसंख्या आहे. तसेच दिवसा भातपुरी धारणे आणि नांदगाव खंडेश्वर नगरपरिषद वाढली आहे. तर पुनर्रचनेत अतलपूर दर्यापूर नगरपालिकेत ग्रामीण भागातील काही गावे समाविष्ट झाल्याने शहरी भागातील लोकसंख्या वाढली आहे. याशिवाय आजच्या लोकसंख्येचा विचार केल्यास ग्रामीण भागात देखील लोकसंख्या वाढल्याने वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात ६६ जिल्हा परिषद सदस्य व १३२ पंचायत समिती सदस्य असणे गरजेचे आहे. त्यामुळे आता प्रशासनावर शासन काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका चार महिन्याच्या आत घेण्याचे निर्देश राज्य शासनाला दिले आहे. चार आठवड्यात निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना सुद्धा न्यायालयाच्या वतीने देण्यात आले आहे. परंतु राज्य शासनाकडून या आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याचे सध्यातरी घेऊन येत आहे. राज्य शासन न्यायालयाच्या आदेशाचे पालन करणार की पावसाळा तोंडावर असल्याचे सोंग करणार असेही ग्रामीण भागात तीन नागरिक बोलत आहे. गेल्या तीन वर्षापासून जिल्ह्यात प्रशासनात सुरू आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपरिषद या ठिकाणी प्रशासक्रात असून अधिकारी कर्मचारी मात्र सर्वसामान्य नागरिकांना त्रास देत असून कुठलीही काम करण्यास तयार नाही. सत्ताधारी आमदारांच्या चिठ्ठ्या किंवा फोन आल्यावर ती कामे त्वरित केली जातात असे प्रकार गेल्या दोन वर्षापासून पाहायला मिळत आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या आदेश हे योग्य असल्याचे नागरिक बोलत आहे.

# थोडक्यात

## विद्यापीठाची शिक्षण आणि परीक्षा योजना

**अमरावती :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने पी.एच.डी. अभ्यासक्रमासाठीच्या शिक्षण आणि परीक्षा योजनेची घोषणा केली आहे. विद्यापीठाने याबाबत दि. ७ मे, २०२५ रोजी निदेश क्रमांक ३५/२०२५ जारी केला आहे. विद्यापीठ अनुदान आयोग (एम.फिल./पी.एच.डी. पदवी प्रदान करण्यासाठी किमान मानके आणि प्रक्रिया) नियम, २०१६ नुसार ही योजना तयार करण्यात आली आहे. अध्यादेश क्रमांक १/२०१६ च्या तरतुदीनुसार, पीएचडीच्या विद्यार्थ्यांसाठीचा अभ्यासक्रम विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील संशोधन केंद्रांद्वारे चालवला जाईल. मात्र, पेपर-१ म्हणजेच संशोधन पद्धती (रिसर्च मेथॉडॉलॉजी) ची परीक्षा विद्यापीठाद्वारे घेतली जाईल. अभ्यासक्रमासाठीचा अभ्यासक्रम विद्या परिषदेने यापूर्वीच मंजूर केला असून तो विद्यापीठाद्वारे अधिसूचित करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाच्या यशस्वी पूर्णतेनंतर विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे मूल्यांकन श्रेणी पद्धतीने केले जाईल. प्रत्येक विषयातील थेरपी आणि प्रॅक्टीकल परीक्षेतील गुणानुसार विद्यार्थ्यांना श्रेणी प्रदान केली जाईल. यासाठी विद्यापीठाने गुण आणि श्रेणी दर्शविणारी सारणी देखील प्रसिध्द केलेली आहे. संपूर्ण अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या एकत्रित कामगिरीचे मूल्यांकन सेमिस्टर परफॉर्मन्स इंडेक्स (एस.पी.आय.) द्वारे केले जाईल. एस.पी.आय. हा अभ्यासक्रमातील सर्व विषयांमध्ये प्राप्त केलेल्या श्रेणी गुणांचे भारित सरासरी असेल. या परीक्षेसाठी विद्यापीठाच्या इतर लागू असलेल्या नियमांचे पालन केले जाईल, असेही अधिसूचनेत स्पष्ट करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी आचार्य कक्षाच्या उपकुलसचिव सौ. मीनल मालधुरे यांचेशी संपर्क साधावा.




## समस्या घेवून सर्वसामान्य नागरिक पोहोचले जनता दरबारात

**अमरावती :** प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे वारंवार अर्ज विनंत्या, तक्रारी करून तसेच शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवूनसुद्धा न्यायाच्या प्रतिक्षेत असलेल्या शेकडो नागरिकांनी काँग्रेसच्यावतीने आयोजित जनता दरबारात आपली कैफियत , समस्या मांडल्यात, खासदार बळवंतराव वानखडे, माजी मंत्री ॲड. यशोमतीताई ठाकूर, कँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप, शहराध्यक्ष बबलू शेखावत आदींनी नागरिकांच्या समस्या ऐकून त्या सोडविण्याबाबत संबंधित विभागाकडे पाठपुरावा सुरू केला. सर्वसामान्य, गरीब नागरिक, बेरोजगार युवक, शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी तसेच महिला वर्गाने या जनता दरबारात उपस्थित राहून आपल्या समस्या मांडल्याा. खासदार बळवंतराव वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली यशोमतीताई ठाकूर यांच्या गणेडीवाल लेआउट स्थित निवासस्थानी सोमवारी सकाळी ९ पासून जनता दरबार सुरू झाला. यावेळी वीज वितरणकंपनी, कृषी विभाग, महसूल विभाग, आरोग्य विभागाशी संबंधित अनेक गाऱ्हाणी नागरिकांनी मांडल्यात.विशेष म्हणजे अनेक सुशिक्षीत बेरोजगार सुद्धा रोजगाराची मागणी घेवून त्याठिकाणी आले होते. सरकारकडून देण्यात आलेली आश्वासने फोल ठरत असल्याने निराश झालेल्या नागरिकांनी आपल्या व्यथा खासदार बळवंत वानखडे, ॲड,यशोमतीताई ठाकूर यांच्या समोर मांडल्यात. शिवाय तलाठी पदाची पदभरती व इतर विभागातील भरती होत नसल्याने अनेकांच्या पदरी निराशा आली होती. मात्र खासदार श्री. वानखडे, यशोमतीताई ठाकूर यांनी त्या ऐकून घेत संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन देत त्यांच्या वेदनांवर फुंकर घातली. माजी मंत्री ॲड.यशोमतीताई ठाकूर यांच्या निवासस्थानी आयोजित जनता दरबाराला प्रचंड प्रतिसाद मिळाला. त्यानंतर दुपारी १२ पासून स्थानिक काँग्रेस भवन येथे खासदार बळवंत वानखडे, यशोमतीताई ठाकूर, बबलू देशमुख, प्रा. वीरेंद्र जगताप आदींच्या उपस्थितीत नागरिकांनी आपल्या समस्या मांडल्यात.

## धनश्री जाधवचे दहावीत नेत्रदीपक यश

**अंजनगाव बारी :** अमरावती येथील स्थानिक ओईस्टार इंग्लिश स्कूल अमरावती ची विद्यार्थिनी धनश्री संजय जाधव हिने दहावीत ९९% टक्के गुण प्राप्त करून घवघवीत यश प्राप्त केले, धनश्री वडील सर्वसामान्यांना कुटुंबातील असून कंपनीत जॉब करतात आई गृहिणी तिने आपल्या यशाचे श्रेय मुख्याध्यापक कुलकर्णी सर आणि सर्व शिक्षक वृंद व आई वडील भाऊ यांना दिले.



## महर्षि वाल्मिकी मठाला निधि मंजूर करण्यासंबंधाने प्रस्ताव सादर

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**दर्यापुर, दि. १८ :** तालुक्यातील सामदा काशीपूर येथील महर्षी वाल्मिकी मठ हा प्राचीन हजारो वर्षाचा मठ आहे. त्याला महाराष्ट्र शासनाने ब वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा दिला आहे. या मठा साठी निधी मिळावा या हेतूने महाराष्ट्र राज्य कृती समितीचे महासचिव व कोळी महादेव जमातीचे नेते उमेश ढोणे हे सातत्याने राज्य शासनाला पत्रव्यवहार करून आमदार, माजी खासदार, मंत्री पालकमंत्री यांचे भेटी घेत आहे याची दखल घेत आमदार रवी राणा माजी खासदार नवनीत राणा यांच्या पत्रावर पालकमंत्री तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे यांना पत्र पाठवून जि. प. अमरावती यांनी यापूर्वीच निधी मागणीचा पाठविलेल्या पत्राचा संदर्भ घेत १६ कोटी मंजूर करावे या संबंधाने प्रस्ताव सादर करावा असे आदेश ना.गोरे यांनी शासनाचे ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव यांना १४ मे २०२५ रोजी दिले आहे. त्यांनी त्यांचे प्रयत्नाला यश येण्यासाठी मंत्रालयात वरील निधीचे पत्र सादर करतेवेळी महर्षि वाल्मिकी यांचे स्मरण करत प्रार्थना केली आहे.व ना. गोरे यांचे त्यांनी या कामी प्राधान्य दिले बद्दल पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

## लेहगाव येथे गुरांच्या बाजाराचा शुभारंभ

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**शिरखेड, दि. १८ :** मोर्शी कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत उपबाजार लेहेगाव येथे दि. १७ मे २०२५ रोजी सकाळी ११ वाजता गुरांचा बाजाराचा शुभारंभ मोर्शी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सभापती सचिन ठोके, उपसभापती संजयराव तट्टे, सचिव भावेश लिखितकर व संचालक मंडळ यांच्या उपस्थितीत मोठ्या थाटात पार पडला. शुभारंभ दिनी ६० ते ७० शेतकऱ्यांनी गुरे विक्रीस आणली. पहिल्याच दिवशी शेतकऱ्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. यामध्ये श्रीधर तट्टे शेतकरी लेह्गाव यांची एक म्हैस ३८००० रु ला विक्री झाली त्यांचा सत्कार सभापती सचिन ठोके यांच्या हस्ते करण्यात आला. हाजी महम्मद अकबर रा चांदूर बाजार यांचा एक गोर्हा २२००० ला विक्री झाला. त्यांचा सत्कार उपसभापती संजय तट्टे यांच्या हस्ते करण्यात आला होता. नारायण सुखदेव हिरडे रा विचोरी यांचे २ गोऱ्हे ३०००० रु ला विक्री झाले. त्यांचा सत्कार अब्दुल रहीम कुरेशी, संचालक यांच्या हस्ते करण्यात आला. प्रफुल्ल मधुकर केचे रा कवठाळ यांची बैल जोडी ८२००० रु ला प्रमोद चोंढे काटपूर यांनी विकत घेतली. यांचा सत्कार प्रकाश विघे, संचालक यांच्यातर्फे करण्यात आला. वरील सर्व शेतकरी बांधवांचा सत्कार शाल व श्रीफळ देऊन करण्यात आला. याप्रसंगी सचिन ठोके, सभापती, संजय तट्टे, उपसभापती, सचिव भावेश लिखित कर, संदीप रोडे, अरुण कोहळे, बाबूलाल ठवळी, अब्दुल रहीम कुरेशी, प्रकाश विघे, बंडू जिचकार, प्रवीण काळमेघ, संजय टेकाडे, सर्व संचालक आणि शेतकरी बांधवांच्या उपस्थितीत पार पडला.



# सैनिकांच्या शौर्याच्या सन्मानासाठी भाजपची तिरंगा रॅली

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. १८ :** जम्मू कश्मीर येथील पहलगाम येथे निर्दोष भारतीय लोकांचे धर्म विचारून त्यांची हत्या पाकिस्तानी दहशतवाद्यांकडून करण्यात सीमेवर देशाचे सैनिक आपल्या सुरक्षेच्यासाठी अहोरात्र लढत लढले, त्यांचे प्रोत्साहन वाढवण्यासाठी व त्यांच्या या अतुलनीय शौर्याचा सन्मान करण्यासाठी व त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी रविवार, दिनांक १८ मे रोजी अमरावती शहरात भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले भारत मातेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली यावेळी अमरावती लोकसभेच्या माजी खासदार सौ नवनीत राणा यांनी आपला धडाकेबाज शैलीतून देश सेवेसाठी कार्यरत असणाऱ्या आणि पाकिस्तान मध्ये घुसून दहशतवादी अड्डे उध्वस्त करणाऱ्या सैनिकांना धन्यवाद दिला, देशसेवेसाठी आपल्या देशातील सैन्यदलाचे सर्व सैनिक आहोत रात्र डोळ्यांमध्ये तेल घालून आपली रक्षा करतात, त्यामुळे आज आपला देश जशास तसे उत्तर देतो असे वक्तव्य यावेळी प्रामुख्याने माजी खासदार नवनीत राणा, भाजपा ज्येष्ठ नेते प्रा.रवींद्र खांडेकर, किरण पातुरकर, माजी महापौर संजय नरवणे,अमरावती मनपा माजी पक्षनेता सुनील काळे,स्थायी समिती सभापती सचिन रासने, सौ राधा कुरील, युवा मोर्चा प्रदेश महामंत्री बादल कुळकर्णी, किसान मोर्चा प्रदेश महामंत्री ललित समदूरकर, युवा मोर्चा शहर अध्यक्ष कौशिक अग्रवाल, महिला मोर्चा अध्यक्ष गंगा ताई खारकर,माजी उपमहापौर कुसुम साहू, स्थायी समिती माजी सभापती विवेक कलोती, माजी नगरसेवक बलदेव बजाज, श्रीचंद तेजवानी, नूतन भुजाडे, पद्मजा कौंडण्य, अजय सारसकर, वंदना मडगे, चंदू बोमरे,राजेश साहू, माधुरी ठाकरे, नीता राऊत, लवीना हर्ष, स्वाती कुलकर्णी, आशिष अतकरे, सुनंदा खरड, वंदनाताई हरणे, इंदुताई सावरकर, गंगाताई अंभोरे,चेतन पवार, सतीश करेसीया, गजाननराव देशमुख, विनोद गुहे,प्रणित सोनी,मंगेश खोंडे, सुरेंद्र बुरंगे, भाजपा मंडळ अध्यक्ष मनीष चौबे, प्रफुल बोके, कावरे, छोटू वानखडे, सचिन नाईक, शैलेंद्र मिश्रा, कुणाल टिकले, विशाल डहाके, श्रीकांत फणसे, आकाश पाटील,अमोल थोरात, विकी शर्मा,पंचफुला चव्हाण, राजू कुरील,विवेक चुटके, राजू मेटे, श्रीकांत धानोरकर, किशोर जाधव, प्रदीप सोळंके, राहुल वागरे, श्याम उपाध्ये, जगदीश कांबे, निलेश काजे, सुधीर वाघ, तुषार चौधरी, श्याम साहू, सविता भागवत, शितल वाघमारे, तृप्ती वाट, सतनाम हुडा, किरण गुप्ता, रोशनी वाकडे, कार्तिक समदेकर, अखिलेश खेडेकर,अलका सरदार, धनराज चक्रे, सुधीर बोपुलकर, विशाल तराळ, मिलिंद बांबल, विशाल कुलकर्णी, शेखर कुलकर्णी,तुषार वानखडे, मुकेश वासे वाय, अमृत यादव, तुषार अंभोरे, अंकेश गुजर, मनीष देशपांडे, दिनकर वैद्य, सुरज मिश्रा, सुधीर थोरात, किरण भागवत, ज्योती सयरीसे, सुमती ढोके, हरीश चरपे, अवि काळे, अर्चना तालन, पराग चीमोटे, भूषण पाटणे, तसेच या रॅलीत अमरावतीतील सर्व राष्ट्रप्रेमी नागरिक, युवक, महिला, विद्यार्थी, सामाजिक संस्था, औद्योगिक संघटना, तसेच विविध क्षेत्रातील संख्येने सहभागी झाले.



# अंजनगाव बारी प्राथमिक आरोग्य केंद्राचा भोंगळ कारभार; रुग्ण कल्याण समिती झोपेत

अंजनगाव बारी परिसर विविध वृत्त



साहेबराव राऊत

**अंजनगाव बारी, दि. १८ :** येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे आरोग्य केंद्रातील कारभार पुर्णतः बिघडला असुन आरोग्य केंद्राचे वेळापत्रकही बदलले आहे. नियमानुसार आरोग्य केंद्राची वेळ ही सकाळी ८:३० असुन येथील कर्मचारी ९:३० तर वैद्यकीयदृष्ट्या अधिकारी १० च्या. नंतर हजर होतात. येथील रुग्णना तासनतास बसुन त्रास सहन करावा लागतो. याठिकाणी पुरेसा कर्मचारी वर्ग असुन दोन वैद्यकीय अधिकारी आहे. येथिल ग्रामप्रशासनाच्या रुग्ण कल्याण समितीचे याकडे पूर्णतः दुर्लक्ष आहे. याबाबबत संबंधित प्रशासनाकडे तक्रार केली असता, खाजगी दवाखान्यात जा असा सल्ला मिळतो. या आरोग्य केंद्राच्या अंतर्गत २१ गावे येत असुन याठिकाणच्या वैद्यकीय कारभारात मोलाची दक्षता रहायला पाहिजे होती. सकाठी ८ वाजता पासून याठिकाणी रुग्णास उपचाराकरिता हजर राहत असुन मात्र कर्मचारी याची दखल घेत नाही तर वैद्यकीय अधिकाऱ्याकडून रुग्णाना उलट उत्तरे ऐकावी लागते. त्यामुळें याप्रकाराला नागरिक त्रासले असुन शासनाने याची दखल घेणे महत्वाचे ठरते.







> “मी आरोग्य केंद्रामध्ये गेलो असता याठिकाणी वैद्यकीयदृष्ट्या अधिकारी हजर नव्हते. सकाळचे ९ वाजून ३० मिनिटे झाली होती. माला लुजमोशनचा त्रास होत असल्या कारणाने डॉक्टरांना बोलविण्या करीता त्याच्या का , कॉर्टवर गोलो असतो. माझे डोके खाऊ नका व माझा दिवस खराब करु नका. असे उत्तम उत्तर ऐकायला मिळाले. यावरून येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांना सरकारी सेवेची गरज नाही हे लक्षात येते.
>
> **गोपाल गुर्जर,** संबंधीत रुग्णास, अंजनगाव बारी

> “येथील आरोग्य केंद्रात विद्यार्थी जात असताना येथे एकही कर्मचारी आढळत नसल्याचे विद्यार्थीकडून सांगण्यात येते.शाळेकडून आरोग्य केंद्रात जाण्यास विद्यार्थांना आवश्यक तेवढाच वेळ दिल्या जातो.त्यातही कर्मचारी तथा वैद्यकीय अधिकारी वेळेवर हजर राहत नसल्याने विद्यार्थांची गैरसोय होते.
>
> **चंद्रकांत खडसे,** शिपाई, जनता विद्यालय, अंजनगाव बारी

# धम्म प्रदीप बौद्ध विहारात भारतरत्न डॉ.बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण

**अंजनगाव बारी :** १५ मे रोजी अंजनगाव बारी बरी येथे बुद्ध जयंती साजरी करण्यात आली. बुद जयंती निमित्य (दि.१२) मे रोजी विश्वभुषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पूर्णाकृती पुतळयाचे अनावरण पुज्य भन्ते शिलरत्न व भन्ते निरीजानंद यांनी उद्घाटन करून अंजनगाव बारी येथील उपासक तसेच उपसिकेला धम्मदेशना (प्रवचन) दिले. त्याकरीता बुध्द अनुयायांनी आचरण करण्याची आवश्यकता आहे. बुद्ध धम्म हा भारतातील असताना देखील जगातील जास्तीत जास्त देश अनुकरण/पालन करतात त्यांचा विकास झालेला आहे. परंतू भारतामध्ये आचरण करणारे प्रचारक कमी असल्याने धम्माचा प्रसार कमी प्रमाणात आहे. याप्रसंगी अंजनगांव बारी येथिल सरपंच शोभा खडसे, दिपक गरुड, नामदेवराव खडसे दिपक खडसे, राजू गरुड यांचे हस्ते पंचशिल ध्वजारोहन करण्यात आले. ध्वजाला सलामी समता सैनिक दलाचे प्रमुख कार्यकारी सुनिल इंदुरकर व राहुल कारकोन व त्यांचा संघ यांनी सलामी दिली. तसेच राहुल कारकोन यांनी २२ प्रतिज्ञा व सविधान उद्देशिकेचे वाचन केले. त्याच प्रमाणे जावे सर यांनी मार्गदर्शन केले. सुत्रसंचालन इंजि. सुरज गरुड यांनी केले तर आभार प्रदर्शन उमेश खडसे यांनी केले. त्यानंतर दुसरे सत्र बुद्ध , कबीर, फ ुले, शाहु, आंबेडकर यांचे विचारावर मार्गदर्शन प्रमुख वक्ते इंजिनिअर तुषार उमाळे (वर्धा) यांनी प्रखर मार्गदर्शन केले. मनुवादी व्यवस्था हाणून पाडण्याचे कार्य महापुरुषांनी केले. बुध्द, फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जागतिक किर्तीचे महापुरुष होते. पंतप्रधान हे परदेशांत आवर्जून सांगतात आम्ही भारतवासी हे सर्व बुध्द भुमीतीक आहोत. परंतु भारतात मनुवादी व्यवस्थेचे पालन करतात. या कार्यक्रमाचे अध्यात राहुल कांबळे, प्रमुख उपस्थीती प्रकाश गरुड, दिपक भार गरुड (निवृत्त बिडीओ), नामदेवराव खडसे (निवृत्त अधिकारी) इंजि. दिपक खडसे, सुदामजी खडसे, बंडू खडसे , विनायक सवई, कैलास सवाई, योगिराज भगत, धनराज भगत, युवराज खडसे, विजय गरुड, शोकराव गरुड, सिद्धार्थ गरुड ,अनिल खडसे मनोहर खडसे, लक्ष्मण खडसे, बबलु खडसे, नितीन गरुड, सारंधर खडसे, रोशन कारकोन, प्रदिप कारकोन , दादासाहेब लोहकरे, श्रीपाल लोहकरे, धिरज ढोकणे, निलेश खडसे, राहुल खडसे, धम्मपाल खडसे, शंकरराव गरूड, रविराज भगत , पृथ्वीराज अटवर्धन तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुमेधा खडसे, आभार उमेश खडसे संपूर्ण कार्यक्रमाला ॲड विलास गावंडे, राजू गरुड, राजू लोहकरे, राहुल कारकोण, नवयुवक सिद्धार्भ मंडळाचे सर्व कार्यकर्ते, सुजाता महिला मंडळ तसेच उमेश डकरे, जगदिश अंबडकार, अरविंद निबर्ते, वसंतराव सोनार, विजय इंगोले, राजेंद्र भिवगडे, अरविंद टिंगणे, शंकर ठाकुर, अतुल कदम , संदिप कदम, सुनिल इंदुरकर, सैय्यद दिक्षाभुमी नागपुर, कार्यकारी प्रमुख चादवे सर, जावेद सर, लताबाई पाटील समता सैनिक दल , प्रकाश गरुड, भाग्यश्री जवंजाळ, सचिन गरुड, सूरज शेवतकर, मेघराज भगत, शरद इंगोले आदी व बहुसंख्येने गावातील नागरिक उपस्थित होते.



## थोडक्यात

### लोखंडी रॉडने हल्ला

**कळंब :** लोखंडी रॉडने हल्ला केल्याची घटना घडली. याप्रकरणी फिर्यादी व फिर्यादीचे मित्र गोपाल बोभाटे व ललीत मुनेश्वर हे चारचाकी वाहन क्र. एम.एच. २९ बि.सी. २५२६ ने कळंब वरून दत्तापुर मार्ग नांझा येथे जात असताना आरोपीतांनी बोलेरो पिकअप वाहन क्र. एम.एच. ३२/०४८१ हे भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन वाहनास ठोस मारून नुकसान केल्याने फिर्यादीने आरोपीचे गाडीचा पाठलाग करून वाहन थांबविल्याच्या कारणावरून संगणमत करून फिर्यादी व फीर्यादीचे मित्रास लोखंडी रॉडने व लाकडी पाठीने मारून जखमी करून शिविगाळ केली. याप्रकरणी रूषीकेश लहुजी कुमरे यांच्या तक्रारीवरून मज्जु कुरेश, मुदसी कुरेशी, सैफी कुरेश, मास्टर कुरेशी विरूध्द गुन्हा नोंद केला.

### पती-पत्नी अपघातात जखमी

**नेर :** अपघातात पती-पत्नी जखमी झाल्याची घटना घडली. याप्रकरणी वाहन क्र. एम.एच. २७ बि. एम. ३४४५ ने अमरावतीकडे जात असतांना आरोपी वाहन क्र. एम.एच. २९ बि.सी. ५४६९ च्या चालकाने वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन दुचाकीला धडक दिल्याने अपघात होवून पती पत्नी जखमी झाले. याप्रकरणी रंजना सुरेशराव नैताम यांच्या तक्रारीवरून वाहन क्र. एम.एच. २९ बि.सी. ५४६९ च्या चालकाविरूध्द गुन्हा नोंद केला.

### तरुणास जीवे मारण्याची धमकी


**नेर :** मच्छी पकडण्यावरून वाद केल्याची घटना घडली. याप्रकरणी आरोपीतांनी संगणमत करून मच्छी पकडण्याचे कारणावरून वाद करून शिविगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली. ही घटना १७ मे रोजी घडली. याप्रकरणी अनिल श्रावण भोयर यांच्या तक्रारीवरून शुभम गुलाब खांदवे, राणी मारबते विरूध्द गुन्हा नोंद केला.

### अपघातात युवक जखमी

**दिग्रस :** अपघातात युवक जखमी झाल्याची घटना घडली. याप्रकरणी एस टी बस वाहन क्र. एम.एच. ४० सी.एम.६३२९ च्या चालकाने वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन गजानन धम्मपाल श्रावणे यांच्या दुचाकी क्र. एम.एच. २९ सी.एफ. १९०४ ला धडक दिल्याने अपघात होवून फिर्यादीचे भावाचे डोक्याला मार लागुन फिर्यादीचा भाऊ गंभिर जखमी झाला. याप्रकरणी कु. करीना धम्मपाल श्रावणे यांच्या तक्रारीवरून एस टी बस वाहन क्र. एम.एच. ४० सी.एम.६३२९ च्या चालकाविरूध्द गुन्हा नोंद केला.

## निधन

### सूर्यभान शिंदे



**यवतमाळ :** येथील वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष अशोक शिंदे यांचे वडील सूर्यभान दादाराव शिंदे यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी रविवारी (दि.१८ मे) मध्यरात्री २.३० वाजतादरम्यान निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा अशोक, मुली, नातवंडे, सुना व फार मोठा आप्तपरिवार आहे. त्यांची अंतिम यात्रा वंजारी फैल येथून सोमवारी, दि. १९ मे रोजी सकाळी ११ वाजता निघणार आहे.

# वादळाचा कहर

## वीज पडून २२ शेळ्या ठार, शेळीपालकही जखमी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**मारेगाव, दि. १८:** मारेगाव तालुक्यातील नेत-वरूड परिसरात रविवारी (दि. १८) सायंकाळी झालेल्या अवकाळी वादळी पावसादरम्यान वीज कोसळून २२ शेळ्यांचा जागीच मृत्यू झाला, तर शेळीपालकम जखमी झाले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी सायंकाळी साडेचार वाजतादरम्यान नेत-वरूड परिसरात अवकाळी वादळासह जोरदार पावसाने हजेरी लावली. यावेळी आकाशात विजांचा प्रचंड कडकडाट सुरू होता. दरम्यान, कवडू जुमनाके यांच्या शेतावर वीज कोसळून ही दुर्घटना घडली. शेळीपालक भारत गेडाम यांच्या मालकीच्या २२ शेळ्या शेताशेजारील मोकळ्या जागेत चरत होत्या. त्याचवेळी वीज कोसळल्याने या नि:ष्पाप जनावरांचा दुर्दैवी अंत झाला. या घटनेत शेळीपालक भारत गेडाम हेदेखील जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी तातडीने ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ही घटना अत्यंत हृदयद्रावक असून, यामुळे गेडाम यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी प्रशासनाकडे धाव घेत, त्वरित पंचनामा करून नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे. या अवकाळी वादळ आणि पावसाचा फटका तालुक्यातील इतर भागांनाही बसला असून, शेतकऱ्यांच्या उभ्या उन्हाळी पिकांचेही मोठे नुकसान झाल्याचे वृत्त आहे. प्रशासनाने तत्काळ उपाययोजना करून नुकसानग्रस्त शेतकरी आणि पशुपालकांना तातडीने मदत करावी, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे बळीराजा पुन्हा एकदा संकटात सापडला आहे.

# आर्णी येथील तहसील कार्यालयात आगीचे तांडव

## तहसील कार्यालयासमोर उभ्या ट्रकची केबिन पेटली



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**आर्णी, दि.१८:** आर्णी तहसील कार्यालयातील स्टोअर रूम म्हणून उपयोगात येत असलेल्या खोलीबाहेर रविवारी, दि.१८ मे रोजी सायंकाळी ६ वाजता आग लागल्याने आजूबाजूच्या परिसरात खळबळ उडाली आहे.

या खोलीत कार्यालयातील कागदपत्रे आहेत. अवैध वाळू वाहतूक करताना पकडलेल्या टिप्परचे समोरील टायरने पेट घेतल्याचे दिसून आले. घटनेची माहिती मिळताच नगरपरिषदेची अग्निशामक गाडी घटनास्थळी काही मिनिटांतच तिथे पोहोचली. परंतु तहसील समोरील रोड जवळ पाइपलाइनचे काम सुरू असल्याने संपूर्ण रस्त्यावर नाली पाडून असल्याने ती अग्निशमन गाडी तहसील कार्यालयात वेळेवर पोहोचू शकली नाही. त्यामुळे आतमध्ये आगीने मोठे नुकसान झाले असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. परंतु कागदपत्रे मात्र जळाले असल्याचे समजते. आग कशामुळे लागली हे अजून कळले नाही.

**CAPTION** तिरंगा रॅली



**यवतमाळ :** देशभक्त यवतमाळकर यांच्यावतीने यवतमाळ शहरातील प्रमुख मार्गावरून रविवारी दुपारी ४ दरम्यान भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. या रॅलीत शहरातील खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी आदींसह महिलांचीही लक्षणीय उपस्थिती होती. हातात तिरंगा ध्वज घेऊन 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्' आदी घोषणा देत महिला या रॅलीत सहभागी झाल्या होत्या. भारतीय सैन्य दलाने आतंकवाद्यांविरुद्ध राबविलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'च्या गौरवार्थ ही रॅली काढण्यात आली.

# तिरंगा रॅलीत ३५ माजी सैनिकांचा सत्कार

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.१८:** देशभक्त यवतमाळकरांच्या वतीने रविवारी शहरात 'सिंदूर सन्मान तिरंगा' यात्रा भावे मंगल कार्यालय येथून काढण्यात आली असून यात्रेचा समारोप तिरंगा चौक येथे करण्यात आला. यामध्ये ३५ माजी सैनिकांचा सत्कार शाल व श्रीफळ देऊन करण्यात आला व शहीद कुटुंबीय यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये जे जवान सध्या 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये कार्यरत आहेत, अशा काही कुटुंबीयांचा सुद्धा सत्कार करण्यात आला. 'भारत माता की जय, वंदे मातरम' अशा घोषणा देत तिरंगा रॅली काढण्यात आली.

देशभक्त यवतमाळकरांच्या वतीने काढण्यात आलेल्या या रॅलीमध्ये आदिवासी विकास मंत्री प्राचार्य डॉ. अशोक उईके, माजी मंत्री मदन येरावार, आमदार राजू तोडसाम, माजी आमदार संजू रेड्डी बोदकूरवार व डॉ. संदीप धुर्वे प्रफुल्ल चव्हाण, राजू पडगिलवार, कीर्ती राऊत, शैला मिर्झापूरे, अजय मुंधडा, सुरेश राठी, डॉ. सुरेंद्र पद्मावार व इतर शहरातील गणमान्य नागरिक उपस्थित होते. संयोजन राजू पडगिलवार यांनी केले.

## → तिरंगा रॅली क्षणचित्रे











# मारेगाव तालुक्यातील तरुणाची आत्महत्या

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. १८:** मारेगाव तालुक्यातील वेगाव येथील २५ वर्षीय युवकाने शनिवारी आत्महत्या केल्याची घटना ताजी असताना स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या एका २३वर्षीय शिक्षित व हुशार तरुणाने झाडाला गळफास लावून आपले आयुष्य संपविले. प्रीतम हुसेन आत्राम (वय २३ वर्षे, रा. जळकापोड) असे मृत तरुणाचे नाव आहे.

तालुक्यात सतत घडणाऱ्या आत्महत्येच्या घटना चिंतेची बाब आहे. आरोग्य विभागाने गावोगावी मानसिक आरोग्य उपक्रम राबविण्याची गरज आहे. प्राप्त माहितीनुसार प्रीतम आत्राम हा आपल्या वडिलांना शेती कामात हातभार लावत होता. सोबतच स्पर्धा परीक्षांची तयारी करीत होता. प्रीतम हा गावात सर्वांत जास्त शिक्षित व हुशार मुलगा होता. त्यांनी पोलिस व फॉरेस्टच्या भरती परीक्षेत भाग घेतला होता. शनिवार, दि. १७ मे रोजी दुपारी प्रीतम घराबाहेर निघाला होता. मात्र, सायंकाळी ५ वाजता स्वतःच्या शेतात रोहिणीच्या झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या प्रकरणी मारेगाव पोलिसांनी घटनास्थळ गाठून मृतदेह खाली उतरवून पंचनामा करून शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

# बंद घरात चोराने मारला डल्ला

## रोख रखमेसह दुचाकी लंपास, शहरातील गांधीनगरातील घटना

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. १८:** गांधीनगर या शहरातील उच्चभ्रू सोसायटीत काल, शनिवारी रात्री ३.०० ते ४.०० च्या दरम्यान चोरट्यांनी चोरी करण्याच्या उद्देशाने कंपाउंडच्या गेटचे व दरवाजा तोडून आतमध्ये प्रवेश करून कपाटात ठेवलेले दहा हजार रुपये व अंगणामध्ये ठेवलेल्या दुचाकी घेऊन फरार झाले आहे. ही घटना सकाळी परिसरात राहणाऱ्या शेजाऱ्यांच्या लक्षात आल्याने त्यांनी त्वरित पोलिस स्टेशनला फोन करून सदर घटनेची माहिती दिली. यामध्ये शहर पोलिसांनी चौकशी सुरू केली आहे.

हीना किरण सावला, (वय ५० वर्षे), रा. गांधीनगर असे चोरी झालेल्या घरच्या व्यक्तीचे नाव आहे. त्या दोन-तीन दिवसांपूर्वी पुणे येथे गेले असल्याची माहिती मिळाली असून त्या या घरात एकट्याच राहत असल्याची माहिती मिळाली आहे. त्यामुळे ही चोरी रेकी करून व पूर्वनियोजित योजनेचा भाग असल्याचे या भागातील नागरिकांच्या चर्चेतून लक्षात आले आहे. फिर्यादी बाहेरगावी गेल्या असल्याचा फायदा घेत या चोरट्यांनी कपाटातून पैशासह अंगणात ठेवलेले दुचाकी वाहन घेऊन फरार होण्यात त्यांना यश आले आहे. यासंदर्भात शहर पोलिस स्टेशन तपास करीत आहे.

### उच्चभ्रू कॉलनीत सीसीटिव्ही कॅमेऱ्यांचा अभाव

- वाढत्या चोरीच्या घटनेमुळे व सुरक्षेच्या दृष्टीने अनेक उच्चभ्रू सोसायटीत अनेकांनी आपल्या घरी सीसीटिव्ही कॅमेरे लावले आहेत. मात्र, गांधीनगर परिसरातील या सोसायटीमध्ये अनेकांच्या वास्तू या दुमजली तीन मजली आहेत. ते सर्व आर्थिक सक्षम परिवारात असून सुद्धा या भागात सीसीटिव्ही कॅमेरे अनेकांच्या घराला नसल्याने या भागात चोरी झाल्यानंतर सुद्धा कुठलेही पुरावे न मिळाल्याने पोलिसांना मोठ्या अडचणीला जावे लागत आहे.

# रेशन कार्ड, अन्नधान्य योजनांचा थेट लाभ

## उमरखेड पुरवठा विभागाचा कारभार गतिमान; दलालांना चाप, प्रलंबित प्रकरणे मार्गी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**✦ संभाजी भोयर**

**उमरखेड, दि. १८:** येथील तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाच्या कारभारात कमालीची सुधारणा झाली असून, नवनियुक्त पुरवठा निरीक्षक अमोल महाजन यांच्या गतिमान कार्यपद्धतीमुळे लाभार्थ्यांना थेट दिलासा मिळत आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली प्रकरणे मार्गी लागल्याने व दलालांचा वावर कमी झाल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.



उमरखेड तहसील कार्यालयाअंतर्गत पुरवठा विभाग रेशन कार्ड व धान्य पुरवठा योजना राबवते. मात्र, अनेक महिन्यांपासून लाभार्थ्यांची रेशन कार्ड, अन्नधान्य सुरक्षा योजना व इतर संबंधित कामे प्रलंबित होती. पुरवठा निरीक्षक अमोल महाजन यांनी पदभार स्वीकारताच या कामांना गती दिली. त्यांनी थकीत प्रकरणे निकाली काढल्याने वंचित नागरिकांना थेट सुविधा मिळू लागल्या आहेत. पूर्वी अनेक लाभार्थी रेशन दुकानदारांच्या अडचणींमुळे किंवा दलालांच्या फसवणुकीमुळे योजनांपासून वंचित राहत होते. महाजन यांनी 'थेट संपर्क साधा' असे फलक लावून व दलालांना थारा न देण्याचे धोरण अवलंबल्याने सामान्य नागरिकांची लूट थांबली आहे. योजनेच्या कामासाठी कुणालाही पैसे किंवा कागदपत्रे देऊ नयेत, असे आवाहन त्यांनी केले आहे. तहसीलदार राजू सुरडकर यांनीही महाजन यांच्या कामाचे कौतुक केले असून, लाभार्थ्यांना थेट पुरवठा निरीक्षकांशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. यामुळे गरजूंना जलद मदत मिळेल व गैरप्रकार थांबतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. श्री. महाजन यांनी सांगितले की, नियमानुसार कागदपत्रे प्राप्त होताच तत्काळ कार्यवाही केली जाते व सुट्टीच्या दिवशीही ते काम करतात, त्यामुळे शेकडो प्रकरणे मार्गी लागली आहेत. या बदलामुळे पुरवठा विभाग दलालमुक्त होईल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

> शासन नियमानुसार लाभार्थ्यांचे सर्व कागदपत्रे व विहित नमुन्यात अर्ज प्राप्त झाल्यास त्यावर तत्काळ कारवाई करण्यात येते. तसेच सर्व अभिलेख व्यवस्थित जतन करून ठेवण्यात येते. तालुक्यातील लाभार्थ्यांची लोकसंख्या अधिक असल्यामुळे सुट्टीच्या दिवशीही शासकीय कामे करण्यासाठी मला हजर राहावे लागते. रुजू झाल्यापासून आत्तापर्यंत शेकडो लाभार्थ्यांचे प्रलंबित विषय निकाली काढले आहे.
>
> **-अमोल महाजन,**
> पुरवठा निरीक्षक, तहसील कार्यालय, उमरखेड

> 'पुरवठा निरीक्षक यांनी पदभार स्वीकारला तेव्हापासून सदर योजनेतील लाभार्थ्यांची प्रलंबित विषय निकाली लागले आहेत. तसेच सदर पुरवठा विभागात सुशोभीकरण करून दस्तऐवज, अभिलेख सुव्यवस्थितपणे जतन करून ठेवले जात आहेत. राशन कार्ड व अन्नपुरवठा या योजनेमधील लाभार्थ्यांना थेट लाभ मिळत आहे.'
>
> **-आर. यू. सुरडकर,**
> तहसीलदार, उमरखेड.